# १

# इतिहासाचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ इतिहासाचा अर्थ

१.३ इतिहासाच्या व्याख्या

१.४ इतिहासाचे स्वरूप

१.५ इतिहासाची व्याप्ती

१.६ सारांश

१.७ प्रश्न

१.८ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

१) इतिहास म्हणजे काय हे समजून घेऊन इतिहासाच्या व्याख्यांचा अभ्यास करणे.

२) इतिहासाचे स्वरूप अभ्यासणे.

३) इतिहासाच्या व्याप्तीचा आढावा घेणे.

## १.१ प्रस्तावना

मानव व त्याच्या सभोवालताच्या समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र हे ' सामाजिक शास्त्र ' म्हणून ओळखले जाते. या सामाजिक शास्त्राचा एक विषय ' इतिहास ' होय. भूतकाळातील मानवी जीवनातील विविध घटना, घडामोडी यांचा अभ्यास हा इतिहासामध्ये करण्यात येतो. इतिहास म्हणजे माणसाची गोष्ट. मानवाच्या उत्क्रांतीपासून आजपर्यंतच्या वाटचालीचा अभ्यास हा इतिहासाद्वारे केला जातो. इतिहास हा विषय मानवी जीवनाशी निगडित आहे. इतिहासाची सुरवात ही पृथ्वी वर सजीव निर्माण झाल्यापासून होते. पण अज्ञाना अथवा साधनां अभावी तो इतिहास ज्ञात नाही. आर्थर मार्विक यांनी आपल्या 'The nature of History ' या ग्रंथात असे म्हटले आहे की, इतिहास नसलेले लोक अथवा इतिहासाची जाण नसलेला समाज हा स्मृतिभ्रंश झालेल्या माणसासारखा असतो. हेन्री कोमेंजर यांच्या मते, "जर समाजाला इतिहास नसेल तर स्मृती नसलेल्या माणसासारखी त्याची अवस्था होते." या दोन्ही व्याख्यांवरून आपणास व्यक्ती व समाजाच्या जीवनातील इतिहासाचे महत्व कळते. इतिहासाच्या अभ्यासाद्वारे इतिहासकार हा इतिहासाला जिवंत करण्याचा प्रयत्न करतो. थोडक्यात इतिहास हा गतकाळाशी निगडित आहे.

## १.२ इतिहासाचा अर्थ

इतिहास म्हणजे 'माणसाची गोष्ट' इतिहासात मानवाच्या उत्क्रांती पासून आजपर्यंतच्या वाटचालीचा अभ्यास हा केला जातो. इतिहास या संस्कृत शब्द आहे, त्याचा विग्रह इति + ह + आस, असा आहे ज्याचा अर्थ, 'असे घडले' किंवा 'अशा प्रकारे घडले ' असा होता. इंग्रजी भाषेतील History या शब्दाचे मूळ ग्रीक भाषेमध्ये सापडते. ग्रीक भाषेत हा शब्द Istoria असा आहे. याचा अर्थ जिज्ञेसेने केले जाणारे संशोधन व त्याद्वारे नव्या माहितीचा शोध असा आहे. इतिहास शब्दाचा दुसरा उल्लेख जर्मन भाषेतील Geschichteया शब्दाने करतात. याचा गतकालीन घटनांचे तर्कशुद्ध व अर्थपूर्ण विवेचन होय. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामधे इतिहास या शब्दाचा वापर दोन प्रकाराने करता येतो. हे दोन प्रकार म्हणजे घटनांची जंत्री किंवा खुद्द घटना अशा अर्थाने हा शब्द वापरतात.Historyया शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग ग्रीक इतिहासकार हेरोडोटस याने केला. हेरोडोटस यांना इतिहासाचा जनक मानले जाते. त्यांच्या मते, इतिहासाचा अर्थ हा जाणून घेणे किंवा ज्ञात होणे होय.

**आपली प्रगती तपासा :**

**१) इतिहासाचा अर्थ स्पष्ट करा.**

________________________________________________________

## १.३ इतिहासाच्या व्याख्या

इतिहासात मानवी जीवनातील विविध घटनांची नोंद असते. या घटनांचा अर्थ हा मानवी जीवनाशी निगडित असतो व त्याच्या आधारे तो मानवी जीवनातील भूतकाळातील विविध चित्रे उभारू शकतो.हे करत असताना वर्तमानाचा अभ्यास व भविष्याचा अंदाज बांधू शकतो.इतिहासाचा नेमका अर्थ अगदी मोजक्या शब्दात सूत्ररूपाने सांगणे म्हणजे इतिहासाची व्याख्या करणे होय. अनेक इतिहासकारांनी इतिहासाच्या अनेक व्याख्या केल्या आहे. या व्याख्या जरी वेगवेगळ्या असल्या तरी त्या सर्वांचा अर्थ हा एकच आहे. ' मानवी जीवनाची समग्र वाटचाल म्हणजे इतिहास होय ' अशी सर्वसाधारणपणे इतिहासाची व्याख्या करता येईल. हि वाटचाल कुठल्या माध्यमातून अभ्यासता येईल, याचे स्पष्टीकरण खालील प्रमुख व्याख्यांमधून मिळेल.

**१) हेरॉडोटस**

" गतकाळातील अविस्मरणीय आणि महत्वाच्या घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय."

**२) थुसिडाइज**

"इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन होय."

**३) ॲरिस्टॉटल**

"इतिहास हा न बदलणाऱ्या भूतकाळाची कथा आहे."

**४) एडवर्ड हलेट कार**

"इतिहास म्हणजे केवळ गतकाळाची कथन नाही, तर तो भूतकाळ व वर्तमान काळ यांच्यात सतत चालणार संवाद आहे. "

**५) थॉमस कार्लाइल**

"थोर व्यक्तींचे चरित्र म्हणजे इतिहास होय."

**६) बेनोडिटो क्रोसे**

"सर्व इतिहास हा समकालीन असतो."

**७) कार्ल मार्क्स**

"वर्ग कलह म्हणजे मानवी इतिहास होय."

**८) रॉबर्ट सिले**

"गतकालीन राजकारण म्हणजे इतिहास तर वर्तमान कालीन राजकारण म्हणजे भविष्यकाळातील इतिहास होय."

**९) रियासतकार सरदेसाई**

इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा. मानवाच्या अथवा सृष्टीच्या उत्पत्तीपासून ते आजतागायत केलेली प्रगती अथवा वाटचाल म्हणजे इतिहास होय.

**१०) के. एम. पण्णीकर**

इतिहास म्हणजे एखाद्या प्रदेशातील जनता, त्यांची राजकीय प्रगती व विकास, त्यांनी निर्माण केलेल्या सामाजिक व आर्थिक संस्था व त्यांच्या आर्थिक श्रद्धा यातून उद्भवणारे परस्परातील संघर्ष व त्यातून तावून - सुलाखून बाहेर पडलेला मानव समाज होय.

**आपली प्रगती तपासा :**

**१) इतिहासाच्या विविध व्याख्या सांगा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १.४ इतिहासाचे स्वरूप

गतकाळातील मानवी जीवनाची कथा म्हणजे इतिहास अशी सर्वसाधारणपणे इतिहासाची व्याख्या करता येते. इतिहासाच्या व्याख्येवरून इतिहासाचे स्वरूप स्पष्ट होते. मानव हा समाज प्रिय प्राणी असल्याने त्याच्या बुद्धीचा विकास हा इतर प्राण्यांपेक्षा जास्त झाला असल्याने त्याला वर्तमान काळ समजतो. भविष्याची चाहूल घेता येते व या दोन प्रक्रियेमुळे त्याच्या ठिकाणी भूतकाळासंबधी उत्सुकता निर्माण झाली. इतिहासाचा संबंध हा मानवी जीवनाशी असल्यामुळे इतिहासाचा अभ्यास हा महत्वाचा आहे. मानवी जीवन हा इतिहास

munotes.in

विषयाचा गाभा असल्यामुळे मानवाने आतापर्यंत जी प्रगती केली त्या सर्व क्षेत्राशी इतिहासाचा संबंध आहे. यावरून इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती किती विस्तारित आहे हे लक्षात येते. इतिहासाचे मुख्य दोन उद्देश सांगता येतील.

१) गतकालीन घटनांचा अभ्यास करणे व त्याचे योग्य मूल्यमापन करणे.

२) घडून गेलेल्या घटनांना योग्य संदर्भांसह प्रस्तुत करणे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासूनच इतिहासाकडे पाहण्याचा भूमिकेमध्ये बदल झाल्याने भूतकाळातील चांगले ज्ञान प्राप्त करून त्याचा वर्तमान काळावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास करण्याची पद्धत सुरु झाली. यामधूनच इतिहासाचे स्वरूप विस्तीर्ण व सार्वत्रिक स्वरूपाचे झाले. इतिहासाचे स्वरूप ठरवत असतांना इतिहासासंबंधी पुढील संकल्पना समजून घेतल्यास इतिहासाच्या स्वरूपाची विविधता समजू शकेल.

### १) इतिहासाची पुनरावृत्ती होते

इतिहासाचा अभ्यास करताना सर्वसामान्य असे मानले जाते कि, इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. काही इतिहासकार या विधानाला विरोध करतात. परंतु हे विधान सर्वस्व असत्य नाही किंवा सत्यही नाही. इतिहासाची पुनरावृत्ती होते याचा थोडक्यात अर्थ म्हणजे ऐतिहासिक घटनांमध्ये साम्य दिसते, मात्र त्या घटना घडण्याचे मार्ग वेगळे असतात. ऐतिहासिक घटना या स्थळ व काल याबाबतीत कधीही एकाच ठिकाणी घडत नाही, तरीसुद्धा त्यामध्ये मूलभूत एकात्मता असते. अशा मूलभूत एकात्मतेमुळेच इतिहासातील नियम अस्तित्वात आले. उदा. पहिल्या महायुद्धनंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली व दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. अशा काही गोष्टींमुळे इतिहासाची पुनरावृत्ती होते, असे दिसून येते.

इतिहासाच्या स्वरूपाविषयी वरील विधानाला विरोध करणारी अभ्यासक असे म्हणतात कि,इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही. कारण बदल हा निसर्गाचा नियमच आहे. त्यामुळे इतिहासातील दोन घटना जरी सारख्या वाटत असल्या तरी त्या भिन्न असतात. इतिहासकाराला मात्र दोन घटना सारख्या वाटून पुनरावृत्ती झाली असे वाटते.

### २) सर्व इतिहास हा समकालीन असतो

इतिहासाच्या स्वरूपाबद्दल इटालियन तत्ववेत्ता बेनेट्टो क्रोसॉ म्हणतो, ' सर्व इतिहास हा समकालीन असतो. ' त्यांच्या मते भूतकाळ आणि वर्तमान काळ हे दोन्हीही एका विशिष्ट घटनाक्रमाने जोडलेले असतात. त्यामुळे गतकाळातील घटना सुद्धा समकालीनच वाटतात. क्रॉसेच्या या विधानाचे आर. जी कॉलिंगवूड यांनी समर्थन केले आहे. त्यांच्या मते, इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून गतकाळातील घटना ह्या नव्याने सांगितलेल्या असतात. थोडक्यात भूतकाळात घडलेल्या घटना ह्या काळाच्या ओघात घडत असल्यातरी तरी त्याचे कारणे व परिणाम यामध्ये सारखेपणा दिसून येतो. इतिहासकार हा वर्तमान काळात राहून भविष्यकाळातील घटनांचे मूल्यमापन साधनांच्या साहाय्याने करत असतो. घडलेल्या प्रत्येक घटनांचा समकालीन भाषेमध्ये

अर्थ लावत असतांना काही गोष्टी कलात्मक दृष्ट्या, काही नीतिशास्त्राच्या आधारे, काही तर्काच्या आधारे तर काही अर्थशास्त्राच्या आधारे सिद्ध करता येतात. या घटनांवर समकालीन विचारांचा प्रभाव पडत असतो. या सर्व घटना समकालीन असतात. म्हणून सर्व इतिहास हा समकालीन असतो.

**३) इतिहासात भवितव्य वर्तवण्याची क्षमता असते**

इतिहासात भूतकाळाचा अभ्यास जरी केला जात असला तरी इतिहासाचा अभ्यास हा वर्तमान काळाची गरज असते. त्यामुळे भूतकाळात घडलेल्या घटनांचा अर्थ नव्याने वेळोवेळी लावला जातो. इतिहासकार हा इतिहासाचा अभ्यास करत असतांना भूतकाळात जाऊन भूतकाळ व वर्तमान काळ यांच्यात सुसंवाद साधत असतो. हा संवाद साधत असतांना त्याला भूतकाळात घडलेल्या घटना का घडल्या, कश्या घडल्या याचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून त्या घटनांचे विश्लेषण करावे लागते. थोडक्यात इतिहासावर वर्तमानकाळातील विचारसरणीचा प्रभाव पडलेला असतो. अशी व्यक्ती भूतकाळात जाऊन भूत व वर्तमान यांच्यात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करते. हे इतिहासाचे खरे स्वरूप आहे.

**४) इतिहासामध्ये मूल्यमापन असावे कि नसावे**

इतिहासाचे लेखन करत असतांना इतिहासकार घडून गेलेल्या घटनांचे वर्णन करत असतो. परंतु त्या घटनेचे मूल्यपमान करावे कि नाही याबाबत विविध मते आढळतात. लॉर्ड एक्टन यांच्या मते, इतिहासात मूल्यमापन, चर्चा व काही निर्णय देणे हे त्या संशोधकाचे अविभाज्य भाग आहेत. एक्टन म्हणतो, 'इतिहासाची सर्वात मोठी कामगिरी कोणती असेल तर त्याने माणसाची सद्सद विवेक बुद्धी शस्त्रासारखी धारधार केली.' मात्र राँके व ब्यूरी यांना हा विचार मान्य नाही. त्यांच्या मते, संशोधकाने फक्त घटना मांडाव्या, त्यावर भाष्य करू नये त्यामुळे एखाद्या वेळी गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. परंतु आधुनिक काळात मात्र इतिहासामध्ये मूल्यमापन असावे असा विचार पुढे आला आहे.

**५) इतिहासाची प्रगती सरळ रेषेत कि चक्राकार?**

इतिहासाची प्रगती कोणत्या दिशेने होते, याबद्दल विद्वानांमध्ये तीव्र भिन्न विचारप्रवाह आहे. काही इतिहासकारांच्या मते, इतिहासाची प्रगती एका सरळ रेषेत होते. ही प्रगती होत असतांना भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांच्यात सुसंगतपणा असतो. म्हणजेच मानवाची बौद्धिक व भौतिक प्रगतीची दिशा ही चढत्या क्रमाने होत असते. दुसऱ्या विचारप्रवाहाच्या मते, इतिहासाची प्रगती ही चक्राकार किंवा वर्तुळाकार गतीने होत असते. म्हणजेच ज्याठिकाणी ही प्रगती सुरु होते त्याच ठिकाणी कालांतराने तिचा शेवट होतो. आणखी एक विचार टूग्रो व कॉडरसेट यांनी मांडला. त्यांच्या मते, मानवी समाजाची प्रगती ही ज्ञानाकडून अधिकाधिक ज्ञात स्थितीमध्ये होत असते. ज्याप्रमाणे मानवी समाजाचा प्रारंभ हा अतिशय साध्यास्वरूपात झाला, पुढे मानवी समाजाची प्रगती झाली तशी गुंतागुंत वाढत गेली. या गुंतागुंतीचा अभ्यास करणे हे इतिहासाचे स्वरूप आहे.

### ६) इतिहास हा अनन्यसाधारण आहे

पॅट्रिक गार्डिनर यांनी 'The Culture of Historical Explanation' या ग्रंथात इतिहास हे एक स्वयंपूर्ण शास्त्र आहे, असा विचार मांडला. गार्डिनर यांच्या मते, इतिहासात शास्त्रशुद्ध सिद्धांत मांडणे, विषयाच्या दृष्टीने साधने जमा करणे, त्यांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून त्या घटनांचा अन्वयार्थ लावणे, व नंतर भवितव्यता वर्तवण्याचा प्रयत्न केला जातो. आज इतिहासाला शास्त्राचे स्वरूप जरी प्राप्त झाले असले तरी इतिहास स्वयंपूर्ण आहे. कारण त्याचा मुख्य आधार मानवी मन व चेतना आहे.

**आपली प्रगती तपासा :**

**१) इतिहासाचे स्वरूप सांगा.**

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

## १.५ इतिहासाची व्याप्ती

इतिहास या विषयाची व्याप्ती हि काळानुसार सतत बदलत असल्याचे दिसून येते. आधुनिक कालखंडात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, मानसशास्त्रीय अशा असंख्य सामाजिक शास्त्राचा जन्म झाला. प्रत्येक शास्त्र आपली भूमिका आपआपल्या चौकोटीप्रमाणे पार पाडतआहे व आपला विषय हा इतर शास्त्राप्रमाणेच महत्वाचा आहे हे पटवून देत आहे. परंतु इतिहास या विषयाची व्याप्ती हि दिवसेंदिवस वाढून त्याचे महत्व देखील वाढले आहे. याबाबतीत प्रा. एल्टन यांचे मत महत्वाचे आहे, त्यांच्या मते, "सर्व काही इतिहासाचे उत्तम लिखाण हे एका अर्थाने जागतिक इतिहासाचाच भाग आहे. कारण एका छोट्या देशाच्या इतिहासाची विचार करतांना जगाचा विचार टाळता येत नाही."

इतिहासाची व्याप्ती वाढण्याचे खालील कारणे सांगता येतील

१) आज अनेक अतिप्राचीन जुन्या संस्कृतीचा शोध लागत आहे, ज्यामुळे जुने सिद्धांत मागे पडून अनेक नवीन सिद्धांत नव्याने मांडले जात आहे.

२) उत्खननाच्या नवीन पद्धतीमुळे अनेक प्राचीन शिलालेख, भुजपत्रे, भांडी, विविध वस्तू उत्खननाद्वारे मिळत आहे. त्यामुळे प्राचीन कालखंडाच्या ज्ञानात भर पडत आहे.

३) नवीन भौगोलिक शोधांमुळे अतिप्राचीन संस्कृतीच्या शोधांबरोबरच नवी मानवाची वंशावळ नव्याने समजत आहे. ज्यामुळे मानववंशशास्त्रात नव्या माहितीची भर पडून अनेक नवीन सिद्धांत मांडले जात असल्याने ते इतिहासाच्या अभ्यासाला पूरक ठरत आहे.



munotes.in

४) यापूर्वी इतिहासात युद्ध, लढाया म्हणेजच राजकीय इतिहासाचं अभ्यास केला जात होता. परंतु आज इतिहासाचा अभ्यास सर्वच दृष्टिकोनातून केला जातोय त्यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढली आहे.

५) आज इतिहासाला स्वायत्त विषय मानून त्यामध्ये मानवी समूहाचा, त्याच्या कलाविकास, नैतिक कल्पना, धार्मिक कल्पना, विविध परंपरा, यांचा झालेला विकास, व्यापार, अर्थशास्त्रीय व्यवहार, नाणी इ. चा अभ्यास केला जातो.

थोडक्यात, ऐतिहासिक साधने गोळा करून त्याचा योग्य अन्वयार्थ लावून ऐतिहासिक घडामोडींमागे असणारी प्रेरणा स्पष्ट करणे ही इतिहासाची व्याप्ती बनली आहे.

**१) सर्व ज्ञान शाखांचा अभ्यास**

इतिहासाचा संबंध हा मानवी जीवनाशी असल्यामुळे मानवी जीवनाप्रमाणेच इतिहासाची व्याप्ती देखील मोठी आहे. इतिहासाचा अभ्यास हा मानवाच्या भूतकाळाशी संबंधित असतो. याचाच अर्थ, मानवी जीवनाशी संबंधित असण्याऱ्या सर्व भूतकालीन घटनांशी तो निगडित असतो. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास विषय किंवा व्याप्ती ही एखाद्या विषयापुरतीच मर्यादित न राहता अलीकडच्या काळात सर्वच अभ्यास शाखांचा इतिहासाच्या व्याप्तीमध्ये समावेश केला गेला आहे. आधुनिक कालखंडात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, मानसशास्त्रीय अशा अनेक सामाजिक शस्त्रांचा जन्म झाला आहे. इतिहासाची व्याप्ती वाढल्याने त्याचे महत्व देखील वाढले आहे. व इतिहासाचा अभ्यास भविष्यकाळातील निर्णय घेतांना नेहमीच उपयुक्त ठरतो.

**२) प्रो. गुस्टावासन**

गुस्टावासन यांनी आपल्या'A Preface to History' या ग्रंथात असे म्हटले आहे की, 'एखादा मनोवैज्ञानिक त्याच्याकडे असलेल्या रुग्णावर उपचार करण्यापूर्वी त्या रुग्णाचा संपूर्ण भूतकाळ समजून घेण्याचा प्रयत्न करतो आणि नंतर योग्य ते उपचार सुचवतो, अगदी त्याचप्रमाणे इतिहासाच्या बाबतीत म्हणता येईल.'

थोडक्यात असे म्हणता येईल कि, इतिहासाचा अभ्यास म्हणजे गाडल्या गेलेल्या भूतकाळाचा अभ्यास नव्हे तर वर्तमानकाळाच्या संदर्भात केलेला अभ्यास होय. म्हणजेच वर्तमान काळाचे संदर्भ सुद्धा इतिहासाच्या व्याप्ती मध्ये येत असतात. म्हणून जी व्यक्ती गतकाळातील घटनांचे वैशिष्ट्ये ताबोडतोब जाणू शकते, त्या व्यक्तीला वर्तमान काळातील घटनांचे मूल्यमापन करणे जास्त अवघड जात नाही.

munotes.in

**३) प्रो. बॉडीन**

प्रो. बॉडीन यांच्या मते इतिहासाची व्याप्ती आपणास पुढील तत्वानुसार निश्चित करता येईल.

१) मानवी जीवनामध्ये अत्यंत उच्च कोटीची काही शास्वत तत्वे असतात. त्या तत्वांची ओळख करून देणे.

२) इतिहासाने भविष्य वर्तविण्याच्या क्षमतेचा अधिकाधिक लाभ घेणे.

३) मानवी इतिहासाचा अभ्यास करताना शाश्वत मानवी मूल्यांची माहिती करून घेणे.

ही तीन प्रकारची इतिहासाची व्याप्ती आहे. व्याप्ती साध्य करण्यासाठी इतिहासाला हकीकत सांगावी लागते. हकीकत कशी घडली ते सांगणे आणि त्या हकीगताचे पृथक्करण करणे अशा पद्धतीनेच इतिहासाचा मार्ग शोधात असतो.

**४) प्रो. जी. एम. ट्रीव्हीलीवन**

ट्रीव्हीलीवन यांनी इतिहासाची व्याप्ती सांगत असताना शास्त्रीय कल्पना, शक्तीवर आधारित व वाङ्मय अशा तीन वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करणारा हा विषय आहे, असे सांगितले आहे. याचा अर्थ इतिहास हा एकमेव असा विषय आहे कि, विज्ञान - कल्पना, वाङ्मय या तिन्ही क्षेत्रात मुक्तपणे वावरत आहे. म्हणजेच अनेक विषयांना स्पर्श करण्याइतकी प्रचंड व्याप्ती इतिहासामध्ये आहे.

**५) निसर्गात राहणाऱ्या मानवी प्रगतीचा अभ्यास**

इतिहास हा निसर्गाचा अभ्यास करत नाही. तर त्या निसर्गात राहणाऱ्या मानवाची प्रगती कशी झाली याचा तो अभ्यास करत असतो. इतिहासात एखाद्या युद्धाच्या संदर्भात नद्या, पर्वत, सागर, डोंगर, यांचा देखील विचार हा महत्वाचा ठरतो.

उदा. प्लासीच्या युद्धाचा विचार करताना प्लासीच्या रणांगणाचा विचार रॉबर्ट क्लाईव्हच्या संदर्भात, पानिपतच्या रणांगणाचा विचार भाऊसाहेब व अब्दाली यांच्या संदर्भात केला जातो, तर वोटर्लू चा विचार नेपोलियनच्या संदर्भात केला जातो. म्हणजेच मानवाच्या जडणघडीत निसर्गाचा जेवढं संबंध असेल तेवढ्या संदर्भातच निसर्गाचा विचार केला जातो.

**६) अर्थशास्त्रीय घडामोडी व सामाजिक बदलांचा अभ्यास**

अलीकडच्या काही काळात ऐतिहासिक घटनांमध्ये अर्थशास्त्रीय घडामोडी व सामाजिक बदलांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जात आहे. उदा. साम्यवादी देशांमध्ये घडणाऱ्या घडांमोडीकडे मार्क्सवादी तत्वज्ञानातून पहिले जाते. अशा घडामोडींमध्ये कामगार चळवळ, वर्गकलह, व्यापार, उद्योगधंदे, शेती इ. गोष्टींचा समावेश असतो. एखाद्या लोकशाहीवादी देशात याच घटनांकडे सामाजिक बदल अशा दृष्टीकोणातून पहिले जाते. ज्यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढून अर्थशास्त्र, समाजशास्त्र,

मानववंशशास्त्र, इतर भौतिकशास्त्र यांच्याशी निगडित असणारा विषय म्हणून इतिहासाकडे पहिले जाते.

**७) सामान्य व्यक्तींचा अभ्यास**

फ्रेंच, रशियन, अमेरिकन क्रांती, माओ स्ते - तुंगचा लॉन्ग मार्च, आफ्रिका - आशिया खंडातील राष्ट्रांचे स्वतंत्र लढे, इ. मुळे इतिहासाचं नायक हा सामान्य माणूस बनला. या क्रांत्यांमुळे इतिहासाचे एक नवीन तत्वज्ञान निर्माण झाले. काळाच्या ओघात इतिहास लेखनाने भौगोलिक मर्यादा ओलांडल्या. स्थानिक, देशाचा आपल्या राष्ट्राचा इतिहास इथेच न थांबता जगाच्या इतिहासाचे लिखाण होऊ लागले. सर्वसामान्य जनतेमधील लोककथा, दंतकथा, मिथके यांचाही इतिहासात अभ्यास होत असल्याने इतिहासाची व्याप्ती वाढली.

**आपली प्रगती तपासा :**

**१) इतिहासाच्या व्याप्तीचा आढावा घ्या.**

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## १.६ सारांश

इतिहास म्हणजे भूतकाळातील घडून गेलेल्या घटनांचा आढावा घेणे होय. इतिहासामध्ये मानवी मनाचा, बुद्धिमत्तेचा विकास कसा होत गेला याचा अभ्यास केला जातो. मानवाने आपल्या बुद्धीचा वापर करून आपले राहणीमान सुधारले, रचनात्मक समाज उभा केला व यामधूनच संस्कृती ही उदयास आली. व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून बघितल्यास इतिहास म्हणजे मानवाच्या आकलनात घडणाऱ्या सर्व घटनांचा वृत्तांत होय. इतिहासाच्या विविध व्याख्यांवरून कळते की, इतिहास म्हणजे मानवाचा आजपर्यंतचा समग्र अभ्यास होय. व मानवनिर्मित सर्वच गोष्टींचा अभ्यास इतिहासामध्ये होत असल्याने इतिहासाची व्याप्ती देखील मोठी आहे. इतिहासाचा विचार करताना राजकीय, सामाजिक,आर्थिक, नैतिक, साहित्यविषयक इ. गोष्टींचा अभ्यास हा इतिहासामध्ये होत असतो. एकंदरीतच मानवी जीवनातल्या कक्षेतील कोणताही भाग इतिहासाच्या अभ्यासाच्या कक्षेबाहेच्या नाही.

## १. ७ प्रश्न

१) इतिहासाचा अर्थ सांगून इतिहासाच्या विविध व्याख्या सांगा?

२) इतिहासाच्या स्वरूपाचा थोडक्यात आढावा घ्या.

३) इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करा.

## १. ८ संदर्भ ग्रंथ

१) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४

२) सरदेसाई बी.एन., इतिहासलेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५

३) राजदरेकर सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

४) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११

५) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२

६) आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्वज्ञान, प्रज्ञा पाठशाळा, वाई.

७) गाठाळ एस. एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११

८) इतिहास लेखन परिचय, (स्टडी मटेरियल), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

९) इतिहासाचे सिद्धांत, (स्टडी मटेरियल), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

❉❉❉❉❉❉❉

munotes.in

# २

# साधनांची सत्यता, विश्वासार्हता आणि प्रासंगिकता

**घटक रचना**

२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ साधनांची विश्वासार्हता व सत्यता

२.३ बहिरंग परीक्षण

२.४ अंतरंग परीक्षण

अ) सकारात्मक परीक्षण

ब) नकारात्मक परीक्षण

२.५ साधनांची सत्यता, विश्वासार्हता यांची मर्यादा

२.६ समारोप

२.७ प्रश्न

२.८ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टये

१) साधनांची विश्वासार्हता अभ्यासणे.

२) बहिरंग परीक्षणाचा आढावा घेणे.

३) अंतरंग परीक्षणाचा आढावा घेणे.

४) साधनांची सत्यता, विश्वासार्हता यांची मर्यादा यांचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची नोंद व भूतकाळातील घटनांचा अभ्यास होय. थोडक्यात, भूतकाळातील सर्व महत्वाच्या घटनांचा सुसंगणतपणे लिहलेल्या माहितीला इतिहास असे म्हटले जाते. इतिहास लेखनशास्त्रातील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे इतिहास ज्या कागदपत्रांच्या - पुराव्यांच्या आधारे लिहायचा आहे तो पुरावा किंवा साधने किती खरी आहे किंवा विश्वासहार्य आहे. इतिहास संशोधनातील सर्वत महत्वाचा टप्पा हा हाती आलेल्या कागदपत्रांचे परीक्षण करणे असते. इतिहास संशोधनात इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण झाल्यानंतर निवडलेल्या साधनांची अधिकृतता किंवा विश्वासार्हता ठरवणे हि अतिशय अवघड बाब आहे. हाती आलेल्या साधनांमधील दोष दूर करून त्यामधून ऐतिहासिक सत्य बाहेर काढावे लागते. त्यासाठी मूळ कागदपत्रांचे परीक्षण करणे आवश्यक आहे.

munotes.in

कोणत्याही पुराव्याचे, कागदपत्रांचे सत्यत्व आणि विश्वासार्हता निश्चित केल्याशिवाय त्याचे ऐतिहासिक मूल्य नेमके काय आहे हे कळत नाही. एखाद्या कागदपत्रांची - पुराव्यांची सत्यत्व व त्याची विश्वासार्हता  कशी निश्चित केली जाते हे या प्रकरणात आपण बघणार आहोत.

## २.२ साधनांची विश्वासार्हता  व सत्यता

प्रत्येक ज्ञानशाखेची संशोधनाची प्रक्रिया हि वेगेवेगळी असते. ऐतिहासिक संशोधनात संशोधकाला ऐतिहासिक लिखित व अलिखित साधन सामुग्री कुठे उपलब्ध आहे याचा शोध घ्यावा लागतो. व संशोधनासाठी आवश्यक कागदपत्रे किंवा संदर्भसाधने गोळा करावी लागतात. संशोधन प्रक्रियेतील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे उपलब्ध साधनांची सत्यसत्यता पडताळून पाहणे होय. भूतकाळात एखादी घटना का घडली? कशी घडली याची माहिती ही संदर्भ साधने देत असतात. परंतु त्या साधनांचे परीक्षण करणे आवश्यक असते. कारण हाती आलेल्या संदर्भ साधनांमध्ये काळानुसार फेरफार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ती मूळ साधने तत्कालीन आहेत की नाही हे ठरवणे आवश्यक असते. यामुळे त्या साधनांमधून मिळणारी माहिती विश्वसनीय आहे की नाही याची खात्री होण्यास मदत होते. संशोधकाची पूर्ण खात्री पटल्याखेरीज त्या साधनांचा इतिहास लेखनासाठी वापर करता येत नाही. म्हणून संकलित कागदपत्रातील माहिती विश्वसनीय आहे कि नाही हे ठरवण्यासाठी संशोधकाला कागदपत्रांचे परीक्षण करावे लागते.

कागदपत्रांचे किंवा संदर्भ साधनांचे परीक्षण हे दोन प्रकारे केले जाते. एक म्हणजे अंतरंग परीक्षण व दुसरे म्हणजे बहिरंग परीक्षण होय. अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रातील मजकुराची विश्वसनीयता तपासली जाते. तर बहिरंग परीक्षणामध्ये कागदपत्रांचा लेखक, काळ व स्थळ याबद्दल खात्री केली जाते.

**आपली प्रगती तपासा :**

**१) साधनांची विश्वासार्हता  म्हणजे काय ?**

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

## २.३ बहिरंग परीक्षण

बहिरंग परीक्षणाद्वारे साधनांच्या बाह्य अंगाचे परीक्षण केले जाते. ही साधनांच्या तपासणीची प्राथमिक प्रक्रिया होय. बहिरंग परीक्षणासाठी इंग्रजी मध्ये Heuristics हा शब्द आलेला आहे. हा शब्द Heuriskein या मूळ ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ, 'शिकणाऱ्याने स्वतःच्या श्रमाने सर्व बाबी शोधून काढाव्यात तसेच आपल्या परिश्रमाने प्रयत्न करून सुधारणा करीत प्रश्न सोडवावा.' बहिरंग परीक्षणामध्ये साधनांची तपासणी केली जाते. याचा मुख्य उद्देश त्यांच्या मुळापासून महत्वाची माहिती मिळवणे हा असतो व आवश्यकता भासली तर त्यांना मूळचा आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. बहिरंग

munotes.in

परीक्षणाबद्दल प्रो. लॉजिलोस व सेन बोस म्हणतात, 'बहिरंग परीक्षण म्हणजे संशोधनाच्या दृष्टीने सुरवातीचा एक गट की, ज्यामध्ये त्या लिखाणाचा आकार व त्या लिखाणाचा संदर्भ याचे परीक्षण होय. 'या परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रांचा लेखक, काळ व स्थळ याबद्दल खात्री केली जातो.

## १) मूलभूत प्रश्न

बहिरंग परिक्षणाची सुरवात प्रश्न विचरण्यामधून होते. संशोधक उपलब्ध कागदपत्रांच्या बाबतीत पुढील प्रश्न उपस्थित करतो आणि स्वतःला काही प्रश्न विचारतो.

१) संशोधक जी कागदपत्रे संशोधनासाठी वापरणार आहे ती कागदपत्रे संशोधन विषयासंबधीतच आहेत का?

२) कागदाचा लेखक संशोधन विषयाच्या काळाशी निगडित आहे का?

३) संशोधकाचा ज्या घटनेवर विश्वास आहे, ती घटना या कागदपत्रांमध्ये आहे का?

४) कागदात आलेला विषय हा संशोधन विषयाच्या काळाशी सुसंगत आहे का?

५) कागदात स्थळाचा उल्लेख आहे का? असल्यास तो संशोधन विषयाच्या स्थल मर्यादेशी जुळतो का?

६) कागद मूळ स्वरूपात आहे की नक्कल आहे तसेच पुरावा खरा आहे कि बनावट आहे?

अशा प्रकारचे प्रश्न हे संशोधनात संशोधकाला वारंवार विचारावे लागतात. विशेषतः ज्यावेळेस नवीन पुरावा, नवीन कागदपत्रे इतिहासकारांच्या हाती येतात त्यावेळी त्यांचा खरे - खोटेपणा इतिहासकाराला पडताळून पाहावा लागतो. यामुळे खोटी, बनावट, चुकीची कागदपत्रे किंवा पुरावा आपल्या हाती नाही, याची संशोधकाला निश्चिती मिळते.

उदा. मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करतांना एखादी बखर आपल्या हाती आल्यानंतर बखरीचे बहिरंग परीक्षण करतांना पुढील प्रश्न मांडावे.

१) मिळालेली बखर ही अस्सल आहे का?

२) या बखरीचा लेखक, ज्या ठिकाणी ही बखर लिहली आहे ती जागा व त्या कालखंडातील ती बखर लिहली आहे तो कालखंड या सर्वांच्या बाबतीत सत्यता आहे का?

## २) मिळालेली कागपत्रे खरी आहेत की नाही

इतिहास संशोधन करत असतांना काही वेळेस अनेक प्रतींमध्ये गोंधळ निर्माण होऊ शकतो. या गोंधळामुळे नेमकी खरी प्रत किंवा खरी कागदपत्रे तपासून पाहण्यासाठी संशोधकाला वर्णन किंवा निष्कासन पद्धती वापरावी लागते. कागदपत्रांचा किंवा

munotes.in

साधनांचा / बखरीचा खरे - खोटे पणा निश्चित करण्यासाठी खालील मुद्दे महत्वाचे असतात.

१) लेखकाची इतिहास मांडण्याची पद्धत.

२) सर्व प्रतींमध्ये वापरला गेलेला कागद किंवा कागदाची प्रत

३) जर आपल्याला बखरींची प्रत मिळाली असेल तर ती अस्सल आहे का?

४) जर ती नक्कल असेल तर ती एकमेव नक्कल आहे का?

५) उपलब्ध ऐतिहासिक साधनांमध्ये ही सर्व माहिती कुठे मिळू शकते किंवा बसू शकते.

या सर्व गोष्टींचा विचार करून आपण कागदपत्रांचा खरे - खोटेपणा निश्चित करू शकतो.

**३) अनेक प्रतींमुळे निर्माण होणारा गोंधळ**

ज्यावेळी एखाद्या कागदपत्रांच्या किंवा साधनांच्या अनेक प्रती उपलब्ध असतात व त्याप्रती एकमेकांपासून वेगवेगळ्या स्वरूपाच्या असतात व त्यांची मूळ प्रत गहाळ होते. तेव्हा या सर्व सर्व गोंधळातून खरी प्रत किंवा खरी कागदपत्रे तपासून पाहावी लागतात. यासाठी जी पद्धत वापरली जाते तिला निष्कासन पद्धती वापरली जाते. (Method of Elimination)

उदा.९१ कलमी बखर. या बखरीला जरी ९१ कलमी बखर म्हणून मान्यता मिळाली असेल तरी काही प्रतींमध्ये ९६ कलमे आढळतात. या ९६ कलमी बखरीच्या ६ प्रति आढळतात. पण बखरीचा अभ्यास केल्यावर असे दिसते कि, ५ कलमे ही कोणीतरी मुद्दाम टाकली आहे. मुळात हि बखर १६८५ सालची किंवा त्याअगोदरची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मंत्री दत्ताजी वाकनीस याने हि लिहलेली आहे. परंतु मूळ प्रत गहाळ झाल्यामुळे उपलब्ध असलेल्या प्रतीमधून खरी प्रत शोधून काढण्यासाठी निष्कासन पद्धती (Method of Elimination) ही पद्धत वापरणे आवश्यक आहे.

**४) लेखकाचे सातत्य**

लेखकाचे आपल्या लिखाणात किती सातत्य आहे किंवा लिखाण करत असतांना किती ते राखले आहे हा देखील महत्वाचा निकष आपण मनाला पाहिजे. त्यामुळे ती बखर किंवा कागदपत्रे त्या काळातील आहेत हे सिद्ध करता येणे शक्य होते. अशा प्रकारे घटनांच्या कालक्रमांचा पट डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेणे शक्य होते. तीच एखादी घटना इतर साधनांमधून त्याच काळात लिहली गेली आहे किंवा नाही याचा उलगडा होतो. बहिरंग परीक्षणात लेखकाचा खरेपणा ठरवणे आवश्यक आहे.

**५) कागदपत्रांचा लेखक निश्चित करणे**

ऐतिहासिक संशोधन करत असतांना अनेक वेळा कागदपत्रांचा नेमका लेखक कोण आहे हे कळत नाही. म्हणून हाती आलेल्या मूळ कागदपत्रांचा लेखक खरा आहे की



munotes.in

दुसऱ्याच एखाद्या व्यक्तीने खऱ्या व्यक्तीच्या नावाखाली तो लिहला आहे याचा शोध संशोधकाला घ्यावा लागतो. कधी कधी लेखाला महत्व मिळवण्यासाठी एखादी व्यक्ती एखाद्या प्रतिष्टीत, प्रख्यात व्यक्तीच्या नावाचा वापर करून लेख लिहत असतो. अशा वेळी त्यामधील मजकुराचा आशय, वापरलेले शब्द पाहून कागदपत्रांचा लेखक निश्चित करावा लागतो.

उदा. ' ऐन - ए - अकबरी ' याचा लेखक सम्राट अकबर असे म्हणता येत नाही. अकबराच्या दरबारातील एखाद्या व्यक्तीकडून अकबराने आपले चरित्र लिहून घेतले असावे. अशा या मूळ लेखकाचे नाव मिळत नाही. अशा पत्र लेखकाला छाया लेखक (Ghost Writer) असे म्हणतात.

थोडक्यात, टीकाकारास देखील संदर्भ साधने माहिती असणे आवश्यक आहे. खऱ्या टीकाकारास बहिरंग परीक्षणाद्वारे त्या लेखकाची सत्यता पटवता येईल.

**६) कागदपत्रांचा कालखंड**

ज्या कागदपत्रांच्या साहाय्याने इतिहासलेखन करावयाचे त्या कागदपत्रांचा कालखंड देखील ठरवणे महत्वाचे असते. कारण त्यामुळे कागदपत्रांची अचूकता व अधिकृतता ठरवता येते. एखाद्या कागदावर जर कालनिर्देश नसेल, किंवा त्यामध्ये उल्लेख केलेल्या घटना किंवा एखाद्या व्यक्तीचा नामउल्लेख यावरून कागदपत्रांचा काळ ठरवण्यास मदत होते. लेखात ज्या कळत निर्देश असेल त्याच्याशी त्यातील घटनांचे, व्यक्तींचे उल्लेख जुळत असतील तरच तो कागद कामाचा मानावा.

उदा. शिवकालीन कागदपत्रात जर पेशवेकालीन व्यक्तीचा अगर एखाद्या घटनेचा उल्लेख सापडला असेल तर तो बनावट समजावा.

**७) स्थळ**

या परीक्षणात शेवटचा महत्वाचा भाग म्हणजे कागदपत्रांचे स्थळ निश्चित करणे. कधी कधी काही कागदपत्रांमध्ये किंवा पुराव्यांमध्ये स्थळांचा स्पष्ट उल्लेख नसतो. अशा वेळी ज्या ठिकाणी इतिहास घडला आहे अशा मुख्य ठिकाणच्या जवळील भौगालिक प्रदेश अथवा स्थळ म्हणजेच नद्या, पर्वत, गाव याचा उपयोग होतो. तसेच कधी कधी प्रदेशानुसार त्या स्थळाची शब्द ही वेगवेगळे असतात. त्यामुळे भाषिक बदलाच्या आधारेही आपल्याला स्थळ निश्चित करता येते.

थोडक्यात, बहिरंग परीक्षणाचा मुख्य उद्देश हा मिळालेल्या साधनांची सत्यसत्यता तपासून पाहणे हा असतो. अनेक इतिहासकार बहिरंग परीक्षणाला गौण किंवा कमी महत्वाचे मानतात. परंतु बहिरंग परीक्षणशिवाय खऱ्या अर्थाने संबंधित साधनांची विश्वासार्हता आपणास पटू शकत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

**१) बहिरंग परीक्षणाचा थोडक्यात आढावा घ्या.**

## २.४ अंतरंग परीक्षण

अंतरंग परीक्षण ही कागदपत्रांच्या परीक्षणातील सर्वात जास्त महत्वाची अशी पद्धत आहे. अंतरंग परीक्षणाच्या माध्यमातून कागदपत्रांची - दस्तऐवजांची सत्यता किंवा विश्वासार्हता तपासली जाते. अंतरंग परीक्षणाचा उद्देश हा पुराव्याची विश्वासार्हता व त्यातील सत्यता पटवून त्याची खात्री झाल्यावरच इतिहास लेखनात त्याचा उपयोग करता येतो. या परीक्षणामध्ये कागदपत्रांची मजकुराची चिकित्सा केली जाते. म्हणजे लेखकाने आपल्या पत्रात किंवा लेखात काय म्हटले आहे. ते मांडण्यामागे त्याची भूमिका काय होती? त्याचे कोणाविषयी काय मत आहे? लेखकाची वैचारिक भूमिका, मजकुरातील शब्दार्थ व गर्भीधार्त अशा वेगवेगळ्या प्रश्नाची उत्तरे शोधणे म्हणजे अंतरंग परीक्षण होय. अंतरंग परीक्षणाबद्दल डॉ. के.एन. चिटणीस म्हणतात, 'बहिरंग परीक्षांचा हेतू काळ, स्थळ व इतर बाह्य गोष्टी ठरवणे असा आहे, पण अंतरंग परीक्षांचा हेतू कागदपत्रांच्या आत शिरून त्याचे विश्लेषण करणे व शेवटी कागद्पत्रांतील घटना सत्य या नात्याने जगापुढे आणणे हाच असतो. थोडक्यात अंतरंग परीक्षणामध्ये विश्वासार्हता प्रस्तापित केली जाते.'

अंतरंग परीक्षण हे १९ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने पूर्णपणे विकसित असे तंत्र म्हणून उदयास आले. जर्मनीचा थोर इतिहास संशोधक रॉंके याने या पद्धतीच्या विकासावर भर दिला. त्यामुळे ही पद्धत पुढे इतिहास संशोधनात सर्वसामान्य म्हणून ओळखली गेली. पुराव्याशिवाय इतिहास नाही. प्रत्येक निवडलेला पुरावा हा सत्य कथन करणारा व विश्वासहार्य व्हावा, हा त्यामागील खरा हेतू होता. या परीक्षणात एक गोष्ट प्रामुख्याने विचारात घेतली पहिजे की, ज्या कागदपत्रांचा लेखक आहे त्याने त्याचे विचार व व्यक्तिमत्व हे त्याच्या लिखाणामध्ये उमटलेले असते. अशावेळेस इतिहासकाराने जे काही लिहलेले असेल त्याचा अर्थ लावलाच लागतो, पण त्या अर्थाच्या पलीकडेही एक वेगळाच अर्थ असतो. म्हणूनच कागदपत्रांच्या लेखकाचा हेतू व त्याचा प्रामाणिकपणा अंतरंग परीक्षणात तपासाला जातो. कारण लेखक ज्या घटनेविषयी लिहतो, ते तो स्वतःच्या भूमिकेतून लिहत असतो. त्यामुळे त्या लिखाणात त्याचा प्रामाणिकपणा तपासणे आवश्यक असते. त्यावरून साधनाची विश्वासार्हता आपणास कळू शकते.

अंतरंग परीक्षणाचे दोन भाग आहे

अ) सकारात्मक परीक्षण

ब) नकारात्मक परीक्षण

### अ) सकारात्मक परीक्षण

सकारात्मक परीक्षणाचा मूळ हेतू लेखातील आशय समजून घेणे हा असतो. एखाद्या विशिष्ट लेखात लेखकाने कोणती विधाने केली आहेत व त्याचा अर्थ काय**?** याचा

शोध हा संशोधकाला घ्यावा लागतो. संशोधकाला लेखातील खरा अर्थ हा समजून घ्यावा लागतो व तो अर्थ समजून घेण्यासाठी संशोधकाला त्याचा वाचार्थ्य गभीतार्थ तपासावा लागतो, याला संशोधनात Literal A Real Meaning असे म्हटले जाते. हा अर्थ समजून घेण्यासाठी संशोधकाला भाषेचे ज्ञान अवगत असणे गरजेचेच असते. भाषेच्या ज्ञानामुळे कागदपत्रांचा लेखक हा कोणत्या हेतूने लिहीत आहे हे त्याला समजू शकते. तसेच बराचवेळ कागदपत्रातील भाषेचा वापर हा काळानुसार व प्रदेशानुसार बदलत असतो. एखाद्या काळामध्ये प्रचलित असणारा शब्द हा नंतरच्या काळात लुप्त झालेला असतो, तसेच एकच शब्द हा वेगवेगळ्या काळात अथवा प्रदेशात वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. याशिवाय शहरी व ग्रामीण भागानुसार शब्दांचे अर्थ हे वेगवेगळे असतात. म्हणून संशोधकाला भाषेचे ज्ञान असणे आवश्यक असते.काही वेळेस पत्रलेखकांची भाषेवर एखाद्या विशिष्ट भाषेचा प्रभाव त्यावर असतो.

उदा. शिवकाळातील बहुतेक सर्व कागदपत्रांवर फारशी भाषेचा दाट प्रभाव पडलेला दिसतो. अशा कागदपत्रांचे परीक्षण करताना भाषा व शब्दप्रयोग यांच्यात गफलत होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

कधी कधी संशोधकाला व्याचार्थ्याबरोबरच गभीतार्थ ही समजून घ्यावा लागतो. म्हणजेच पत्रलेखकाला त्या लेखामधून काय सुचवायचे आहे हे समजून घेतले पाहिजे.

उदा. इंदिरा गांधी यांचे वर्णन एका लेखकाने The only man in the Cabinet असा केला आहे. याचा शब्दशः अर्थ हा वेगळा होतो. परंतु यामधून गभीतार्थ हा वेगळा निघतो. तो अर्थ म्हणजे मंत्रिमंडळात धाडसी निर्णय घेणारी एकमेव स्त्री. हा अर्थ नीट समजून घेतला की त्यामधून ध्वनित होणार अर्थ समजू शकेल. म्हणून संशोधकाने कागदपत्रांच्या मजकुरातील प्रत्येक विधानाचा खरा अर्थ समजून घ्यावयाचा असतो.

**आपली प्रगती तपासा :**

**१) बहिरंग परीक्षणाचा थोडक्यात आढावा घ्या.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**ब) नकारात्मक परीक्षण**

अंतरंग परीक्षणातील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे नकारात्मक परीक्षण होय. या प्रकारच्या टीकेला चांगल्या प्रकारची टीका असे देखील म्हणतात. एखाद्या लेखातील मजकुराची विश्वसनीयता ठरवण्यासाठी नकारात्मक परीक्षण महत्वाचे असते. लेखातील विधाने लेखकाने कोणत्या हेतूने केली आहेत, अशा विधानाचा संदर्भ, त्यावेळची परिस्थिती या घटकांची तपासणी या परीक्षणात केली जाते.



munotes.in

नकारात्मक परीक्षणात लेखकाच्या हेतूची, प्रामाणिकपणाची तपासणी केली जाते. याचबरोबर केलेली विधाने बरोबर आहेत का? नसल्यास त्याची कारणे कोणती यांचा अभ्यास केला जातो. प्रा. हॅकेटम्हणतात, 'नकारात्मक टीकेचा उद्देश एखाद्या विधानाशी विश्वसनीयता सिद्ध करणे असा नसतो, तर ही टीका शक्य असणाऱ्या प्रत्येक ठिकाणी संशय व्यक्त करते, असा एक सर्वसाधारण नियम आहे की, प्रत्येक विधानाबद्दल शंका घ्यावी. जोपर्यंत एखाद्या विधानाबद्दल योग्य पुरावा मिळत नाही तो पर्यंत.'

नकारात्मक परीक्षण करत असताना संशोधकाने खालील बाबी लक्ष्यात घ्याव्या

**१) लेखकाचा प्रामाणिकपणा**

ज्या साधनांचे संशोधक संशोधन किंवा परीक्षण करणार आहे, त्या साधनाच्या लेखकाच्या व्यक्तिमत्वाची, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीची, त्याची वैचारिक व बौद्धिक पातळी, त्याची मानसिकता या सर्व बाबिंची माहिती करून घेणे आवश्यक असते. या माहितीच्या आधारे संशोधकाला संदर्भ साधनांची विश्वसनीयता ठरवण्याचे काम सोपे होते.

**२) सत्य सांगण्याची क्षमता**

ज्या लेखकाने ही कागदपत्रे लिहली आहे त्याची पात्रता कोणती? ज्या घटनेचे वर्णन त्याने एखाद्या लेखात केलेले आहे ती घटना त्याने स्वतः जवळून पहिली आहे का? त्याने ती घटना स्वतः अनुभवली आहे का? अनेक वेळा घटना घडून गेल्यानंतर त्या लिहून ठेवलेल्या असतात, अशापैकी काही प्रकार आहे का? तसेच ती व्यक्ती कोणत्या सामाजिक व राजकीय दर्जाची होती हे तपासावे लागते यावरूनच संशोधकाला लेखकाची पात्रता समजून येऊ शकते.

**३) सत्य सांगण्याची क्षमता**

लेखकाची पात्रता तपासल्यानंतर आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे त्या व्यक्तीची सत्य सांगण्याची क्षमता तपासणे. एखादी घटना घडत असताना लेखक जर तिथे प्रत्यक्ष्य उपस्थित असेल तर घटना जशी घडली तसेच वर्णन तो आपल्या कागदपत्रांमध्ये देईल याची खात्री नसते. आपल्या सोयी नुसार त्यातील काही भाग लेखक आपल्या लिखाणातून वगळू देखील शकतो. त्यामुळे त्या लेखकाकडे सत्य सांगण्याची क्षमता आहे की नाही हे तपासावे लागते.

**४) सत्य सांगण्याची इच्छा**

लेखकाकडे सत्य सांगण्याची क्षमता व पात्रता य दोन्ही गोष्टी असूनही तो सत्य सांगेलच हे निश्चितपने सांगता येत नाही. काही वेळा जाणूनबुजून तर काही वेळा नकळतपणे लेखक सत्य सांगणार नाही, त्यामुळे अशा घटनांचा शोध संशोधकाला घ्यावा लागतो. काही वेळेस सत्य सांगितले तर पत्रलेखकांच्या हितसंबंधांना बाधा येण्याची शक्यता असते. तसेच काही



munotes.in

वेळेस लेखकाचा पक्षपातीपणा असतो. त्यामुळे त्या घटनेतील सत्य तो सांगत नाही. काही वेळा स्वतःच्या इच्छेप्रमाणे घटना घडल्याचे चित्र लेखक करतो तर केवळ साहित्यिक शैलीच्या हव्यासापोटी नेमके सत्य बाजूला राहते.

**५) निवेदनातील तंतोतंतपणा**

एखाद्या लेखातील निवेदनातील तंतोतंतपणा येण्यासाठी घटनेचा प्रत्यक्षदर्शी (Eye Witness) अतिशय महत्वाचा मानला जातो. लेखक हा जर एखाद्या घटनेचा प्रत्यक्षदर्शी असेल तर घटनेचे अचूक वर्णन होण्याची शक्यता असते. यामध्ये चुका देखील कमी राहतात. परंतु अशा घटनांमध्ये काही वेळेस सत्य व असत्याचे बेमालूम मिश्रण केले जाऊ शकते. तेव्हा ती ओळखण्याची क्षमता संशोधकांमध्ये असणे आवश्यक असते.

**६) स्वतंत्रपणे निश्चित होण्यासारखे**

इतिहास लेखकाने प्रस्तापित केलेली घटना स्वतंत्र असली पाहिजे. दोन साक्षीदारांचे कथन सारखेच असले पाहिजे व घटनेची सामान्यपणे विश्वासार्हता सिद्ध झाली पाहिजे. ही सिद्धता पूर्णपणे होईलच असे नाही परंतु ती बिनचूक व्हावी अशी अपेक्षा असते.

**आपली प्रगती तपासा :**

**१) अंतरंग परीक्षणाचा थोडक्यात आढावा घ्या.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.५ साधनांची सत्यता, विश्वासार्हता यांची मर्यादा

ज्यावेळेस एखादा संशोधक संशोधन करत असतो त्यावेळीस हाती आलेल्या पुराव्याच्या आधारे तो त्यामधील सत्य शोधून काढून आपले लिखाण करत असतो. परंतु या साधनांमध्ये देखील अनेक मर्यादा असतात. ते शोधून काढून आपल्या लेखातील सत्य बाहेर काढणे हे संशोधकाचे मुख्य कर्तव्य असते. या मर्यादा पुढीलप्रमाणे

१) पत्रलेखक हा दरबारी पगारदार नोकर असल्याने त्याच्या कडून सत्य हे लिहले जाऊ शकत नाही.

२) लेखक हा एखाद्या राजकीय पक्षाचा सदस्य असल्याने त्याची बरीचशी विधाने एकांगी व पक्षपातीपणची असू शकतात. तसेच त्याची विचारधारा ही एखाद्या राजकीय तत्वज्ञानाशी जोडली गेली असती.

३) अनेक वेळा धोरणात्मक गोष्टींवर लिहत असताना हेतू परस्पर त्यामध्ये अवास्तव माहिती नमूद केली जाते. ही बाब सर्व सरकारी धोरणांना लागू पडत असल्याने त्याचे परीक्षण करणे अवघड असते.

४) एखादा लेखक हा एखाद्या विशिष्ट्य धर्माचा असल्याने दुसऱ्या धर्माबद्दल लिहताना तो पूर्वग्रह आधारित विधाने करतो. उदा. मुघल काळातील इतिहासलेखन

५) एखादा लेखक हा विशिष्ट जातीचा अथवा समाजातील एखाद्या विशिष्ट हक्क असणाऱ्या गटाचा सभासद असतो. त्यामुळे दुसऱ्या समाजाबद्दल किंवा गटाबद्दल लिहत असताना तो कडवट विधाने करतो व आपल्या गटाचे समर्थन करत असतो.

**आपली प्रगती तपासा :**

**१) साधनांची सत्यता, विश्वासार्हता यांची मर्यादा कोणत्या आहेत?**

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.६ समारोप

इतिहास म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचा अभ्यास करणे होय. हा भूतकाळ समजून घेण्यासाठी साधनरूपी पुरावा हा आवश्यक मानला जातो. संशोधक हा संशोधन करत असताना अनेक संदर्भ साधने गोळा करत असतो. या गोळा केलेल्या साधनांची विश्वासार्हता व सत्यता तपासणे हे अतिशय जिकरीचे कार्य असते. कारण संशोधन करत असताना आपल्याला अनेक साधने हाती लागत असतात. अशा साधनांमधून योग्य व सत्य पुरावा आपल्या लेखासाठी वापराने आवश्यक असते. म्हणून हाती आलेल्या साधनांचे परीक्षण करणे आवश्यक आहे. या परीक्षणामध्ये दोन पद्धती या महत्वाच्या आहे. एक म्हणजे बहिरंग परीक्षण ज्यामध्ये हाती आलेल्या कागदपत्रांची विश्वसनीयता तपासण्यात येते. आणि दुसरी पद्धत म्हणजे अंतरंग परीक्षण होय, ज्यामध्ये कागद्पत्रातील मजकुरातील सत्यता तपासण्यात येते.

## २.७ प्रश्न

१) साधनांची विश्वासार्हता व सत्यता म्हणजे काय? हे सांगून बहिरंग परीक्षणाचा आढावा घ्या.

२) अंतरंग परीक्षणाचा आढावा घ्या.

३) साधनांची सत्यता, विश्वासार्हता यांची मर्यादा स्पष्ट करा.

## २.८ संदर्भ ग्रंथ

१) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००४

२) सरदेसाई बी.एन., इतिहासलेखन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५

३) राजदरेकर सुहास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८

४) सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११



munotes.in

५) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००२

६) Shaikh Ali, History its theory and Method, The Macmillan Company and India ltd., Madras, 1978

७) गाठाळ एस. एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०११

८) इतिहास लेखन परिचय, (स्टडी मटेरियल), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

९) इतिहासाचे सिद्धांत, (स्टडी मटेरियल), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ३

# स्त्रोतांचे भांडार

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ पुराभिलेखागार

३.३ डिजिटल अर्काइव्ह

३.४ वस्तुसंग्रहालय

३.५ आधुनिक ज्ञान भांडार

३.६ सारांश

३.७ प्रश्न

३.८ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

१) इतिहास संशोधनातील स्रोत भांडारांचा आढावा घेणे.

२) पुराभिलेखागारचे महत्व समजून घेणे.

३) डिजिटल अर्काइव्ह व आधुनिक ज्ञान भांडारांचा अभ्यास करणे.

४) वस्तुसंग्रहालयाचे महत्व जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना

इतिहास म्हणजे भूतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडामोडी व बदल आणि त्यांचा अभ्यास करणारे लिखाण म्हणजे इतिहास ग्रंथ होय. इतिहास हा साधनांच्या आधारे लिहला जातो. साधनांच्या मदतीशिवाय इतिहास लिहणे केवळ अशक्य आहे. थोडक्यात इतिहास लेखनाचा आत्मा म्हणजे साधने होत. म्हणून साधने म्हणजे, ज्या गोष्टी गतकालीन मानवी जीवनाविषयी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात माहिती देतात त्यांना साधने असे म्हणतात. थोडक्यात ज्यांच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ काढत येतो आणि इतिहास लेखनासाठी महत्वाची माहिती मिळते अशा वस्तू किंवा वास्तू आणि लिखित ताम्रपट किंवा कागदपत्रे यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. ही साधने संपादित करण्याची किंवा मिळवण्याचे अनेक ठिकाण असतात ते आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

इतिहास एक शास्त्र या दृष्टीने विसाव्या शतकात मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे. कोणत्याही शास्त्राचा मुख्य आधार साधने हा असतो. पुराव्यांच्याशिवाय कोणतीही माहिती हि शास्त्रामध्ये सिद्ध करता येत नाही किंबहुना पुराव्याशिवाय केलेले प्रतिपादन शास्त्रीय ठरू शकत नाही. म्हणून शास्त्रामध्ये पुरावा हा महत्वाचा असतो. प्रा. मायकल स्टॅनफोर्ड यांच्या



munotes.in

मते, 'ऐतिहासिक घटीते पुरावा निर्माण करतात व हेच पुरावे किंवा साधने ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्याशिवाय ऐतिहासिक ज्ञान प्राप्त होऊ शकणार नाही. पुराव्याशिवाय जे बोलले जाईल, लिहले जाईल त्याचे स्वरूप असे न राहता अंदाजाने काहीतरी सांगितले जाईल, असे असेल.'

## ३.२ पुराभिलेखागार

अभिलेख (Record) म्हणजे मानवाच्या प्रगतीचा आलेख दर्शवणारी कागदपत्रे होय. मो. वि. भाटवडेकर यांच्या मराठी शब्दकोशामध्ये अभिलेख शब्दाचा अर्थ, इतिहासाचे लिखित साधन, ऐतिहासिक कागदपत्र, ऐतिहासिक महत्वाचा आलेख, ताम्रपट, शिलालेख, सनद, असा दिला आहे. शासकीय भाषेत अभिलेख म्हणजे, 'जी कागदपत्रे अंगीकृत कार्यांच्या संदर्भात आणि कार्याचाच एक भाग म्हणून निर्माण होतात व ती काही काळ किंवा कायम स्वरूपात जपून ठेवावी लागतात.' ती कागदपत्रे म्हणजे अभिलेख होय.

प्राचीन काळी हाताने लिहलेला मजकूर म्हणजे पुराभिलेख होय व हे लेख लिहलेल्या हस्तलिखांचे दस्तावेज व पुरातन लेख ठेवण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय. पुराभिलेखागार म्हणजे पुरातन - जुने किंवा प्राचीन. अभिलेख शब्दाचा अर्थ दस्तावेज किंवा कागदपत्रे आणि आगार म्हणजे कागदपत्रे एकत्र ठेवण्याचे ठेवण्याचे ठिकाण म्हणजेच जुने दस्तवेज किंवा कागदपत्रे ठेवण्याचे ठिकाण म्हणजे पुराभिलेखागार होय.पुराभिलेखागारास इंग्रजी मध्ये 'Archives' अर्काइव्हस किंवा 'Record office' रेकॉर्ड ऑफिस असे म्हणतात. पुराभिलेखागाराला दप्तरखाना असेही म्हणतात. पुराभिलेखागारामध्ये मानवाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनावर प्रकाश टाकणारे जे पुरावे म्हणजेच साधने असतात त्यांना पुराभिलेखीय साधने असे म्हणतात.

पुराभिलेखागारमधील दस्तावेज इतिहास संशोधनासाठी अतिशय महत्वाची असतात. कारण ही कागदपत्रे अप्रकाशित असून प्राथमिक, अस्सल व अव्वल स्वरूपाची असतात. त्यामुळे या साधनाच्या आधारे केलेले संशोधन हे विश्वसनीय मानले जाते. या साधनांच्या आधारे अज्ञात इतिहासावर भर टाकता येते. पुराभिलेखागारमध्ये खाजगी व वैयक्तिक दस्तावेज, सरकारी कागदपत्रे व इतिहासाची साधने व्यवस्थित व काळजीपूर्वक जतन करून ठेवलेली असतात. पुराभिलेखागारमधील अस्सल कागदपत्रांच्या आधारे राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक इतिहासाची वास्तव मांडणी करता येते.

**प्राचीन व मध्ययुगीन काळातील पुराभिलेख**

पुराभिलेख म्हणजे हाताने लिहलेले लिखाण होय. प्राचीन भारतात कागदाचा शोध लागण्यापूर्वी झाडाच्या सालीपासून विशेषतः शालवृक्षाच्या सालीपासून तयार केलेले ताडपत्र किंवा ताडपत्र लिखाण करण्यासाठी वापरले जात. ताडपत्रावरील हस्तलिखिते पिढ्यानपिढ्या जतन करून ठेवली जात. कालांतराने त्या प्रतींची नक्कल करून त्या प्रतीची दुसरी प्रत बनवली जात असे. त्यामुळे या हस्तलिखित ग्रंथाचे इतिहासामध्ये विशेष महत्व आहे. थोडक्यात ही साधने पुराभिलेखीय साधने म्हणून अशी हस्तलिखिते जतन केली जाऊ लागली. भारतात प्राचीन काळापासून अशी अनेक ग्रंथ ज्यामध्ये वेद, आरण्यके, ब्राह्मणे,

munotes.in

दीपवंश, महावंश, सातवाहन कालीन हालची गाथासप्तहशती, कौटिल्याचे अर्थशास्त्र हे प्राचीन काळातील पुराभिलेख आहे. याव्यतिरिक्त हिंदू धर्मातील शैव, वैष्णव, शक्तिपंथ, शाक्त, नाथ पंथ, महानुभाव पंथ, आणि जैन व बौद्ध धर्म ग्रंथ, बाणभट्टचे हर्षचरित्र, विशाखादत्तेचे बुद्धचरित्र, प्राचीन भारतातील नाटके, चिनी प्रवाशांचे प्रवासवर्णने, धार्मिक वाङ्मयाचे दस्तावेज हे पुराभिलेखागार मध्ये जतन करून ठेवले आहे.पुढील काळात कागदाचा व छापखान्याचा शोध लागल्यामुळे हस्तलिखिते छापील ग्रंथ स्वरूपात तयार होऊन त्याच्या अनेक प्रति काढल्या जाऊ लागल्या. अशा दुर्मिळ ग्रंथाचे जतन हि पुराभिलेखागारमध्ये केले जाऊ लागले.

## पुराभिलेखागारांची स्थापना

ग्रीक व रोमन साम्राज्याच्या अस्तित्वापासून युरोपमध्ये कागदावर लिखाण करण्याची परंपरा दिसून येते. युरोपमध्ये दप्तरखान्याची सुरवात फ्रेंच राज्यक्रांतीपासून सुरु झाली. फ्रांस मध्ये १७८९ मध्ये राष्ट्रीय अभिलेखागाराची स्थापना झाली. इंग्लंड मध्ये १८३८ मध्ये ' पब्लिक रेकॉर्ड ऍक्ट ' नंतर शासकीय अभिलेखागार स्थापन करण्यात आले. परंतु भारतात ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन करण्याची जाणीव युरोपियन देशांप्रमाणे नव्हती. भारतात मध्ययुगीन काळात मुघल कालखंडामध्ये राजघराण्यांनी शासकीय कागदपत्रे जतन केल्याचे आढळून येते. म्हणजेच शासकीय दप्तरखाने मध्ययुगीन कालखंडापासून स्वरक्षित केले जात होते परंतु त्याचे स्वरूप आजच्या सारखे नव्हते. ही कागदपत्रे स्वरक्षित केल्यामुळे मध्ययुगीन इतिहासाची साधने मोठ्या प्रमाणावर आज उपलब्ध आहेत.

भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्यांनी दप्तरखान्याकडे विशेष लक्ष दिले. ब्रिटिशांनी भारतात राज्यकारभाराच्या सोयीसाठी भारतात विविध प्रांतांची निर्मिती केली. ज्यामध्ये बंगाल, मुंबई, मद्रास असे प्रांत होते. व तेथेच प्रांतांचे दप्तरखाने सुरु केले. ब्रिटिशांनी भारतात सर्वप्रथम १८१८ मध्ये मद्रास येथे पहिल्या पुराभिलेखागाराची तर १८१९ मध्ये कलकत्ता येथे दुसऱ्या पुराभिलेखागाराची स्थापना केली. १५ सप्टेंबर १८२१ मध्ये मुंबई येथे पुराभिलेखागारची स्थापना केली. ब्रिटिशांची सत्ता भारतात अबाधित राहावी, इंग्लंड मधून भारतात येणाऱ्या अधिकाऱ्यास भारताबद्दलची माहिती मिळावी, व राज्यकारभार करणे सोयीचे व्हावे, यासाठी इंग्रजांनी भारतात पुराभिलेखागारांची स्थापना केली.

## महाराष्ट्रातील प्रमुख पुराभिलेखागार

भारतात १९१९ मध्ये ऐतिहासिक पुराभिलेखागार आयोगाची स्थापना करण्यात आली. व १९२९ पासून सर्व अभिलेखागार भारतीयांसाठी खुले करण्यात आले. भारतातील सर्वात मोठी राष्ट्रीय अभिलेखागार संस्था ही नवी दिल्ली येथे आहे. महाराष्ट्रात देखील काही महत्वाची पुराभिलेखागार आहेत ती पुढीलप्रमाणे

### १) मुंबई येथील शासकीय अभिलेखागार (१८२५)

मुंबई येथील एल्फिन्स्टन महाविद्यालयात १८२५ मध्ये शासकीय अभिलेखागार सुरु करण्यात आले होते.याअभिलेखागारमध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतची कागदपत्रे आहेत. या कागद्पत्रांमधून आर्थिक,राजकीय, सामाजिक, धार्मिक, न्यायालयीन, लष्करी, शिक्षण, व्यापार, दळणवळण, इ. घटकांची माहिती मिळते.

### २) पुण्याचे शासकीय अभिलेखागार (पुणे दप्तर)

पेशवे दप्तरात एकूण ४ कोटी कागदपत्रे असून यामध्ये पेशवेकालीन व ब्रिटिश राजवटीची कागदपत्रे आहेत. ही सर्व कागदपत्रे मराठी, इंग्रजी, कानडी, पर्शियन व मोडी भाषेतील आहेत. महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचे अभिलेखागार म्हणून हे ओळखले जाते.

### ३) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

इ.स. १९१० मध्ये पुणे येथे वि. का. राजवाडे व मेहंदळे यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना केली. हे एक खाजगी संशोधन मंडळ आहे. यामध्ये खाजगी दैनंदिनी, हिशोब, रोजकीर्द अशी कागदपत्रे मिळून मंडळाकडे संग्रह असून खाजगी दप्तरांपैकी भारतातील सर्वात मोठा मानला जातो.

### ४) डेक्कन कॉलेज पुराभिलेखागार

डेक्कन महाविद्यालयातील पुराभिलेखागारामध्ये २५,००० कागदपत्रे आहेत. यामध्ये विविध हस्तलिखिते, भुजपत्रे, दान दर्शवणारे ताम्रपट, दुर्मिळ ग्रंथ, नकाशे, चित्रे, आराखडे असा अमूल्य ठेवा आहे. या दप्तरखान्यात चिटणीस, मोहिते, घाटगे, निंबाळकर, केसरकर, महाडिक, देशमुख, होळकर, भोसले, शिवापूरचे देशपांडे, जगताप, नंदुरबारकार इ. घराण्यांची कागदपत्रे आहेत.

याव्यतिरिक्त कोल्हापूर येथील अभिलेखागार (कोल्हापूर संस्थांची कागदपत्रे),विदर्भ अभिलेखागार, अहमदनगरचे वस्तुसंग्रहालय, मराठवाड्याचे इतिहास संग्रहालय, नांदेडचे गोदातीर संशोधन मंडळ, नागपूरचे पुराभिलेखागार (येथे नागपूरचे भोसले घराणे व गोंड राजाचे दस्तावेज आहेत) इ. अभिलेखागार प्रमुख आहे.

## पुराभिलेखागाराची वैशिष्ट्ये

१) यामध्ये मूळ लिखित पुरावे, दस्तावेज व कागदपत्रे जतन करून ठेवले जातात. ज्यामुळे मानवी संस्कृतीची वारसा व परंपरा यांचे जतन होते.

२) पुराभिलेखागारातील दस्तावेज व कागदपत्रे यांची रजिस्टर मध्ये नोंद केलेली असते व विशिष्ट क्रमाने रुमाल बांधून ठेवलेले असतात.

३) येथील कागदपत्रांचा उपयोग संशोधनाशिवाय सरकारी अधिकाऱ्यांना धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

४) सरकारच्या विविध खात्यातील महत्वाची कागदपत्रे येथे सुरक्षित व जतन केले जातात.

५) येथील कागदपत्रावरुन मानवाच्या आलेल्या सर्वांगीण प्रगती, विकास व परिवर्तनाचा इतिहास समजतो.

**आपली प्रगती तपासा :**

**१) पुराभिलेखागारा बद्दल सविस्तर माहिती लिहा.**

---

---

---

---

## ३.३ डिजिटल अर्काइव्ह (Digital Archive)

कोणत्याही इतिहास संशोधनासाठी ऐतिहासिक साधने ही संशोधकांना उपलब्ध असणे आवश्यक असते. इतिहासाची मूळ साधने ही संशोधकांना उपलब्ध राहावी म्हणून त्याचे जतन करणे आवश्यक आहे. या आवश्यकते मधूनच 'पुराभिलेखागार' ही संकल्पना विकसित झाली. मूळ प्राथमिक साधने जतन व संरक्षण करण्याचे काम हे पुराभिलेखागार करत असते. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे डिजिटल माहितीची निर्मिती व वापर हा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. माहितीचा साठा करण्याच्या संगणकीय सर्व्हरच्या क्षमतेत प्रचंड वाढ झाली आहे. इंटरनेट क्रांतीमुळे जगभरातील सर्वर व संगणक हे एकमेकांशी जोडले गेले आहे. तसेच इंटरनेटमुळे माहिती अपलोड व संग्रहित करण्याचा वेगदेखील वाढला आहे. डिजिटल माहिती हि ग्रंथअथवा कागदपत्रांप्रमाणे काळानुसार जीर्ण होत नाही.त्यामुळे त्यांच्या स्वरक्षणाची गरज नसते.

डिजिटल अर्काइव्ह स्थापन करण्यामागे आणि त्याची जपणूक करण्यामागे मुख्यतः दोन उद्देश असतात.एक म्हणजे मौल्यवान डिजिटल माहितीचा ह्रास होऊ न देता पुढील संशोधकांसाठी ती सुरक्षित करणे. दुसरा म्हणजे डिजिटल अर्काइव्ह मध्ये कुठल्याही प्रकारचा तांत्रिक दोष निर्माण होणार नाही याची खबरदारी घेणे. डिजिटल अर्काइव्ह मध्ये पुराभिलेखागाराप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रूपांतर केले जाते. डिजिटल अर्काइव्ह जतन केलेली माहिती संशोधकांना ऑनलाईन अथवा ऑफलाईन उपलब्ध होऊ शकते.

### डिजिटल अर्काइव्हचे प्रकार किंवा स्वरूप

डिजिटल अर्काइव्हचे साधने मांडण्याच्या स्वरूपात साधारण पणे तीन प्रकार आहेत.

**१) शासकीय पुराभिलेखागार**

या गटातील डिजिटल अर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागार, विद्यापीठे, संग्रहालये, शासकीय संस्था, इतिहास विषयक संस्था किंवा सांस्कृतिक मंडळाद्वारे चालवले जाते. या गटातील डिजिटल अर्काइव्ह शक्यतो मोफत असतात किंवा नाममात्र शुल्क यासाठी आकारली जाते. उदा. नवी दिल्ली येथील नॅशनल अर्काइव्ह मध्ये 'अभिलेख पटल' मध्ये ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन डिजिटल स्वरूपात केलेले आढळते. त्याचप्रमाणे पुणे येथील भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट मध्ये अश्याच प्रकारे ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन केलेले आढळते.

**२) स्वयंसेवी संस्था**

या प्रकारातील अर्काइव्ह कोणत्याही एका व्यक्तीद्वारे, लोकांच्या छोट्या समूहाद्वारे, अथवा स्वयंसेवी संस्थेद्वारे स्थापन केलेली असतात. या गटातील अर्काइव्ह हे एखाद्या विशिष्ट आणि सामाजिक गरजेनुसार बनवलेले असते. उदा. एखाद्या ऐतिहासिक घराण्याच्या किंवा एखाद्या संशोधकाच्या किंवा संशोधन संस्थेच्या संग्रहातील दस्तावेज. जसे की, महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळातील ऐतिहासिक दस्तावेज डिजीटाईज करून वेबसाईट वर उपल्बध आहे.

**३) विविध व्यावसायिक संस्था**

एखादे विशिष्ट्य प्रकाशन किंवा व्यावसायिक संस्थांद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना तसेच ग्रंथालयांना डिजिटल अर्काइव्ह हे सशुल्क उपलब्ध करून दिले जातात. यामध्ये संशोधक आपल्या संशोधनाच्या विषयानुसार माहिती ही गोळा करू शकतो.

थोडक्यात, तंत्रज्ञाच्या प्रगतीमुळे संशोधकाला होणाऱ्या फायद्याचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे डिजिटल अर्काइव्ह होय. डिजिटल अर्काइव्ह मुळे दुर्मिळ ग्रंथ व दस्तावेजांचे खात्रीलायक जतन करता येते. यामुळे पुढील अनेक पिढयांना ऐतिहसिक दस्तावेज हे उपल्बध होऊ शकतात.

**आपली प्रगती तपासा :**

**१) डिजिटल अर्काइव्ह बद्दल सविस्तर माहिती सांगा**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.४ वस्तुसंग्रहालय

इतिहास म्हणजे गतकाळात घडून गेलेल्या मानवी जीवनातील घटना, घडामोडी व बदल आणि त्यांचे दर्शन करणारे लिखाण म्हणजे इतिहास ग्रंथ होय. म्हणजे इतिहास लेखनात गतकालीन मानवी जीवनाचा आढावा व परिवर्तनाचा आलेख रेखाटलेला असतो. असा आलेख तयार करण्यासाठी साधन सामुग्रीची आवश्यकता असते. ही ऐतिहासिक साधनसामुग्री कागदपत्रे, इमारत, मंदिरे, कला, वस्तू इत्यादी स्वरूपात उपलब्ध असतात. गतकाळातील घडामोडी दृष्टीआड गेलेले असतात. त्या प्रत्यक्ष डोळ्यांनी बघता येत नाहीत अनुभवता येत नाहीत. त्यामुळे इतिहास लेखकाला त्याची माहिती प्रत्यक्ष स्वरूपात होत नाही. ती त्याला अप्रत्यक्ष प्रकारांनी करून घ्यावी लागते. गतकाळाची असे प्रत्यक्ष ज्ञान, माहिती आपल्याला तत्कालीन कागदपत्रे किंवा वस्तूंच्या रूपाने मिळू शकतात. या आधारावर इतिहासाचं पुर्नलेखन किंवा पुर्ननिर्मिती करावयाचे असते. त्यामुळेच इतिहास लेखनामध्ये या साधनसामग्रीचा कच्चा माल म्हटलं जातं. इतिहासाची संदर्भ साधने किंवा कागदपत्रे इतिहास लेखन प्रक्रियेत महत्त्वाचा भाग आहेत. संदर्भ साधनांचे प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम असे दोन मुख्य प्रकार आहेत. इतिहास संशोधकास ही दोन्ही साधने एकाच वेळी उपयोगी पडतील असे नाही. इतिहास लिहिण्यासाठी एखाद्यावेळी त्यास दुय्यम साधनांची ही गरज भासणार नाही. असे असले तरी दुय्यम साधनांचे महत्त्व कमी होत नाही. ज्या ठिकाणी प्राथमिक साधने अपुरी पडतात, तेथे एखादा मुद्दा किंवा संदर्भ हा दुय्यम साधनांमधून मिळू शकतो. तेव्हा दुय्यम साधने ही इतिहास लेखनासाठी तितकीच महत्त्वाची आहेत. एकोणिसाव्या शतकापासून शास्त्रीयपद्धतीने इतिहासाचा अभ्यास होऊ लागला. त्या अनुषंगाने ऐतिहासिक साधनांची वर्गवारी केली. साधनांचा वापर कसा करायचा? त्यातील सत्याचा शोध कसा घ्यायचा? याविषयी स्थूलमानाने काही नियम, काही निकष ठरवून दिले आहेत. काळाच्या ओघात नवीन नवीन साधने उपलब्ध होऊ लागली. विशेषत: एकोणिसाव्या शतकापासून इतिहासाच्या पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र यासारख्या सहाय्यकारी शास्त्रांचा विकास होऊ लागला. त्याबरोबर साधनसामग्रीत भर पडत गेली.

ऐतिहासिक साधने मुख्यतः दोन प्रकारचे असतात लिखित व अलिखित. लिखित साधने यांचे पुन्हा प्राथमिक व दुय्यम असे दोन भाग पडतात. इतिहासाचे साधन म्हणून प्राथमिक, दुय्यम व अलिखित साधने कमी अधिक प्रमाणात सारखेच महत्त्वाचे आहे. ऐतिहासिक साधनांचे आणखीन एक वैशिष्ट्य असे की सर्व साधने परिपूर्ण कधीच होऊ शकत नाहीत.

## ५.३ प्राथमिक ऐतिहासिक संदर्भ साधने

ज्यावेळी घटना घडत असते, तेव्हा एखाद्या व्यक्तीने ती घटना जर स्वतःच्या डोळ्याने पाहिली असेल तर त्यापासून निर्माण होणाऱ्या साधनाला प्राथमिक साधने म्हणतात. प्राथमिक साधने ही मूलभूत स्वरूपात, कच्चा अवस्थेत व अपूर्ण अवस्थेत असतात. इतिहास लेखनप्रक्रियेत प्राथमिक साधने अतिशय महत्त्वाची असतात. अशी प्राथमिक साधने विविध

ठिकाणी विखुरलेले असतात, तेव्हा त्यांना एकत्र करून त्यांमध्ये सुसंवाद साधण्याचे काम संशोधकाला करावे लागते. प्राथमिक साधने लिखित व अलिखित अशा दोन उपप्रकारात विभागली जातात. लिखित साधनामध्ये प्रामुख्याने कागदपत्रांचा किंवा हस्तलिखितांचा समावेश होतो. तर अलिखित साधनांमध्ये जुन्या इमारती, स्मारके शहरे, समाध्या, शिलालेख, नाणी, पुरातत्व संशोधनातून पुढे आलेली साधने यांचा यामध्ये समावेश होतो.

### ५.३.१ प्राथमिक लिखित ऐतिहासिक साधने

लिखित साधनांत निरनिराळ्या भाषांमधील ग्रंथ, शकावल्या, करीने, वंशावळी, मआसिर, बखरी, तवारिखा, कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख, नामे इत्यादिंचा समावेश होतो. अलिखित साधनांत पुरातत्त्वीय वस्तू, भांडी, आयुधे, चित्रे, शिल्पे, वास्तू व स्मारके यांचा समावेश होतो. याशिवाय इतिहाससाधनांच्या भाषेवरून उदा., मराठी, फार्सी, डच, इंग्रजी इ. गतकालीन वाटचालीचे पुरावे धुंडाळत ज्या अनेक गोष्टी हाती येतात, त्या सर्वांचे विश्लेषण केले जाते. त्यांची अस्सलता तपासली जाते. उपलब्ध झालेला पुरावा म्हणजेच इतिहासाचे साधन कुठल्या संदर्भातले आहे ? कोणत्या काळातले आहे ? संदर्भीय घटनेशी कितपत संबंधित आहे ? याचा विचार केला जातो.

#### ५.३.१.१ समकालीन ऐतिहासिक कागदपत्रे

एखाद्या घटनेसंबंधी सूचना देण्याच्या उद्देशाने किंवा घटनेमध्ये सहभागी असलेल्या व्यक्ती स्मरण करून देण्याच्या हेतूने लिहिलेली कागदपत्रांना समकालीन कागदपत्र म्हणतात. या कागदपत्रांचा उपयोग त्या काळातील हालचाली समजण्यासाठी होतो. समकालीन कागदपत्र ही भारतीय इतिहास लेखनामध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळानुसार बदलत असलेली दिसून येतात. उदाहरणात उत्खननातून मिळालेले खापराचे तुकडे, मूर्ती, अवजारे, मूर्तीचे भग्नावशेष, नाणी वगैरे अलिखित मूळ साधने आहेत. समकालीनत्वाच्या निकषानुसार वृत्तपत्र देखील मूळ साधन होय. अलिकडचे आकाशवाणीवरील व दूरदर्शन वरील येणारी बातमीपत्रे, छायाचित्रे, चलचित्रे, चित्रफिती, ध्वनीफिती ही सर्व अलीकडच्या काळातील प्राथमिक साधने आहेत. याचा थोडक्यात निष्कर्ष असा की अभ्यास विषयाशी संबंधित समकालीन साधने ही प्रामुख्याने मूळ साधने असतात. मूळ साधनांची विश्वसनीयता ही त्यातील सत्यावर अवलंबून असते. सर्वसाधारणपणे अव्वल दर्जाची मानली जाणारी काही समकालीन साधने पूर्णपणे विश्वासनीय असतीलच असं नाही. उदाहरणार्थ आत्मचरित्र हे सामान्यता अव्वल दर्जाचे मानले जाते. परंतु हयातीत आत्मचरित्र लिहिले असेल तर त्यातील बरेचसे लिखाण स्मृतीच्या आधारे केलेल्या असल्यामुळे आणि उतरत्या वयात विस्मृती होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यातील सर्व तपशील सत्य म्हणून स्वीकारणे धोक्याचे ठरते. अशावेळी इतर पुराव्यांच्या आधारे त्यातील सत्याची शहानिशा करून घेणे आवश्यक ठरते. या समकालीन कागदपत्रांमध्ये रणांगणावर सेनाधिकाऱ्याने इतरांना पाठविलेली पत्रे, कोर्टामधील कागदपत्रे, कायदेमंडळातील कागदपत्रे, यांचाही समावेश होतो.

#### ५.३.१.२ ऐतिहासिक गुप्त पत्रव्यवहार

ऐतिहासिक प्राथमिक साधन म्हणून गुप्त पत्रव्यवहाराला अधिक महत्व आहे. ते समकालीन कागपत्राइतके विश्वसनीय नसतात, कारण ते घटना घडून गेल्यानंतर तयार केलेली असतात.

पण त्यातील माहिती विश्वसनीय व महत्त्वाची ठरते. ही कागदपत्र प्रकाशित केली जात नाहीत. गुप्त पत्रव्यवहार अधिकारीवर्ग सरकार यांच्यामध्ये असू शकतो. गुप्त पत्रव्यवहारामध्ये रोजनिशांचा समावेश होतो. उदा. मराठा इतिहासामध्ये 'वाड डायरीज' यांना महत्त्व आहे.

### ५.३.१.३ सार्वजनिक ऐतिहासिक कागदपत्रे

या कागदपत्रांमध्ये सर्वांसाठी दिलेले आदेश असतात. ही कागदपत्रे पुढीलप्रमाणे असतात. वृत्तपत्रे एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाला लिहून पाठवलेली बातमी म्हणजे वृत्तपत्र, आठवणी व आत्मवृत्त. प्रतिष्ठित व्यक्ती आपल्या आठवणी किंवा आत्मचरित्र. यामुळे एका विशिष्ट कालखंडाची माहिती मिळते.

### ५.३.१.४ सरकारी कागदपत्रे

सरकारी कागदपत्रांचे तीन भाग पडतात अ) राज्यकारभाराची ऐतिहासिक कागदपत्रे, या कागदपत्रांमध्ये तत्कालीन राज्यकारभार विषयक परिस्थितीचा उल्लेख असतो. ब) परराज्यातील अधिकाऱ्यांनी पाठविलेली ऐतिहासिक पत्रे, राजकीय पत्रव्यवहार, सरकारी व्यवहाराची पत्रे, सनदा, खंडणी पत्रे, रोखे मुलकी अधिकाऱ्यांची हुकूमनामे, सनदी नोकरांच्या संरक्षणासाठी काढलेली हुकूमनामे इत्यादी क) खाजगी पत्रे, इनाम पत्रे, सनदा, दानपत्रे, अनुदान पत्रे, महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींची खाजगी पत्र व्यवहार इत्यादी.

### ५.३.१.५ ऐतिहासिक जमाखर्चाच्या नोंदी

ऐतिहासिक राज्यकारभारतील जमाखर्च हा पुरावा म्हणून अत्यंत महत्वाचा मानला जातो. मुलकी सेवा, लष्करी सेवा, रेल्वे सेवा, खाजगी किंवा स्वयंसेवी संस्थेचे जमाखर्चाचे हिशोब हे इतिहासाच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. मराठा कालखंडमध्ये प्रत्येक ऐतिहासिक घराणी जमाखर्चाचे हिशोब लिहून ठेवत असत. अशा घराण्याचा इतिहास लिहीत असताना हे साधन प्राथमिक साधन म्हणून उपयोगी ठरतो.

### ५.३.१.६ धार्मिक संस्थांचे पत्रव्यवहार

यामध्ये आर्थिक व्यवहार, आध्यात्मिक मार्गदर्शन, धार्मिक स्थळांचे जतन इत्यादीची माहिती मिळते. या पत्रव्यवहारातून तत्कालीन स्वरूपाचे सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक माहिती मिळते. तसेच तत्कालिन समाजाचे सांस्कृतिक प्रगती लक्षात येते. अशा धार्मिक संस्थामधून चालत आलेल्या विविध उपक्रमांची माहिती मिळण्यास मदत होत

### ५.३.१.७ ऐतिहासिक तह किंवा करार

कोणत्याही दोन राज्यात किंवा कोणत्याही देशात होणारे तह किंवा करार हे ही इतिहासाचे प्राथमिक साधन आहे. या तहातून आपल्याला युद्धापूर्वीची आणि युद्धानंतरची राजकीय परिस्थिति कशी होती याची जाणीव होते. अशा कागदपत्रांचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यास अनेक घटनांची माहिती मिळते. आज जगातील अनेक देशांमध्ये आर्थिक, तांत्रिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्वरूपाचे करार होत असतात. हे करार व त्यासंबंधीची मूळ कागदपत्रे ही इतिहास संशोधनाच्या दृष्टीने अस्सल प्राथमिक साधनेच असतात.

### ५.३.१.८ वैयक्तिक रोजनिशा व खाजगी पत्रव्यवहार

कोणत्याही देशाच्या राजकीय किंवा सामाजिक इतिहासवार प्रभाव टाकणारी व्यक्ती ही स्वत: रोजनिशी लिहीत असते. त्यामुळे इतिहासाचे साधन म्हणून रोजनिशीला महत्व आहे. या रोजनिशीतील नोंदी तत्कालीन सामाजिक व राजकीय जीवनावर प्रकाश टाकत असतात. पण रोजनिशीतील माहिती अतिशयोक्तिपूर्ण व खोटीही असू शकते. दोन राजकीय, लष्करी, सामाजिक, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमधील खासगी पत्रव्यवहार हे ही इतिहास लेखनातील महत्त्वपूर्ण प्राथमिक साधन आहे. अशा पत्रातूनही तत्कालीन सामाजिक, राजकीय बाबींवर प्रकाश टाकता येतो. पण ही पत्रे एकांगी, पक्षपाती व पूर्वग्रहदूषित असू शकतात.

### ५.३.१.९ ऐतिहासिक आत्मचरित्रे व आठवणी

ऐतिहासिक आत्मचरित्रे हे सर्वसाधारणपणे आयुष्याच्या शेवटी लिहिली जातात. थोर व्यक्तींची आत्मचरित्रे आपल्याला तत्कालीन कालखंडाच्या अभ्यासासाठी महत्वाचे साधन ठरतात. उदा. पं. नेहरू 'भारताचा शोध', हिटलर'माझा संघर्ष', महात्मा गांधी- 'माझे सत्याचे प्रयोग' इ. आत्मचरित्रे व आठवणी यांचा इतिहासलेखनात वापर करीत असताना काळजी घ्यावी लागते.

### ५.३.२. प्राथमिक अलिखित ऐतिहासिक साधने

प्राथमिक साधनांमध्ये ऐतिहासिक अलिखित साधनेही अत्यंत महत्त्वाची आहेत. कारण ही साधने त्या त्या काळाची साक्षीदार असतात. ही साधने शतकानुशतके टिकून असतात. या साधनामध्ये फेरफार करता येत नाही. पुरातत्वीय साधनांमध्ये दैनंदिन जीवनातील असंख्य वस्तूंचा समावेश होतो. या वस्तू उखनांतून सापडतात. किंवा गेल्या तीनचारशे वर्षातल्या या वस्तू लोकांच्या संग्रही असतात, त्यांच्याकडून वस्तुसंग्रहालयात येतात व अभ्यासल्या जातात. हडप्पा मोहेंजोदारो येथील अश्या प्रकारच्या अवशेषांवरून सिंधू संस्कृतीतील लोकांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवन रेखाटले गेले आहे. मंदिर, लेणी, किल्ले, वडे, गढ्या मशिदी, गुरुद्वारे, चर्चेस हीदेखील इतिहासाची पुरातत्वीय साधने. या इमारतींवर असलेले शिलालेख हा तर अत्यंत विश्वसनीय पुरावा. लेण्यांमधील आणि मंदिराच्या बाह्य भिंतीवरील शिल्पाविष्कार हा गतकालीन वाटचालीचा कला अभिव्यक्तीचा पुरावा. त्याआधारे प्राचीन भारतीय कलेचा इतिहास रेखाटला जातो, त्याचप्रमाणे धार्मिक इतिहासाचे स्वरूपही स्पष्ट होते.

### ५.३.२.१ प्राचीन वस्तूंचे अवशेष ,सांगाडे

ऐतिहासिक उत्खननात, अन्य संशोधनात वा सर्वेक्षणात सापडलेल्या वस्तू-वास्तू यांना स्थूलमानाने पुरातत्त्वीय अवशेष म्हणतात. पुरातत्त्वविद्येचा हेतू मानवाने मागे ठेवलेल्या वस्तूरूप पुराव्यांवरून सांस्कृतिक इतिहास उभा करणे हा आहे. पुरातत्त्वीय संशोधनाची व्याप्ती आणि उपलब्ध पुराव्याचे अर्थबोधन या दोन्हींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. अठराव्या शतकात योहान विंकलमान याने पुरातत्त्वविद्या म्हणजे प्राचीन कलांच्या अभ्यास अशी व्याख्या केल्याने पुरातत्त्वीय अवशेषांचा अभ्यास केवळ कलात्मक वस्तूंपुरताच मर्यादित राहिला होता. उत्खननात सापडलेल्या वस्तू वा वास्तू म्हणजेच मातीची भांडी, हत्यारे,

शस्त्रास्त्रे, खेळणी, शिक्के, सौंदर्य प्रसाधनांच्या वस्तू आदि आवशेष सापडतात. या आवशेषवरून आपल्याला तत्कालीन संस्कृतीचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक जीवनाची माहिती मिळते. अशा वस्तूंच्या कालमापणासाठी कार्बन १४ कालमापन पद्धतीचा उपयोग केला जातो. या प्राचीन वस्तू म्हणजे त्या त्या काळातील माहिती देणारी इतिहासाची अस्सल प्राथमिक साधनेच असतात. गेल्या दोन शतकांत पुरातत्त्वविद्येची व्याप्ती आणि ध्येय विस्तृत झाले असल्याने, हर तऱ्हेच्या पुरातत्त्वीय अवशेषांना एक नवा अर्थ प्राप्त झाला आहे. केवळ कलावस्तूच म्हणून नव्हे, तर मानवाशी संबंध दाखविणाऱ्या विविध लहानसहान अवशेषानाही महत्त्व प्राप्त झाले आहे. पुरातत्त्वीय अवशेषांत अनेक प्रकारच्या वस्तूंच्या समावेश करता येतो. अश्मयुगीन हत्यारे, प्राचीन वास्तु त्याचप्रमाणे मातीत सापडणारे लहानसहान धान्यकण किंवा लहान आकाराचे दगडाचे वा इतर मणी अशा छोट्यामोठ्या वस्तूंचा पुरातत्त्वीय अवशेष या वर्गात समावेश करता येतो. किंबहुना कोणतीही शंभर वर्षांइतकी जुनी वस्तू नवीन अँटिक्विटीज अँड आर्ट ट्रेझरर्स अँक्ट -१९७२ या कायद्याप्रमाणे पुरातत्त्वीय अवशेष मानली जाते.

पुरातत्त्वीय अवशेषांचा शोध अचानकपणे त्याचप्रमाणे काही शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करून वा हवाई छायाचित्रणाच्या साहाय्याने लागतो. दंतकथा, ताम्रपट वा शिलालेख यांतील उल्लेख, वैशिष्ट्यपूर्ण ग्रामनामे, प्राचीन वाङ्मयात वा प्रवासवर्णनात उल्लेखिलेली उल्लेखनीय प्राचीन शिल्पे वा वास्तू यांचे अस्तित्व इत्यादींच्या अनुरोधाने पुरातत्त्वीय अवशेष सापडू शकतात, हे जितके खरे तितकेच अलीकडे काही शास्त्रीय पद्धतींच्या वा उपकरणांच्या साहाय्याने भूगर्भात दडलेले अवशेष व त्यांचे स्वरूपाची शहानिशा करून घेता येते. त्याचप्रमाणे सर्वेक्षण नकाशांच्या मदतीने प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन प्राचीन अवशेषांचा शोध घेता येतो. अठराव्या -एकोणिसाव्या शतकांत काही पुरातत्त्वीय अवशेषांचा शोध अवचितपणे लागला, हेही नमूद करणे आवश्यक आहे. घरांचे पाये खणताना, रेल्वे लाईन टाकताना तसेच रस्तारुंदीत अचानकपणे प्राचीन अवशेष उघडकीस येतात. पाकिस्तानातील लाहोर-मुलतान रेल्वेमार्ग टाकण्याचे काम चालू असताना त्याखाली भक्कम पाया म्हणून ठेकेदार हडप्पा टेकाडातील वास्तूंच्या विटा मोठ्या प्रमाणावर आणू लागला व त्यातून हडप्पा संस्कृतीचा शोध लागला. परंतु आता हा अवचितपणा कमी होत चाललेला असून योजनापूर्वक समन्वेषण व शास्त्रीय पद्धतींचा अवलंब यांमुळे पुरातत्त्वीय अवशेषांचा शोध घेणे एक तांत्रिक व शास्त्रीय काम बनले आहे.

पुरातत्त्वीय अवशेष विविध प्रकारचे असू शकतात व त्यांच्यातून निरनिराळ्या प्रकारचे अर्थबोधन होऊ शकते. वास्तूंचे अवशेष, मृत्पात्रे, शस्त्रे, अलंकार, दफने, प्राचीन लेख, धान्य, जनावरांची हाडे तसेच मानवाने निर्मिलेल्या व मानवाशी संबंधित अशा सर्व प्रकारच्या अवशेषांचा यांत समावेश होऊ शकतो. या सर्व प्रकारच्या अवशेषांतून मानवी मनाचे, मानवी संस्कृतीचे व मानवी गरजांचे प्रतिबिंब दृग्गोचर होते. उदा., मृत्पात्रे वा खापरे. विपुल प्रमाणात व बऱ्याचशा अविकृत स्वरूपात हा पुरावा भारतात उपवब्ध झाला आहे. खापरांच्या मातीच्या पृथक्करणावरून ती माती स्थानिक आहे किंवा दुसरीकडून आणली आहे, याचा उलगडा करता येतो. मडक्याची बनावट–हाताने, साच्यात वा चाकावर–कशी केली आहे, हेही समजते, त्याचा आकार वैशिष्ट्यपूर्ण असल्यास, उदा., तोटीचे भांडे–ते कोणत्या खास कामाकरिता वापरले गेले असावे हे कळते. त्यावर रंगीत चित्रकारी असल्यास त्यावरून तत्कालीन कलेचे स्वरूप व त्यातील आशयावरून समाजात प्रचलित असलेल्या धार्मिक वा इतर समजुतींचा

मागोवा घेता येतो. अशा तऱ्हेने एखाद्या समाजाची तांत्रिक प्रगती, आर्थिक गरज व धार्मिक समजुती यांवर थोडाफार प्रकाश टाकता येतो. एखादे मडके परदेशी बनावटीचे असल्यास उदा., रोमन ॲम्फोरा वा ॲरेटाईन व मेगॅरीयन पद्धतीची मडकी समाजाचे परदेशी संपर्क व व्यापार यांची माहिती देतात. तसेच काही मडकी केवळ दफनासाठीच वापरलेली असल्यास तत्कालीन समाजातील काही रीतिरिवाज लक्षात येऊ शकतात. अशाच प्रकारे इतर पुरातत्त्वीय अवशेषांची सांस्कृतिक इतिहास जुळविण्यास मदत होते.

### ५.३.२.२ ऐतिहासिक शिलालेख

ऐतिहासिक शिलालेख म्हणजे दगडावर अथवा शिळेवर कोरून ठेवलेला मजकूर. लिखित मजकूर अनंत कालपर्यंत टिकून रहावा म्हणून तो दगडी शिळेवर कोरून ठेवायची प्रथा आस्तित्वात होती.पुरातत्त्व शास्त्रात याला पुराभिलेख असे म्हटले जाते. राजकीय, धार्मिक व सामाजिक आणि ऐतिहासिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने असे कोरीव लेख अत्यंत उपयुक्त असतात. शिलालेखातील व्यक्ती नावाच्या आणि अक्षरांच्या वळणावरून त्यांचा काल ठरविता येतो. प्राकृत, पाली, संस्कृत, वा अन्य आर्य- भारतीय भाषांमध्ये लिहिलेली शिलालेख आढळून येतात. इतिहासातील पाऊलखुणा जपल्याशिवाय वर्तमान कळत नाही आणि भविष्यही घडविता येत नाही. मात्र गौरवशाली इतिहास सांगणारे शिलालेख आणि वीरगळ काळाच्या ओघात नष्ट होत आहेत. या ऐतिहासिक शिललालेखांमधून संबंधित परिसराचा इतिहास समजत असतो. असेच पुरातण शिलालेख दुर्लक्षित आहेत. ऐनापूर (ता. गडहिंग्लज) येथे अनेक पुरातन शिलालेख सापडतात. येथे काही वर्षापूर्वी सापडलेला एक शिलालेख अतिशय पुरातन आहे. सध्या तो ऊन, पाऊस व वारा यांच्यापासून बचावलेला असला तरी स्थानिक लोक त्याचे पूजन करतात. त्यावर हळद, कुंकू, तेल वाहतात. त्यामुळे त्याच्यावरील अक्षरे वाचणे कठीण होत आहे.

शिलालेख हे इतिहासाचे एक अविनाशी साधन आहे. या साधनाचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे यामध्ये कोणताही बदल करता येत नाही. सार्वजनिक इमारती, मंदिरे, राजवाडे, किल्ले अशा अनेक ठिकाणी दगडावर कोरलेले शिलालेख आठळतात. प्राचीन काळातील पराक्रमी राजे, सरदार, आपले विजय धार्मिक कार्य लोकांच्या स्मरणात राहावेत म्हणून ते लेण्यांमध्ये किंवा स्तंभ उभारून कोरून ठेवत असत. अशा शिलालेखातून तत्कालीन धार्मिक, आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक बाबांची माहिती मिळते.

### ५.३.२.३ ताम्रपट

हा तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला मजकूर असतो. यावर प्रामुख्याने दानपत्रे आणि राजाज्ञा तसेच इतर दूरगामी आज्ञा कोरुन ठेवण्याची प्रथा दिसून येते. दानधर्म करण्यासाठी या ताम्रपटांचा वापर केला जात होता. एखाद्या व्यक्तीने राज्यासाठी महत्वाची कामगिरी पार पाडल्यास अथवा तो करीत असलेल्या राज्याच्या सेवेबद्दल त्याला राजाकडून वतन दिले जात असे. दान देणाऱ्यांची व स्वीकारणाऱ्यांची वंशावळीसह संपूर्ण माहिती यामध्ये असे. गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट व चालुक्यांचे अनेक ताम्रपट सापडले आहेत.

भारतीय ताम्रपटातील शिलालेख, सामान्यत: जमिनीचे अनुदान किंवा शाही शिक्का असलेल्या शाही वंशाच्या याद्या नोंदवल्या जातात, ज्याचा विपुलता दक्षिण भारतात सापडला

आहे. मुळात शिलालेख तळहाताच्या पानांवर नोंदवले गेले होते परंतु जेव्हा नोंदी कायदेशीर दस्तऐवज होत्या जसे की शीर्षक-कृत्ये ते गुहेत किंवा मंदिराच्या भिंतीवर किंवा अधिक सामान्यपणे, तांब्याच्या प्लेटवर कोरलेले होते जे नंतर भिंतींच्या आत सुरक्षित ठिकाणी गुप्त केले गेले होते. शिंदे यांनी 2014 मध्ये नऊ कोरलेल्या ताम्रपटांचा समूह भारतीय उपखंडातील सर्वात जुन्या वस्तू म्हणून ओळखला होता. ते परिपक्व हडप्पा काळातील आहेत आणि त्यात 34 वर्णांपर्यंतचे शिलालेख आहेत. मूळ ठिकाण अज्ञात. ते ताम्रपट छपाईसाठी वापरले गेले असे मानले जाते.

ब्राह्मी लिपीत कोरलेला तथाकथित सोहगौरा ताम्रपटाचा शिलालेख आणि शक्यतो ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील मौर्य साम्राज्याचा, नंतरच्या ताम्रपटातील शिलालेखांचा अग्रदूत आहे. मात्र, प्रत्यक्षात ते पितळेच्या छोट्या फलकावर लिहिलेले आहे. तक्षशिला आणि कलावन ताम्रपटातील शिलालेख हे भारतीय उपखंडात लेखनासाठी वापरल्या जाणाऱ्या ताम्रपटाच्या सर्वात प्राचीन उदाहरणांपैकी एक आहेत. तथापि, नंतरच्या ताम्रपटाच्या शिलालेखांप्रमाणे हे योग्य चार्टर नाहीत. भारतीय उपखंडातील सर्वात जुना ज्ञात ताम्रपटाचा सनद म्हणजे 3ऱ्या शतकातील आंध्र इक्ष्वाकु राजा इहुवाला चामटमुलाचा पटागंडीगुडेम शिलालेख. उत्तर भारतातील सर्वात जुना ज्ञात ताम्रपटाचा सनद हा बहुधा ईश्वररताचा कालचल अनुदान आहे, जो चौथ्या शतकाच्या उत्तरार्धात पुराणशास्त्रीय आधारावर आहे. पल्लव वंशाच्या राजांनी चौथ्या शतकात काही प्राचीन प्रमाणीकृत ताम्रपट जारी केले होते आणि त्या प्राकृत आणि संस्कृतमध्ये आहेत.

सुरुवातीच्या संस्कृत शिलालेखाचे एक उदाहरण ज्यामध्ये जमिनीच्या सीमांचे वर्णन करण्यासाठी कन्नड शब्द वापरले जातात, हे पश्चिम गंगा राजवंशातील तुंबूला शिलालेख आहेत, जे 2004 च्या भारतीय वृत्तपत्राच्या अहवालानुसार 444 पर्यंतचे आहेत. गुप्त काळातील दुर्मिळ ताम्रपट उत्तर भारतात सापडले आहेत. ताम्रपटाच्या शिलालेखांचा वापर वाढला आणि अनेक शतके ते कायदेशीर नोंदींचे प्राथमिक स्त्रोत राहिले. बहुतेक ताम्रपट शिलालेखांमध्ये वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे ब्राह्मणांना दिलेल्या जमिनी-अनुदानांच्या शीर्षक-कृत्यांची नोंद आहे. शिलालेखांनी राजेशाही दाता आणि त्याचा वंश ओळखण्यासाठी एक मानक सूत्र अनुसरण केले, त्यानंतर त्याच्या इतिहासाचे, वीर कृत्यांचे आणि त्याच्या विलक्षण वैयक्तिक वैशिष्ट्यांचे प्रदीर्घ सन्मान केले गेले. यानंतर, प्रसंगी, प्राप्तकर्ता आणि तरतुदींचा अवहेलना किंवा उल्लंघन झाल्यास दंड यासह अनुदानाच्या तपशीलांचे अनुसरण केले जाईल. जरी प्रशंसापर भाषेची प्रगल्भता दिशाभूल करणारी असू शकते, परंतु ताम्रपटाच्या शिलालेखांच्या शोधाने इतिहासकारांसाठी भरपूर साहित्य उपलब्ध करून दिले आहे. तिरुमला वेंकटेश्वर मंदिरात सुमारे 3000 ताम्रपटांचा अनोखा संग्रह आहे ज्यावर तल्लापाका अन्नामाचार्य आणि त्यांच्या वंशजांची तेलुगु संकीर्तने कोरलेली आहेत.

### ५.३.२.४ स्मृतीशीला

ताम्रपटाशिवाय विशिष्ट स्त्री-पुरुषाच्या मृत्युसंबंधी माहिती देणाऱ्या स्मृतिशीला हेही एक महत्त्वाचे प्राथमिक साधन आहे. वीरगती पावलेल्या विराच्या कृतीचे कालनिर्देशासह त्यामध्ये वर्णन आढळते. महाराष्ट्रात अशा सतीशीला आढळतात. गावागावांत युद्धप्रसंग कोरलेले तीन-साडेतीन फूट उंचीचे दगड अनेकदा आपल्याला दिसतात. हे दगड म्हणजे नेमके काय

आहे, कशासाठी हे दगड उभारले आणि कोणत्या कालखंडात उभारले गेले याची माहिती गावातील गावकऱ्यांनाही नसते. अनेकदा कोरलेल्या शिळा असल्याने गावातील मंदिराच्या परिसरात या आणून ठेवल्या जातात. या शिळा म्हणजे वीरगळ. वीरगळ म्हणजे कोणत्याही लढाईत किंवा युद्धभूमीवर वीरमरण प्राप्त झालेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ उभारलेला वैशिष्ट्यपूर्ण दगड. पूर्वज किंवा मृत योद्धा यांच्या स्मृतीशिळा उभारण्याची पद्धत भारतात सगळीकडे आढळून येते. गाईचे रक्षण करताना मरण पावलेलेल्या योध्दांच्या स्मरणार्थ उभारलेल्या स्मारकशिळांना पश्चिम भारतामध्ये "गोवर्धन" या नावाने, तर पूर्वजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारलेल्या स्मारकशिळांना "पालिया" या नावाने संबोधतात. महाराष्ट्र व कर्नाटकमध्ये अशा स्मारकशिळांना वीरगळ अथवा कांदळ म्हटले जाते. 'वीर-कल' ह्या कन्नड शब्दावरून 'वीरगळ' हा शब्द आलेला आहे. वीरगळांचा उगम कर्नाटकात झाल्याचे दिसते. तेथून त्यांचा महाराष्ट्रात प्रसार झाला.

### ५.३.२.४.१ स्मृतीशीला कशी वाचावी

वीरगळ शिळेवरील प्रसंग अनुक्रमे साधारणपणे तीन किंवा चार चौकोनात विभागलेला असतो. तळाच्या चौकोनात वीरांचे युद्ध व त्याचा मृत्यू मधील चौकटीत त्याचे स्वर्गारोहण व वरील चौकटीमध्ये वीर स्वर्गात करीत असलेली देवपूजा याप्रमाणे शिल्पे कोरलेली असतात.

१. वीरगळावर सगळ्यात खालच्या चौकटीत जेथ तो वीर धारातीर्थी पडला, तेथील युध्दप्रसंग कोरलेला असतो. युध्दप्रसंगांत बरेच वैविध्य असते. उदा., ढाल-तलवारींनी समोरासमोर लढणारे सैनिक, घोडेस्वारांची लढाई, गाईच्या चौरीवरून लढाई झाली असल्यास गाईंचा कळप एका बाजूला असतो. नाविक युध्द असल्यास अनेक वल्ह्यांच्या नावा दिसतात.

२. खालून दुसऱ्या चौकटीत, वीरगती पावलेल्या माणसाला अप्सरा कैलासाला नेत आहेत, असे चित्र कोरलेले असते. हा प्रवास कधी पालखीतून, तर कधी रथातून होताना दिसतो.

३. सगळ्यांत वरच्या चौकटीत कैलासामध्ये शिवाच्या पिंडीची पूजा करताना तो वीर दाखविलेला असतो. वीरगळाच्या सर्वांत वरच्या बाजूला देवळाच्या कळसासारखा भाग दिसतो व त्याच्या दोन्ही बाजूंस चंद्र-सूर्य कोरलेले असतात.जोपर्यंत चंद्र-सूर्य उगवत आहेत, तोवर ह्या वीराची कीर्ती कायम राहील, है ह्यातून सांगायचे असते. वीरगळावर कधीकधी चार वा पाच चौकटीही असतात. वीरगळांचा काळ अंदाजे ११ ते १३ शतक असा आहे. मुंबई महानगराच्या बोरिवली या उपनगरातील एक्सर गावठाणातील दोन वीरगळांवर नौदल युद्धाचे चित्रण आहे. प्रचंड मोठ्या युद्धनौका, अनेक वल्ही आणि शीडे लावून हाकल्या जात आहेत. वीरगळांवर घनघोर युद्धाचे चित्रण असून त्यात धारातीर्थी पडलेले वीर स्पष्ट दिसतात.

वीरयोध्याबरोबर सतीच्या स्मरणार्थ सतीशिळाही उभारत. यावर सतीचा हात व क्वचित जागी तिची प्रतिमा कोरलेली असते. कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणामध्ये वीरगळ उभारल्याचे आढळते.कोल्हापुरातल्या करवीर तालुक्यातील तुळशी आणि भोगावती नदीच्या संगमावर कसबा बीड है छोटसं गाव वसलेलं

आहे. कसबा बीडमध्ये शेकडो वीरगळ आणि मूर्ती सापडल्या आहेत. यातील काही मूर्ती आणि विरगळीचे महादेव मंदिर परिसरात स्मारक करण्यात आले आहे.

### ५.३.२.५ ऐतिहासिक नाणी

नाण्यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नाणेशास्त्र होय. नाणी व पदके यांचा अभ्यास नाणी, टोकन, कागदी मुद्रा, आणि संबंधित वस्तू समावेश असलेल्या चलनांचा अभ्यास म्हणजे नाणेशास्त्र. अनेकदा नाणेशास्त्र हे जुनी नाणी गोळा करण्याचे छंद म्हणून मानले जातात. परंतु हे एक विस्तृत अभ्यास केले जाणारे शास्त्र आहे. या शास्त्रात विनिमय करण्यासाठी वापरले जाणारे माध्यम समाविष्ट आहे. या शास्त्रात कोणत्याही माध्यमाचा वापर लोकांद्वारे पैसा म्हणून केल्यास त्याचा अंतर्भाव होतो. जसे की एक फिरते चलन (उदा. तुरुंगात सिगारेट). किरगिझ जमातींनी प्रधान चलन एकक म्हणून घोडे वापरले होते. त्या बदल्यात चामड्यांचा वापर केला. म्हणून त्याकाळातील चामडे हे सुद्धा नाणेशास्त्र प्रकारात उपयुक्त असू शकते. अनेक वस्तू अशा कवडी, शिंपले, मौल्यवान धातू , आणि रत्ने अनेक शतके वापरली गेली आहेत. या शास्त्राच्या आधाराने आर्थिक विकास आणि ऐतिहासिक समाजाचे आकलन या प्रमुख बाबी प्रकाशात येतात. नाणी ही कोणत्याही राजवटीचा समकालीन पुरावा होय. नाणी ही कोणत्या ना कोणत्या राजवटीचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास समजून घेण्यास मदत करतात. नाण्यांवर राजा, देवदेवता, प्रतिके इत्यादी अंकित केलेली असतात. त्यावरून आपल्याला तत्कालीन राजा, तत्कालीन सामाजिक, आर्थिक व धार्मिक माहिती समजून येते. तसेच समकालीन भाषा, लिपी, धातू क्षेत्रातील प्रगती इत्यादीची माहिती मिळते. नाण्यांवरील प्रतिकावरुन कलेच्या क्षेत्रातील प्रगतीही लक्षात येते. उदा. समुद्रगुप्ताची वीणावदन करतानाची मुद्रा, राजाची कला-संगीतविषयक दृष्टी दर्शविते. नाण्यांचा धातू कोणता? यावरून राज्याची आर्थिक स्थिति समजून येते. याचबरोबर परकीय राजवट व त्यांच्याशी असलेल्या व्यापाराचीही माहिती मिळते. नाण्यांवर देवदेवतांची चित्रे असतात. त्यावरून त्या काळातील धार्मिक स्थितीवर प्रकाश पडतो. एखाद्या राजाची नाणी ज्या प्रदेशात सापडतात त्यावरून त्या राजाच्या साम्राज्य विस्ताराबाबत माहिती मिळते. अशा सर्वच दृष्टीने नाणी हे एक महत्वाचे साधन ठरते.

#### ५.३.२.५.१ नाणी व नाणकशास्त्र

नाण्याचा आकार, त्याचे नाव व वजन, त्यावरील आकृती, लेख, नक्षी, बिंदू, सावकाराच्या खुणा, विशेष चिन्हे, त्याचा धातू, त्यामध्ये भेसळ असल्यास त्यामधील भेसळीचे प्रमाण, नाण्यांची मूल्ये व त्यांच्या मूल्यांचे परस्परसंबंध, नाण्यांच्या मुबलकतेवरून वा दुर्मिळतेवरून दिसून येणारी देशाची आर्थिक स्थिती, चिन्हांवरून प्रतीत होणारी आवड किंवा भक्ती, लेखांवरून समजणारी राजनामे व त्यांचे काल, तसेच त्यांची श्रेष्ठ-कनिष्ठ स्थाने, नाणी तयार करण्याची पद्धती इत्यादींचा अभ्यास म्हणजे नाणकशास्त्र होय. भारतात या शास्त्राचा अभ्यास एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस जेम्स प्रिन्सेपसारख्या टांकसाळीवरच्या इंग्रज अधिकाऱ्याने चालू केला. पुष्कळ वर्षे तो भारतीय संग्रहालयातील नाणक विभागाच्या प्रमुखांनी चालू ठेवला. १९१० साली नाणकशास्त्राच्या अभ्यासासाठी न्यूमिस्मॅटिक सोयायटी ऑफ इंडिया ही संस्था स्थापन झाली. हिच्यामुळे भारतातील नाण्यांच्या अभ्यासास गती मिळाली. आता भारतातील बहुतेक संग्रहालयांत नाण्यांचा संग्रह असून

त्यांचा तेथे अभ्यास व त्या अभ्यासाचे प्रकाशन चालते. पाश्चिमात्य देशांत या शास्त्राचे संशोधन व अभ्यास तेथील सामान्य जनजागरणानंतर इतर शास्त्रांप्रमाणेच चालू झाला.

### ५.३.२.५.२ नाण्यांची आवश्यकता

फार पूर्वीपासून आजवर व आजही मनुष्याला आपल्या जीवनातील गरजा भागविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या देवघेवीत उपयोगी पडणारे विविध आकारांचे, पण निश्चित वजनांचे व मूल्यांचे आणि विशिष्ट लेखन किंवा आकृती अगर दोन्ही असलेले सोने, रुपे इ. धातूंचे तुकडे म्हणजे नाणी असे सर्वसाधारणतः म्हणावयास हरकत नाही. आजवर ज्ञात झालेल्या नाण्यांसाठी सोने, रुपे, तांबे, लोह इ. शुद्ध धातू किंवा इलेक्ट्रम (सोने व रुपे यांचे मिश्रण), बिलन (रुपे व तांबे यांचे मिश्रण), पोटिन (सोने व रुपे यांचे मिश्रण), पितळ, पंचरस (ब्राँझ) इ. धातू वापरल्याचे आढळले आहे. वाटोळा, चौकोनी, चौरस, चिमटा, विळा, गोल, लंबगोल, चपटा, मधे भोक असलेले असे विविध आकार नाण्यांत आढळतात. यांवरील आकृतींत खूपच विविधता आढळते. निरनिराळ्या वनस्पतींची पाने, फुले, फांद्या किंवा वृक्ष, त्याभोवतालची कुंपणे, सिंह, वाघ, साप, बैल, मासा, हरिण इ. लहानमोठे पशू गरुड, गंडभेरुंड, घुबड, गिधाड इ. नैसर्गिक व काल्पनिक पक्षी स्वार झालेले, उभे, बैठे वीर ऊर्ध्वांगी स्त्रीपुरुष किंवा त्यांची मस्तके उभ्या, बैठ्या स्वार झालेल्या देवता इ. अनेक प्रकारच्या आकृती यांवर आढळतात. लेखन असल्यास ते विविध भाषा व लिपी यांत असून त्यात राजांची उणीअधिक पूर्णापूर्ण नावे, त्यांची वंशनामे, आडनावे, विविध कालोल्लेख, धर्मग्रंथांतील किंवा स्तुतिपर वाक्ये किंवा शब्दसमूह असतात.

### ५.३.२.५.३ नाणकशास्त्राचे महत्त्व

नाणकशास्त्राचे भारतीय इतिहासाच्या तसेच जागतिक इतिहासाच्या अभ्यासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भारतातील अनेक प्राचीन राजांचे अस्तित्व केवळ त्यांच्या नाण्यांमुळे सिद्ध झाले आहे. इंडो-ग्रीक, शक, कुशाण, क्षत्रप, सातवाहन इ. राजवंशांतील कित्येक राजे केवळ त्यांच्या नाण्यांमुळे आपल्याला माहीत झाले आणि त्यामुळेच इ. स. पू. २५० ते इ. स. ३०० या साडेपाचशे वर्षांचा इतिहास अधिक सुसंगत लिहिता येणे शक्य झाले. यांशिवाय संघ, नैगम, जनपद, गण इत्यादींचे अस्तित्वही त्यांच्या नाण्यांमुळे सिद्ध झाले. मालव, शिबी, यौधेय इ. गणराज्यांचे प्रदेश आपल्याला नाण्यांच्या पुराव्यामुळे जवळजवळ निश्चत करता आले. इतिहासाच्या भौगोलिक अंगावर नाण्यांमुळेच महत्त्वाचा प्रकाश पडला. नाण्यांवरील देवतांच्या चित्रणामुळे मूर्तिविज्ञानाचाही काही अभ्यास करणे शक्य झाले. नाणकशास्त्राचा पुरावा हे आता भारतीय इतिहासाचे एक अनन्यसाधारण महत्त्वाचे साधन बनले आहे, यात शंका नाही.

### ५.३.२.५.४ नाणी पाडण्याचे तंत्र

ज्या नाण्यांवरील चिन्हे ठशाने ठोकून उमटवीत, त्यांना आहत नाणी म्हणतात. तीच प्राचीनतम भारतीय नाणी होत. पुढे इ. स. पू. तिसऱ्या शतकात साच्यांतून नाणी पाडण्यास सुरुवात झाली. साच्यांतून नाणी कशी पाडतात याची कल्पना साच्यांच्या सापडलेल्या अवशेषांवरून येते. हरयाणामधील रोहटक (प्राचीन रोहितके) व नौरंगाबाद आणि पंजाबातील सुनेत (जिल्हा लुधियाना) येथे नाण्यांचे मातीचे साचे फार मोठ्या प्रमाणावर सापडले आहेत.

त्यांवरून असे दिसून येते की, मातीच्या प्रत्येक तबकडीत मध्यभागी एक गोल छिद्र असून सभोवती आठ साचे असत. मध्यभागी असलेले छिद्र नाण्यांच्या साच्याची लहान कोरलेल्या पन्हाळीने जोडलेले असे. छिद्रातून ओतलेला धातूचा रस नाण्याच्या साच्यात जाण्यासाठी ही योजना होती. या प्रकारच्या तबकड्या एकावर एक ठेवीत. तसे करताना वरच्या तबकडीच्या खालील बाजूवर असलेला साचा आणि खालच्या तबकडीच्या वरच्या बाजूवरील नाण्याचा साचा अगदी अचूक एकमेकावर ठेवावा लागे. अशा आठ तबकड्या एकावर एक रचल्यानंतर त्यांच्या बाहेरील बाजूवर मातीचा लेप दिला जाई व नंतर वरच्या बाजूस तबकड्यांच्या मध्यभागी असलेल्या छिद्रात नरसाळ्याद्वारे वितळविलेला धातूचा रस ओतीत. हा रस मध्यभागी असलेले छिद्र आणि नाण्याचा साचा यांना जोडणाऱ्या पन्हाळीतून साच्यापर्यंत जात असे. या प्रकारे सर्व साच्यांतून रस भरला जाई. तो थंड झाल्यानंतर नाणी काढून घेण्यासाठी साच्यांच्या तबकड्या फोडाव्या लागत. नाणी काढल्यानंतर ती कानशीने घासून काढावी लागत. सुनेत येथे सापडलेल्या तबकड्या लहान असून त्यांवर प्रत्येकी एकच नाण्याचा साचा आहे. कोंडापूर (आंध्र प्रदेश), तक्षशिला व नालंदा येथेही नाण्यांचे साचे सापडले आहेत पण ह्या पद्धतीने पाडलेली नाणी एकंदरीत कमी असून आहत नाण्यांचे प्रमाण मोठे आहे. मुसलमानी, संस्थानी, यूरो-भारतीय व सध्याची भारतीय नाणी आहतच आहेत. म्हणजे पूर्वी पत्र्यांवर प्रथम ठशांच्या साहाय्याने मजकुरादी उठवून मग त्याचे तुकडे पाडीत. आता यंत्राच्या साहाय्याने प्रथम विविध आकारांचे तुकडे पाडतात आणि मग त्यांवर मजकुरादींचे ठसे उमटवितात.

### ५.३.२.५.५ ऐतिहासिक प्राचीन भारतीय नाणी

भारतीय नाण्यांचा जन्म इ. स. पूर्व ६ व्या शतकात झाला असे मानले जाते. भारतीय नाण्यांना वर्षांपेक्षा अधिक जुनी परंपरा आहे. काशी, मगध, गांधार, पांचाल, कलिंग या राजवटींनी सर्वप्रथम नाणी पाडली. ही आहत किंवा ठसा पद्धतीने बनवलेली नाणी होती. ही नाणी चौकोनी, गोल, लंबगोल अशा विविध आकारांत बनवली जात असत. ही नाणी चांदीची असत. या नाण्यांवर मनुष्याकृती, पशू-पक्षी, हत्यारे, झाडे तसेच चंद्र-सूर्य चिन्हे आढळतात. मौर्य साम्राज्यात चांदीबरोबरच तांब्याचीही नाणी पाच चिन्हे अंकित करून सुरू केली गेली. याच काळात ठसे ठोकून नाणी पाडण्याऐवजी साच्यात वितळलेला धातू ओतून तयार करण्यास सुरुवात झाली. सर्वात जुनी ओतीवकामाची चौकोनी आणि गोल नाणी सापडली आहेत. भारतात मोहेंजोदडो व हडाप्पा येथील उत्खननात नाणी सापडली आहेत. ही नाणी इ. स. पूर्व ४ थ्या शतकातील सम्राट अशोकाच्या काळातील तक्षशिला येथे सापडली. त्यावर बुद्ध, बोधीवृक्ष, स्वस्तिक अशी नाण्याच्या एकाच बाजूला चिन्हे आहेत. पांचाल राजांनी सर्व प्रथम दोन साचे वापरून नाण्याच्या दोन्ही बाजूंना चिन्हे उमटवली. गांधार राजांनी त्यात कुशलता मिळवली. इंडोग्रीक काळात त्यावर अक्षरे नोंदली जाऊ लागली. कुशाण राजांनी इ. स. पहिल्या शतकात चांदी आणि तांब्याबरोबर सोन्याचे पहिले नाणे पाडले. यांनीच नाण्यांवर संस्कृत भाषेचा प्रथम वापर केला. याच वेळी बाह्मी लिपीचा वापरही दिसून येतो. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील कौसंबी, अयोध्या, मथुरा इथल्या नाण्यांवर राजांची नावे ब्राह्मी लिपीत आढळतात. गुप्त साम्राज्यात सोन्याच्या नाण्यांत अचूकता आणि विविधता आली. चंद्रगुप्त सम्राटाने काढलेल्या नाण्यांवर त्यांच्यासह राणी कुमारीदेवी आढळते. समुद्रगुप्त सम्राटाच्या नाण्यांवर अश्वमेध, कुऱ्हाड, शिकार करताना वीणावाद्य अशा विविध मुद्रा दिसून येतात. सातवाहनांनी राजा यज्ञ सातकर्णी याने चांदी आणि तांब्याबरोबरच शिशाचीही नाणी



munotes.in

पाडली होती. साम्राज्याने सुवर्णहोन प्रचलित केले. शिवकाळात सोन्याचा होन, चांदीची 'लारी' व तांब्याची शिवराई ही प्रमुख नाणी आढळतात. शिवराईवर श्री राजा शिव आणि दुसऱ्या बाजूला 'छत्रपति' अशी अक्षरे उमटवलेली असत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी आजही पहावयास मिळतात.

### ५.३.२.५.६ ऐतिहासिक लिखित नोंदी

प्राचीन भारतीय साहित्यात नाण्यांचा उल्लेख आढळतो. शतपथ ब्राह्मण, बृहदारण्यक, उपनिषद, अग्निपुराण, मत्स्यपुराण, मनुस्मृती इ. प्राचीन ग्रंथांत, तसेच पाणिनीच्या अष्टाध्यायीत व जातक ग्रंथांतही निष्क, कृष्णल, सुवर्ण, धरण, शतमान, पुराण, द्रम, कार्षापण, रूप्य ही नाणीवाचक नावे आढळतात. भास्कराचार्यांच्या लीलावतीत 'गघाणक' या परिमाणाची माहिती आढळते. लक्षणाध्यक्ष (टांकसाळ प्रमुख) याने रूप्यरूप व ताम्ररूप म्हणजे चांदीची व तांब्याची नाणी बनवावी, असे कौटिलीय अर्थशास्त्रात सांगितले आहे. कूट रूपकारक म्हणजे खोटी नाणी बनवणारा व रूपदर्शक म्हणजे नाणक-परीक्षक यांची माहिती चाणक्याच्या अर्थशास्त्रात आढळते. पाणिनींच्या अष्टाध्यायीत "रूप्य" शब्द (कुठल्याही धातूच्या) चित्र-छापलेल्या नाण्याच्या संदर्भात सांगितलेले आहे.

### ५.३.२.६. ऐतिहासिक चित्र व नकाशे

मानवास प्राचीन काळापासून चित्रकला आवगत आहे. प्राचीन मानवापासून गुहेतील चित्रकला आढळते. लेण्यामधून कोरलेली चित्रे तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब असतात. त्यामधून तत्कालीन समाजात प्रचलित असलेले सण, उत्सव, प्रथा परंपरा यांची माहिती मिळते. याशिवाय या गुहा कोरण्याच्या कालखंडातील राजवटीचीही माहिती मिळते. अजिंठ्यातील लेणी चित्रकला हे त्याच उत्तम उदाहरण आहे. यावरून आपल्याला तत्कालीन सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. आदिलशाही, कुतुबशाही, मोगलकालीन व राजपूत राजे व सरदार यांची चित्रे आज मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. याशिवाय नाकाश्यांच्या अभ्यासावरून इतिहासकाळात झालेल्या लढायांची व भौगोलिक परिस्थितीची पूर्ण माहिती होऊ शकते.

### ५.३.२.७ ऐतिहासिक लेण्या, चैत्यगृहे व स्तूप

पर्वतश्रेणीत खडक खोदून तयार केलेली गुहागृहे वा प्रस्तरालये नासिकजवळच्या पांडव लेण्यातील लेखात 'लेण' हा शब्द प्रथम आलेला दिसतो. 'एतच लेण महादेवी महाराज मातामहाराज पतामही ददाति…, 'लेण' हा शब्द संस्कृत 'लयन' म्हणजे 'गृह' या शब्दावरून आला आहे. लेण्यांना गुहा, गुंफा, शैलगृहे, शिलामंदिरे, प्रस्तरालये अशी अन्य नावेही आहेत. गुहांची ठिकाणे डोंगरकपारीत नैसर्गिक रीत्या तयार झालेली असतात किंवा मानवाने डोंगर खोदून ती तयार केलेली असतात. लेणी ही संज्ञा सामान्यपणे मानवनिर्मित गुहांना वापरली जाते. अश्मयुगीन मानवाचे वास्तव्य बऱ्याच वेळा नैसर्गिक रीत्या पुढे आलेल्या प्रस्तराच्या आडोशानेच होत असे. अशांपैकी काही निवडक गुहास्थानांमधल्या खडकांच्या भिंतींवर आदिमानवाने चित्रे खोदून आपल्या उत्कृष्ट चित्रकलेचे नमुने मागे ठेवलेले आहेत. प्रारंभीच्या काळात खोदलेली लेणीही त्या त्या डोंगरांच्या पायथ्याशी असून ती साधी, लहान व ओबडधोबड अशी होती. नंतरच्या काळातील लेणी पर्वतश्रेणीच्या वरच्या भागांत क्रमशः

आढळतात व अखेरच्या टप्प्यातील लेणी तर माथ्यावर कोरलेली आहेत. उत्तर अश्मयुगातील चित्रयुक्त गुहा अल्तामिरा (स्पेन) एल् कॅस्तिल्लो, ऑंदुबर्त, लॅस्को, लेझेझी (फ्रान्स) निऑ (इटली) तुनह्वांग (चीन) इ. ठिकाणी आढळल्या. तुनह्वांग लेणी अजिंठ्याप्रमाणेच बौद्ध भित्तिलेपचित्रांकरिता (इ.स. पाचवे-तेरावे शतक) प्रसिद्ध आहेत. या लेण्यांमध्ये इंग्रज पुरातत्त्ववेत्ते सर ऑरेल स्टाइन यांना सु. १५,००० हस्तलिखितांच्या संग्रहाचा शोध लागला. त्यांत हीरक सूत्र (इ.स. ८६८) या आद्य मुद्रित पुस्तकाचा अंतर्भाव आहे. अफगाणिस्तानमधील बामियान येथे अनेक शैलगृहे असून, तेथे बुद्धाच्या भव्य मूर्ती आढळतात. लेझेझी व निऑ या गुहा मग्डेलेनिअन काळातील (इ.स.पू.सु. दहा हजार वर्षे) असून लेझेझी गुहेतील चित्रात बायसनच्या (गवा) हनुवटीखालील गोंडा आणि त्याची मदार यांतून त्याची खास वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. फ्रान्सच्या पिरेनीज पर्वतश्रेणीत आणि दॉर्दॉन्यू खोऱ्यात अशाच काही चित्रयुक्त गुहा आढळल्या आहेत.

मध्य भारतातील सिंगनपूर, आदमगढ, चक्रधरपूर, मिर्झापूर, हुशंगाबाद, लिखुनिया, भलदरिया, विजयगढ, पंचमढी इ. ठिकाणी गुहा असून त्यांतून भित्तिचित्रे आढळतात तथापि या गुहांचा अद्यापि म्हणावा तितका सखोल अभ्यास झालेला नाही. या व्यतिरिक्त भीमबेटका येथे अतिप्राचीन प्रस्तर गुहा १९५५ मध्ये उत्खनन-संशोधनात वि. श्री. वाकणकर यांना प्रथम आढळल्या. यशोधर मठपाल या तज्ञाच्या मते येथील चित्रशैली चार प्रकारांत खडू (क्रेऑन), ओली पारदर्शक, ओली अपारदर्शक आणि तुषार-रंग (स्प्रे कलर) – अशी विभागलेली असून, त्यांपैकी खडू-रंगाची चित्रशैली भारतात क्वचितच आढळते. चित्रशैली, तंत्र आणि अध्यारोपण या आधारांवर वाकणकर यांनी येथील चित्रांचे सात कालखंड कल्पिलेले आहेत. त्यानुसार त्यांचा काळ इ.स.पू. सु. २५००० इतका मागे जातो. अशाच तऱ्हेचे अश्मयुगीन गुहासमूह भारतात आंध्र प्रदेशातील कुर्नूलजवळ बिल्ल सुर्गम येथे सापडले आहेत. ईजिप्त, जॉर्डन इ. देशांतही अशा प्रकारची लेणी आढळतात.

प्राचीन लेण्यांत विशेषतः प्रागैतिहासिक लेण्यांत प्रामुख्याने प्राण्यांची चित्रे असून ती शिकार या तत्कालीन प्रमुख जीवनव्यवसायाशी निगडित असावीत कारण यूरोपातील गुहांतून रानगवे, रानबैल, हरिणे, रेनडिअर, अस्वल या प्राण्यांचे व त्यांच्या शिकारींचे चित्रण प्रामुख्याने दिसते. उत्तर काळात मातृकादेवी, सुफलता व प्रजनन यांचीही प्रतीकात्मक चित्रे, तसेच गर्भवती, संततिपालक स्त्रिया यांची रेखाटने आढळतात. त्यांतील स्त्रीचित्रणात लठ्ठ बांधा, अवाजवी स्तन, विशाल नितंब आणि जघन प्रदेशाला उठाव दिलेला आढळतो. त्याचा संबंध सुफलताविधीशी संलग्न अशा कर्मकांडाशी असावा, असे दिसते.

भारतात खडकांतून कोरलेली सु. १,२०० लेणी आहेत. त्यांतील हजाराहून थोडी जास्त लेणी महाराष्ट्रात आढळतात. भारतामधील लेणी जैन, बौद्ध आणि वैदिक (हिंदू) अशा विविध धर्मपंथीयांनी कोरलेली आहेत. त्यांत बौद्ध धर्मीयांच्या लेण्यांची संख्या सर्वाधिक आहे. ही लेणी कोणत्याही धर्मपंथाची असली, तरी लेण्यांचे ऐहिक व धार्मिक असे प्रमुख दोन प्रकार आहेत. ऐहिक लेणी फारच थोडी आहेत. धार्मिक प्रसार-प्रचार हाच प्रमुख हेतू सामान्यतः बहुतेक लेण्यांतून दिसून येतो. या लेण्यांचा सर्वसाधारण काळ इ. स. पू. तिसरे शतक ते इ. स. नववे शतक असा मानला जातो. गिरिशिल्पांची ही परंपरा आठव्या-नवव्या, कदाचित दहाव्या शतकापर्यंतही चालू होती. भारतात मौर्यकालात प्रामुख्याने सम्राट अशोकाच्या कारकीर्दीत (इ.स.पू. २७३-२३२) बौद्ध लेणी खोदण्यास प्रारंभ झाला असावा, असे त्या

लेण्यांतील कोरी लेखांवरून ज्ञात झाले आहे. खुद्द अशोकाने प्राचीन मगध देशात (बिहार राज्य) बराबर टेकड्यांत व त्याचा नातू दशरथ याने नागार्जुनी टेकड्यांत आजीविक पंथाच्या भिक्षूंकरिता लेणी कोरविली होती. याच सुमारास भारताच्या इतर भागांत विशेषतः ओरिसात उदयगिरी आणि खंडगिरी येथे तमिळनाडूत महाबलीपूर व गुजरात-काठेवाडात जुनागढ, ढांक इ. ठिकाणी विशाल खडकांतून लेणी खोदलेली आढळतात. भारतात पूर्णतः हिंदू धर्माशी संबद्ध असा एखादाच लेणीसमूह आढळतो. वेरूळसारख्या ठिकाणी तर बौद्ध, जैन व हिंदू असे गुफांचे तीन स्वतंत्र समूह आढळतात.

बौद्ध लेण्यांत चैत्य आणि विहार असे दोन प्रकार आढळतात. जैन लेण्यांमध्ये चैत्यगृह नाही आणि वैदिक लेण्यांत चैत्यगृह आणि विहार ही दोन्ही नाहीत. त्यामुळे वैदिक लेणी बहुतांशी उत्कीर्ण देवालय-प्रासादाच्या स्वरूपाचीच आहेत. भारतात खोदलेल्या लेण्यांमध्ये बौद्ध लेण्यांइतकी वैदिक वा हिंदू लेणी प्राचीन नाहीत. जी आहेत ती प्रामुख्याने वेरूळ, जोगेश्वरी, मंडेश्वर, पाताळेश्वर, आंबेजोगाई, घारापुरी (महाराष्ट्र) बादामी (कर्नाटक) महाबलीपुर (तमिळनाडू) उदयगिरी (मध्यप्रदेश) इ. ठिकाणी आढळतात. या सर्वांत कलात्मकतेच्या दृष्टीने वेरूळ येथील लेणी विशेष लक्षणीय आहेत. त्यांतील ब-याच लेणी बौद्ध विहाराच्या धर्तीवर कोरलेली असल्याचे दिसते. यांत शैव, वैष्णव पंथांशी संबंधित अनेक शिल्पे आहेत. रावणकी खाई, रामेश्वर, दशावतार, सीतेची नहाणी ही वेरूळ येथील उल्लेखनीय हिंदू लेणी होत. वेरूळ येथील कैलास लेण्याचा अद्वितीय सुरेख शैलमंदिर म्हणून उल्लेख करतात. हे शिवमंदिर अखंड खडकातून सभोवतालच्या ओवऱ्यांसह खोदून काढलेले आहे. शैलमंदिर या शिल्पप्रकाराचे हे लेणे ही सर्वांत परिणत अवस्था होय. मध्य प्रदेशातील भिलसा शहराजवळ उदयगिरी येथे एकूण वीस लेणी आहेत. त्यांपैकी दोन जैन गुंफा ओत. उर्वरित लेणी हिंदू धर्माशी संबद्ध असून गुहा क्रमांक पाच तेथील वराहावताराच्या शिल्पासाठी प्रसिद्ध आहे. वराहाची मूर्ती सु. तीन मी. उंच असून त्याच्या दंताग्रावर स्त्रीरूपधारिणी पृथ्वी आहे. वराहाचे शरीर भक्कम असून त्याच्या अंगप्रत्यंगातून सामर्थ्य व चैतन्य ओसंडत आहे, असे वाटते. त्याच्याजवळच ब्रम्हा, शिव, यक्ष, किन्नर इत्यादींच्या सुबक मूर्ती असून त्या पृथ्वी-उद्धाराबद्दल आनंद व्यक्त करताना दर्शविलेल्या आहेत. हे गुप्तकालीन कलेचे एक अप्रतिम शिल्प आहे. गुहा क्रमांक सहात विष्णूच्या उभ्या दोन मूर्ती आहेत. त्यांत त्याची आयुधे स्पष्ट दर्शविलेली असून विष्णूने कौस्तुभमणिहार, वैजयंती इ. माला घातलेल्या असून अन्य अलंकारही मूर्तिकाराने सूक्ष्म रीत्या कोरलेले आहेत. यांशिवाय या गुहेत दोन ओबडधोबड गणेश-मूर्ती आहेत. अशाच गणेशाच्या सुबक मूर्ती गुहा क्रमांक तीन व सतरा यांत आढळतात. गणपतीच्या मूर्तिशिल्पास गुप्तकाळात येथूनच प्रारंभ झाला असावा, असे बहुतेक कलासमीक्षक मानतात. सहाव्या गुहेच्या प्रवेशद्वारातील द्वारपालही आकर्षक वाटतात.

कर्नाटकातील बादामी (विजापूर जिल्हा) जवळच्या डोंगरात चार लेणी आहेत. चालुक्यांनी ती इ. स. सहाव्या शतकात खोदली असून त्यांपैकी प्रत्येकी एक शैव व जैन आहे. उर्वरित दोन लेणी वैष्णव आहेत. येथील वैष्णव लेणी मंगलेश चालुक्य राजाच्या काळी इ. स. ५७८ च्या सुमारास खोदली, असे तेथील शिलालेखावरून ज्ञात होते. त्यात शैव संप्रदायाच्या मूर्ती आढळतात. दक्षिण भारतात सातव्या-आठव्या शतकांत प्रस्तरातून मंदिरे, मंडप व रथ खोदून काढण्याची वास्तुपद्धती प्रचलित होती. गुंतूर व त्रिचनापल्ली या जिल्ह्यांत काही मंडप आढळतात. मंडप म्हणजे डोंगराच्या दर्शनी भागात कोरलेली वास्तू आणि रथ म्हणजे स्वतंत्र पाषाणात कोरलेले एक पाषाणी मंदिर. तमिळनाडूतील महाबलीपुर येथील वराह, महिषा

सुरमर्दिनी, धर्मराजमंडप, कृष्णमंडप, पंचपांडवमंडप या पाच गुहांत पल्लवांच्या अभिजात व परिणत शिल्पशैलीचा आविष्कार आढळतो. यात मंडप-रथ ही संकल्पना पूर्ण अवस्थेत पोहोचलेली दिसते. येथील शैलोत्कीर्ण रथ प्रख्यात आहेत. त्यांपैकी काही दोन वा तीन मजलीही भासतात. महिषासुरमर्दिनी लेण्यातील स्तंभ वैशिष्ट्यपूर्ण असून या गुहेतील हंसांच्या रांगांचे अलंकरण लक्षणीय आहे. या लेण्यातील शेषशायी विष्णू व महिषासुरमर्दिनी ही शिल्पे कलात्मक आहेत. या शिल्पांचे रथ हे नाव सार्थ वाटते, कारण पाहणाऱ्याला त्यांची गतिमानता प्रत्ययाला येते. तेथूनच जवळ २९.२६ मी. लांब व सु. १३.१० मी. रुंद असा विस्तीर्ण शिल्पपट्ट असून तो विशेष उल्लेखनीय आहे. त्याच्या फटीत नाग-नागीण यांची अपोत्थित शिल्पे कोरलेली असून, एका बाजूला एक जटाधारी पुरुष तप करीत असलेला दाखविलेला आहे. ती अर्जुनाची प्रतिमा आहे, असे काही तज्ञ मानतात, तर गंगेला पृथ्वीवर आणण्यासाठी भगीरथाने केलेल्या तपश्चर्येची ती मूर्ती (गंगावतरण) आहे, असे इतरांचे म्हणणे आहे. त्या खडकावर हत्ती, वाघ, सिंह, यक्ष, सूर्य, गंधर्व, चंद्र, अप्सरा इत्यादींच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. या गुहांतून पल्लवांच्या इ. स. सहाव्या-सातव्या शतकांतील द्राविड शिल्पशैलीचे सुंदर मिश्रण या रथशिल्पात झालेले आढळते. महाराष्ट्रात वेरूळव्यतिरिक्त मुंबईजवळ जोगेश्वरी व घारापुरी येथे हिंदू गुंफा आहेत. त्यांपैकी घारापुरी येथे पाच लेण्यांचा समूह असून ही लेणी राष्ट्रकूटांच्या वेळी इ. स. आठव्या-नवव्या शतकांत खोदली असावीत, असा तज्ज्ञांचा कयास आहे. या लेण्यांतील बहुतेक सर्व शिल्पे शिवाच्या जीवनाशी निगडित असून ही शैव लेणी रचनासौंदर्यात सीतेची नहाणी या वेरूळच्या लेण्यासारखीच आहेत. तेथील त्रिमूर्ती शिल्प आणि कल्याणसुंदरमूर्ती या विलोभनीय असून कलेतिहासात त्यांना आगळे स्थान प्राप्त झाले आहे. हिंदू लेण्यांप्रमाणेच जैन लेण्यांचे प्रमाण भारतात कमी आहे. ही लेणी प्रामुख्याने ओरिसातील भुवनेश्वरजवळ उदयगिरी-खंडगिरी येथे, तसेच कर्नाटकातील ऐहोळे व बादामी (विजापूर जिल्हा) आणि महाराष्ट्रातील चांदवड, अंकाई-टंकाई (नासिक जिल्हा), आंबेजोगाई, धाराशिव (उस्मानाबाद जिल्हा), वेरूळ (औरंगाबाद जिल्हा) इ. आढळतात. उदयगिरी येथे कलिंग देशातील पाचशे मुनी मोक्षाला गेले, असा जैन पुराणात उल्लेख आहे. त्यामुळे हे जैनांचे पवित्र तीर्थस्थान (अतिशयक्षेत्र) म्हणून प्रसिद्ध आहे. महावीरानेही या स्थानाला भेट दिली होती, असा समज आहे. या पर्वतश्रेणींच्या परिसरात साठांवर मौर्यकालीन गुंफा आहेत. उदयगिरीवरच पस्तीस लेणी आहेत. येथील काही लेणी अनेक मजल्यांची असून त्यांमध्ये पुष्कळ शिल्पे आहेत. लेण्यांतील स्तंभ आणि तत्संलग्न शिल्पे उत्कृष्ट आहेत. अलगपुरी, जय-विजय, राणी, गणेश, स्वर्ग, मध्यपाताळ इ. प्रसिद्ध गुंफा आहेत. गणेश गुहेच्या बाहेर दोन अजस्त्र हत्ती आहेत. येथील हाथीगुंफेत कलिंगचा राजा खारवेल याचा सुप्रसिद्ध शिलालेख आहे. या सर्व गुहांत मूर्ती कोरलेल्या आहेत. उदयगिरीजवळच खंडगिरी असून तिथे वर व खाली पाच गुहा आहेत. शिखरावर जैन मंदिर आहे. जवळच इंद्रकेसरी गुंफा असून तिच्या मागील एका गुहेत चोवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. ऐहोळे येथे मेगुती टेकडीवर मेनाबस्ती नावाचे लेणे खोदलेले असून त्यात विशेष उल्लेखनीय मूर्तिकाम नाही. फक्त पार्श्वनाथाचे, त्याच्या शासनदेवतांसह (धरणेंद्र, पद्मावती) अपोत्थित शिल्प आहे. बादामी येथे वैष्णव गुहेजवळच उंच जागी उत्तराभिमुख जैन लेणे असून त्यातील सिंहासनाधिष्ठित महावीराची मूर्ती लक्षवेधक आहे. भिंतीवर गोमटेश्वर व पार्श्वनाथ आणि त्यांचे सेवक तसेच काही तीर्थंकर यांच्या मूर्ती आहेत. अंकाई-टंकाई व चांदवड येथे जैन लेणी असून त्यांत कोरीव काम केलेले आहे ही लेणी सध्या भग्नावस्थेत आहेत. मराठावाड्यातील आंबेजोगाई व उस्मानाबाद (धाराशिव) येथे हिंदू-जैन लेणी असून यांपैकी

हिंदू लेणी उस्मानाबाद शहराजवळ सुमारे ५ किमी. वर असून ती 'चांभार लेणी'या नावाने प्रसिद्ध आहेत. त्याच्यापुढे सु. १८ किमी. वर डोंगरात असलेली उत्तराभिमुख चार व ईशान्याभिमुख तीन अशी सात जैन लेणी धाराशिवची लेणी म्हणून प्रसिद्ध आहेत. ती करकण्ड-चरिउ या अपभ्रंश आणि बृहत्कथाकोष या संस्कृत ग्रंथांनुसार, तसेच जेम्स बर्जेस यांच्या मते जैन धर्माची म्हणून वर्णिली आहेत. त्यांचा काल इ. स. ५० ते ५०० असा पुरातत्त्वज्ञ मानतात. येथील पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या भव्य प्रतिमा प्रसिद्ध आहेत. अलीकडे म. के. ढवळीकरांसारखे काही तज्ञ धाराशिवची लेणी ही बौद्ध संप्रदायाची असावीत, असे मत मांडतात तथापि वा. वि. मिराशी व अन्य संशोधकांनी तेथील वास्तुशिल्पादी पुराव्यांवरून ती जैनच असल्याचे प्रतिपादन केले आहे. वेरूळ येथील आठव्या-नवव्या शतकांतील जैन लेणी नावाजण्यासारखी आहेत. त्यांपैकी इंद्रसभा व जगन्नाथसभा नामक लेणी स्थापत्य व शिल्प दृष्ट्या प्रेक्षणीय आहेत. तेथील स्तंभांचे प्रकार, त्यांवरील कलाकुसर आणि रेखीव शिल्पकाम डोळ्यात भरण्यासारखे आहे.

सांची, भारहुत, अमरावती, कार्ले, भाजे, नागर्जुकोंडा इ. ठिकाणी स्तूप व चैत्य बांधले गेले आहेत. हे स्तूप बुद्धांच्या अस्थि अवशेषावर बांधले गेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील भाजे, कोंडणे, जुन्नर, बेडसे व नाशिक, कार्ले, कान्हेरी याठिकाणी बौद्ध लेणी कोरली आहेत. या सर्वच स्तूपावर बुद्धाच्या जीवनातील कथा, हिंदू देवदेवता, यक्ष यक्षिणी, वृक्षवल्ली, पशुपक्षी, राजे, सामन्य स्त्री पुरुष यांची चित्रे कोरली आहेत. यावरून त्या काळातील वेशभूषा, केशभूषा, अलंकार, धार्मिक व सांस्कृतिक जीवन याची माहिती मिळते. ही माहिती समकालीन असल्याने त्याची गणना प्राथमिक साधनात करावी लागते.

महाराष्ट्रात बौद्ध धर्माच्या प्रसारास प्रारंभ झाल्यानंतर तेथील भिक्षूंची संख्या वाढू लागली आणि त्यांच्या राहण्याकरिता विहार, धर्मोपदेशाकरिता चैत्यगृहे आणि पूजेसाठी स्तूप पर्वतश्रेणींतून खोदण्यात आले. महाराष्ट्रातील लेणी आणि त्यांतील कोरीव लेख हे या धर्मप्रसाराचे दृश्य दाखले होत.

**वास्तुशास्त्रदृष्ट्या बौद्ध लेण्यांचे तीन प्रमुख प्रकार पडतात :**

(१) स्तूप,

(२) विहार व

(३) चैत्यगृह.

स्तूप म्हणजे पूज्य व्यक्तीच्या अवशेषांवर उभारलेला व दगड, माती, विटा यांनी बांधलेला किंवा खडकात खोदलेला बहिर्गोल वास्तुप्रकार होय. यालाच 'डागोबा', धातुगर्भ, चैत्य म्हणतात. हीनयान पंथीय अनुयायांनी उभारलेले स्तूप ओबडधोबड व साधे असून महायान पंथीयांनी चैत्यगृहातील स्तूपाला शिल्पांनी अलंकृत करण्याचा आणि दर्शनी भागावर बुद्धाची मूर्ती कोरण्याचा प्रघात पाडला. स्तूपावर हर्मिका असून तीवर एकावर एक अशी तीन छत्रे उभारलेली असत. अमरावती, नागार्जुनकोंडा, बोधगया, भारहूत, मथुरा, सांची, सारनाथ येथील तोरणे शिल्पपट्टांनी अलंकृत आहेत. यांतील काहींची मोडतोड झाली आहे.

### ३.२.८ भौगोलिक ऐतिहासिक माहिती

भूगोल व इतिहास हे दोन्ही परस्पर पूरक आहेत. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास करताना भूगोलाची मदत होते. कारण इतिहास हा भूगोलाच्या साहाय्याने घडत असतो. जी घटिते घडतात, प्रसंग घडतात त्याचा उल्लेख समकालीन लिखित कागदपत्रातून येत असतो. भौगोलिक परिस्थिती शेकडो वर्षे फारसा बदल होत नसतो. त्यामुळे घटनास्थळी जाऊन इतिहासाचे अवलोकन करता येते. याशिवाय मूर्ती, हत्यारे व अवजारे, शस्त्रास्त्रे स्मारके ही इतिहासाची अलिखित प्राथमिक साधने आहेत. ही सर्व अलिखित प्राथमिक साधने इतिहासलेखन प्रक्रियेत महत्त्वाची आहेत. कारण एक ती सहजासहजी नष्ट होत नाहीत. दोन ती त्या त्या काळात तयार झालेली म्हणजेच समकालीन असतात. तीन त्यात सहजा सहजी फेरफार करता येतील अशी नसतात.

## ५.४ इतिहासाची दुय्यम साधने

ज्या साधनात घटनांचे लेखन करणारा घटक, घटनांचा प्रत्यक्ष साक्षीदार नसतो. परंतु प्रत्यक्ष साक्षीदाराच्या सांगण्यावरुन घटनेची माहिती देतो. अशा साधनास दुय्यम साधने म्हणतात. एखाद्या व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली, तरी केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पुर्णपणे सत्य येण्याची शक्यता कमी असते. यामुळे अशा साधनांना दुय्यम म्हणतात. एखादी घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी केवळ स्मरण शक्तीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ, गतकालीन घटनेबाबत केवळ माहितीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ, प्राथमिक स्वरूपाच्या साधनांची चिकित्सा करून विश्वासाने ठरलेल्या पुराव्यांच्या आधाराने विषयाची तर्कसंगत मांडणी करून लिहिलेले ग्रंथ यांचा समावेश यामध्ये होतो. प्राथमिक साधनांवरच दुय्यम साधने अवलंबून असतात. या साधनांना दुय्यम म्हणण्याची कारणे म्हणजे अशा साधनांमधून संबंधित लेखकाचे स्वत:चे मत डोकावण्याची शक्यता असते. इतिहासाच्या मूळ साधनाचा अर्थ आपल्या मतानुसार लावण्याची शक्यता असते. दुय्यम साधनांमधील वस्तूनिष्ठता तपासताना काळजी घ्यावी लागते. काही महत्त्वाची दुय्यम साधने खलीलप्रमाणे

### ५.४.१ बखर

बखर शब्दाची उत्पती अरबी शब्द खबर (बातमी, वृत्तांत) पासून झालेली आहे. मराठांच्या काळात बखर हा शब्द माहिती देणाऱ्या अर्थाने रुढ झाला आहे. अशी माहिती अर्थातच ऐतिहासिक व्यक्ति व घटनांच्या विषयी असते. अनेक वेळा चरित्रनायकाच्या हुकूमावरून बखरकाराकडून लिहून घेण्यात येत असे. तथापि बखरकार एका विशिष्ट पक्षाचे असल्याने त्यांचा इतिहास पक्षपतीपणे लिहिला जात असे. स्वयकीयांची स्तुती व परकीयांची निंदा असे. तरीही राजकीय स्वरुपाच्या इतिहास लेखनाची परंपराच्या दृष्टीने त्यांचे महत्व आहे. शालीवाहन बखर ही सर्वांत जुनी बखर आहे. वि. का. राजवाडे यांच्या मते इ.स १८१८ पर्यंत सुमारे अडीचशे बखरी लिहिल्या गेल्या. इतिहासाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या ७० बखरी प्रसिद्ध झाल्या आहेत.

'बखर' या शब्दाचा कोशातला अर्थ हकीकत, बातमी, इतिहास, कथानक, चरित्र असा आहे. हा शब्द 'खबर' या फारशी शब्दापासून वर्णव्यत्यासाने आला असावा. बखरी ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मराठी भाषेवर फारशी भाषेचे असलेले वर्चस्व लक्षात घेता वरील

व्युत्पत्ती बरोबर असावी असे वाटते. वि. का. राजवाडे यांच्या मते 'बख-बकणे, बोलणे' या शब्दापासून बखर शब्द मराठीत आला असावा. बखरी म्हणजे चरित्रग्रंथ होय. बखरीचे लेखन विशेषत: उत्तरकालीन झालेले आहे. बखरीमध्ये परंपरेने आलेली माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केलेला असतो. बखर ही साधारणपणे राजाच्या आज्ञेप्रमाणे लिहिली जात असे. त्यामुळे बखरीचा विषय हा राजा व राजकीय घटना यांची माहिती सांगणे हा असतो. बखरकारांनी काळ, व्यक्ती व स्थळ यांचा विपर्यास केला आहे. बखरकार आपल्या व्यक्तीरेखेला जिवंतपणा आणण्यासाठी स्वरचित व काल्पनिक संभाषणे घालत असे. बखरीमध्ये जरी अनेक दोष असले तरी एक ऐतिहासिक साधन या दृष्टीने त्याचे महत्त्व नाकारता येत नाही. बखरींचे ऐतिहासिक कालखंडाच्या दृष्टीने शिवपूर्वकलीन बखर, शिवकालीन बखर व पेशवेकालीन बखर अशी वर्गवारी केली जाते.

**बखरींची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येते.**

(१) चरित्रात्मक (शिवाजी, संभाजी, ब्रम्होद्रस्वामी यांच्या बखरी)

(२) वंशानु चरित्रात्मक (पेशव्यांची बखर ,नागपूरकर मोसल्यांची बखर),

(३) प्रसंग-वर्णनात्मक (पाणिपतची बखर, खरड्याच्या स्वारीची बखर),

(४) पंथीय (श्रीसमर्थाची बखर) ,

(५) आत्मचरित्रपर (नाना फडनीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, बापू कान्हो यांची आत्मवृत्ते),

(६) कैफियती (होळकरांची थैली, होळकरांची कैफियत),

(७) इनाम कमिशनसाठी लिहिलेल्या बखरी (काही कराणे),

(८) पौराणिक (कृष्णजन्मकथा बखर),

(९) राजनीतिपर (आज्ञापत्र) वगैरे.

सर्वसामान्यपणे कोण्यातरी राजकीय प्रमुखाच्या आज्ञेवरून बखरींचे लेखन झालेले दिसते. मुसलमानी तबारिखांचा हा परिणाम असावा. “साहेबी मेहरबानी करून सेवकास......आज्ञा केली” अशी सभासदाच्या बखरीची सुरूवात किंवा भाऊसाहेबांच्या बखरीतील “पत्री आज्ञा आली कीं हिंदुपद (श्री राजा) शाहू छत्रपती यांचा प्रधान मुख्य आदिकरून सवालक्ष फौजेनिशींही भाऊगर्दी होऊन प्यादेमात कैशी जाली  हे सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली”. हा प्रारंभीचा मजकूर पोष्याने पोषकास उद्देशून लिहिलेला आहे. तसेच पाणिपतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव गोपिकाबाईंच्या आज्ञेवरून ती बखर लिहिल्याचे नमूद करतो. तात्पर्य, बहुतेक बखरींचे लेखन पोष्य पोषकभावाने झालेले आहे.

बखरीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सुरूवात आणि शेवट ही दोन्ही पौराणिक पध्दतीची असतात; शिवकालविषयक अनेक बखरीत व्यक्तीच्या वा घटनेच्या वृत्तांताची सुरूवात सृष्टीच्या उत्पत्तीपासून करून नंतर प्राचीन राजांच्या वंशावळी दिल्या जातात; तसेच त्यांचा शेवट इष्ट कामनापूर्तीच्या फलश्रुतीने होतो. उदा.,, जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत

munotes.in

होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणे-प्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण होतील (सभासदाची बखर).

वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली हा बखरींचा एक प्रमुख गुण म्हणता येईल. प्रौढ पण रसाळ भाषा सर्वच बखरीत कमी अधिक प्रमाणात आढळते. आलंकारिक भाषेचाही उपयोग केला जातो; आणि वर्णित शूर वीरला कर्णार्जुनाची उपमा दिली जाते, तर युध्दप्रसांगाला भारतीय युध्द म्हटले जाते. बखरलेखन वाङ्मयीन गुणांनी युक्त होते ते त्यामुळेही. भाऊसाहेबांची बखर किंवा चिटणिशी बखरी यांत याचा उत्तम प्रत्यय येतो. काही बखरींत शिथिल वाक्यरचनाही आढळते. हे सारे बखरनवीसाच्या लेखनप्रभुत्वावर अवलंबून असते.

दीर्घ वाक्यरचनेपेक्षा लघु वाक्यरचनेकडे सर्वच बखरकारांचा अधिक कल असतो. लहानलहान सुटी वाक्ये बखरींत अथपासून इतिपर्यंत आढळतात. अशा रचनेची वाक्ये अधिक परिणामकारक असतात. भाऊसाहेबांची बखर अशा वाक्यांमुळेच आकर्षक झाली आहे. अलंकरणांचा हव्यास आणि दीर्घ वाक्यरचनेची उदाहरणेही चित्रगुप्ताच्या बखरीत वा तत्सम काही अन्य बखरीत आढळत असली, तरी छोटी वाक्ये हा बखरींचा एक खास गुण म्हणता येईल. तसेच प्रचलित मराठीतील ‘की’ ऐवजी ‘जे’ चा वापर, तसेच तृतीयान्त कर्त्याने वाक्य सुरू करून नंतर ते कर्तरी प्रयोगात संपवण्याची उदाहरणे विशेष आढळतात. ‘‘भाऊसाहेब यांणीं मुकाम करून तेथे राहिले’’, ‘‘याप्रमाणे वकिलानें खचीत करून माघारें आले’’ इत्यादी.

### ५.४.२ कुळकटी / कुळांचा इतिहास

ऐतिहासिक कुळांच्या इतिहाससंबंधी टिप्पणे म्हणजे कुळकटी. इतिहासप्रसिद्ध कुळांच्या कुळकटी लिहिण्याची पद्धत होती. यामध्ये एखाद्या कुळाचा उदय विस्तार व हास कसा झाला याची माहिती असते. कुळकटीमध्ये एकाच घराण्याची माहिती असल्याने त्यामध्ये सरमिसळ नसते. कुळकटी तयार करताना परंपरेची व दप्तरातील माहितीची मदत घेतली जात असे. प्रत्येक घटना केव्हा व कशी झाली यासंबंधी स्पष्ट उल्लेख केलेला असतो. एखाद्या - घराण्याचे विभाजन झाले तर स्वतंत्रपणे कुळकटी लिहीत असत. अपवादात्मक परिस्थितीत या कुळकटी राजाच्या किंवा सरदारच्या कानावर तक्रारी घालण्यासाठी लिहीलेल्या असतात. बखर साहित्यापेक्षा याची विश्वसनीयता अधिक असते.

### ५.४.३ वंशवेल व बाडे

वंशवेल एखाद्या घराण्याची वंशावळ सांगणारी असते. कुळाचा इतिहास सांगण्याच्या हेतूने वंशवेल तयार केलेली असते. वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याची पद्धत आहे. पण शिवकलीन वंशवेली उजवीकडून डावीकडे लिहीलेल्या आढळतात, वंशवेलीतील नावे तीच तीच येत राहिल्याने काही वेळा अडचण येते. वंशवेलीची सुरवात ब्रम्हदेवाच्या नावाने होत असते. इतिहासकाळात छापण्याची कला अस्तित्वात नसल्याने मोठमोठे ग्रंथ नक्कल करून संग्रही ठेवण्याची पद्धत होती. अशा ग्रंथांना 'बाड' म्हणत या बाडांमध्ये काही निवडक ऐतिहासिक प्रसंग, राजे, पादशाह यांच्या कारकिर्दीच्या कालगणती, मंत्रतंत्र, शक-सन याबाबतची माहिती असते.

### ५.४.४ ऐतिहासिक महजर व करिने

ऐतिहासिक महजर, करिने ही कागदपत्रे न्याय मिळविण्याच्या व देण्याच्या उद्देशाने तयार केलेली असतात. यामध्ये प्रत्येक्ष पुरावा असतोच असे नाही. पण त्यामधील मजकूर साधार लिहिलेला असतो. महजर म्हणजे महालाना किंवा कसब्यात पंचाईत किंवा मनसुबी झाली. करिने म्हणजे वादी यांच्याकडून हकिगत लिहून घेणे. महजर व करीने याच्यातून इतिहासाची अव्वल माहिती मिळू शकेलच असे नाही. महजर हे न्यायनिवाड्याचे कागदपत्र असे. महजरात दोन्ही बाजूंची मते नोंदवून करून सादर केलेल्या कागदपत्रांची नक्कल असे. करिने हे साधारणता एखाद्या घराण्याच्या जमिनीच्या मालकीबद्दल किंवा वतनाबद्दल माहिती देतात. करिना सादर केल्यानंतर कामदार किंवा गोत पंचायत एकत्र बसून चौकशी करीत व मग करिन्यात लिहिलेली माहिती सुधारून लिहीत असत, गोत सभेत चर्चा झाल्यानंतर महजर करीत व महजर झाले म्हणजे वाद संपला असे समजण्यास हरकत नाही. एकंदरीत महजर व करिने यांच्यातील माहिती गुन्हे व न्यायदानाचे स्वरूप याची माहिती देतात.

### ५.४.५ शकावल्या

पाश्चात्य देशातील 'ॲनल्स' सारखी घटनांची संगतवार, कालक्रमानुसार नोंद करण्याची परंपरा म्हणजे शकवल्या होय. मध्ययुगीन कालखंडात दोन प्रकारच्या शकावल्या आढळतात. एक म्हणजे पौराणिक परंपरा असलेली व दुसरा प्रकार म्हणजे ज्यात संबधित घराण्याच्या राजकीय घडामोडींचा तपशील दिलेला असतो. शकवल्या म्हणजे एकादे घराणे किंवा व्यक्ती यांचे चरित्र देणारे साधन होय. उदा. जेधे शकवली. शकावल्याचे वैशिष्ट्य म्हणजे मध्ययुगीन कालखंडात काही महत्त्वाच्या राजकीय घडलेल्या घडामोडींची तिथी वार यानुसार नोंद करून ठेवलेली असते. त्यामुळे इतिहास लेखनात शकावल्याना महत्त्व आहे.

### ५.४.६ तवारीखा

ऐतिहासिक तवारीखा म्हणजे विजयगाथा होय. इतिहास म्हणजे प्रभावी व्यक्तींचे कार्यकर्तुत्व अशी भूमिका घेऊन राजाचे स्तुतीपर लेखन केले गेले. स्वतः सुलतानांनाही काही तवारीखा लिहीलेल्या आहेत. राजाश्रायाने या तवारीखा लिहिल्यामुळे त्यात दैवी वरदान, राजाचे शौर्य, कर्तुत्व, पराक्रम असे व्यक्तिनिष्ठ वर्णन येते. इ.स. १२ व्या शतकानंतर अरेबिक व पर्शियन भाषेत तवारीखा लिहिण्याची प्रथा रूढ झाली.

### ५.४.७ ऐतिहासिक पोवाडे व काव्ये

पोवाडे व काव्ये यांचा इतिहासाच्या दुय्यम साधनांमध्ये समावेश होतो. कारण यांची रचना वैयक्तिक पातळीवर केली जाते. कवी व शाहीर यांची ज्या व्यक्तीवर व घटनेवर भावना असते अशाच घटना व व्यक्तीबद्दल ते प्रेम व आदर भावनेने काव्य करतात, त्याला पोवाडे म्हणतात. पेशव्यांच्या काळात राम जोशी, अनंत फंदी, होणाजी बाळा इ. शाहीर होऊन गेले. त्याचे काव्य व पोवाडे इतिहासलेखनासाठी महत्त्वाचे असले तरी त्यांना दुय्यम साधन मानल जाते.

munotes.in

### ५.४.८ ऐतिहासिक म्हणी

एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा जनमाणसावर प्रभाव पडत असतो. ऐतिहासिक प्रसंगावरून म्हणी तयार होत असतात. शिवकालीन काही प्रसंगाच्या म्हणी या आजपर्यंत टिकून आहेत. उदा. 'होता जिवा म्हणून वाचला शिवा', 'आधी लगीन कोंडाण्याचे मग रायबाचे', 'गड आला पण सिंह गेला', 'बचेंगे तो और भी लडेंगे' या म्हणी ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचे साधन नाही पण यावरून एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा परिणाम लक्षात येतो.

### ५.४.९ ऐतिहासिक खंडकाव्ये

हा काव्याचाच एक प्रकार आहे. अशा खंडकाव्यात एखाद्या राजाबद्दल त्याच्या जन्मापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंतच्या जीवनाचा आढावा काव्यात्मक पद्धतीने घेतला जातो. खंडकाव्यात एखाद्या दीर्घकाळ चाललेल्या युद्धाबद्दल माहिती दिली जाते. राजे लोक कवींना राजाश्रय देत व त्यांच्याकडून खंडकाव्ये लिहून घेत. पण याचा समावेश दुय्यम साधनात होतो. कारण त्यांच्या रचनेत वास्तवापेक्षा कल्पनेचा भाग अधिक असतो.

### ५.४.१० चरित्रग्रंथ

इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे लिहिलेले चरित्र हे ही इतिहासाचे दुय्यम साधन आहे. कारण ज्या लेखकाने हे चरित्र लिहिलेले असते त्या लेखकाने त्या व्यक्तीस पाहिलेले नसते. पण उपलब्ध पुरावे किंवा कागदपत्रांच्या आधारे चरित्र लिहिले जाते. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडमध्येही अनेक चरित्रग्रंथ लिहिले गेले. उदा. बाणभट्टाचे 'हर्षचरित्र' कवी परमानंदचे 'शिवचरित्र', अबुल फजल याचे 'अकबरनामा' इत्यादी. पण हे सर्व चरित्रग्रंथ व्यक्तिनिष्ठ व स्तुतीपर आहेत. त्यामुळे या चरित्रग्रंथाचा समावेश दुय्यम साधनांमध्ये केला जातो.

### ५.४.११. ऐतिहासिक नाटके व कादंबरी

ऐतिहासिक घटनांवर आधारित नाटके व कादंबऱ्या लिहिण्याची पद्धत आहे. उदा. विशाखा दत्त यांनी लिहिलेले 'मुद्राराक्षस' याशिवाय कालिदास, भास यांची नाटके प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक नाटके व कादंबऱ्या या प्रामुख्याने ऐतिहासिक व्यक्ती, घटना यांच्यावर अवलंबून असतात. परंतु ऐतिहासिक नाटके यांना दुय्यम साधनांचा दर्जा आहे. कारण नाटक म्हणजे इतिहासग्रंथ नव्हे. नाटकातील प्रसंग, पात्र, घटना व संवाद या काल्पनिक असतात. कादंबरीकार आपल्या सामर्थ्यानुसार पात्रे प्रसंग रंगवीत असतो. मूळ ऐतिहासिक साधनांचा आधार घेऊन कादंबरी लिहिली जाते.

### ५.४.१२ ऐतिहासिक वर्तमानपत्रे

इतिहासलेखनामध्ये वृत्तपत्र या संदर्भ साधनाचा दुय्यम साधनामध्ये समावेश होतो. पुरावा किंवा आधार म्हणून वृत्तपत्रीय लेखांचा संदर्भ घेणे म्हणजे वरवरपणा आहे असे म्हटले जाते. पण वृत्तपत्रीय लेखनाचा कसा उपयोग होतो याचा मोठा आदर्श म्हणजे डॉ. य.दी. फडके होय. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर अनेकवेळा एकतर्फी किंवा आतिशयोक्तीवर आधारलेला असतो. त्यामुळे इतिहासलेखन करत असताना एकाच वृत्तपत्रावर किंवा एकाच विचारसरणीच्या अनेक वृत्तपत्रांवर अवलंबून राहून चालत नाही. वृत्तपत्रातील माहिती

munotes.in

तपासून संदर्भ लक्षात घेऊन इतिहासलेखन करावे. पण तरीही त्या त्या कालखंडाचे समाजजीवन, आर्थिक जीवन, एकादी चळवळ किंवा व्यक्ती यांचा अभ्यास करण्यासाठी वृत्तपत्रे निश्चित उपयोगाची संदर्भ साधने आहेत. पण वृत्तपत्र हे अव्वल दर्जाचे साधन नसून दुय्यम साधन असते. ते सामान्यता विश्वसनीय नसते म्हणून या साधनाचा सावध व काळजीपूर्वक उपयोग करावा लागतो.

### ५.४.१३ ऐतिहासिक दंतकथा व आख्यायिका

दंतकथा, आख्यायिका यांचा प्रभाव जनमानसावर कायम असतो. या दंतकथा व आख्यायिका यात सत्य व कल्पित यांची सरमिसळ झालेली असते. उदा. देवी भवानीने भवानी तलवार शिवरायांना दिल्याची कथा काल्पनिक आहे. पण जनमानसात ती घटना सत्य असल्याची दंतकथा सत्य म्हणून रूढ आहे. आजपर्यंत इतिहाससंशोधकांनी हे सबळ पुराव्याअभावी मान्य केले नाही. थोडक्यात इतिहासाच्या अभ्यासाची दुय्यम साधने ही इतिहासलेखनात कमी महत्त्वाची असतात. त्यांचा इतिहासलेखनात वापर करताना काळजी घ्यावी लागते. दुय्यम साधनातील माहिती प्राथमिक साधनाशी पडताळून पहावी लागते.

### ५.४.१४ इतिहासाची इतर आधुनिक साधने

२१ व्या शतकामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आधुनिक कालखंडात संदर्भ साधनांचे स्वरूप बदलेले आहे. त्यामुळे अनेक इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमेही साधन म्हणून वापरतात येत आहेत. यामध्ये आकाशवाणी (रेडिओ), दूरचित्रवाणी (टेलिव्हीजन), लघुपट तसेच संगणक व इंटरनेट माध्यमातून प्रसारीत होणारी वेबजरनल्स यांचाही साधन म्हणून उपयोग केला जातो.

#### ५.४.१४.१ आकाशवाणी (रेडिओ)

आकाशवाणी हे श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीवरून प्रसारीत होणारे कार्यक्रम, बातम्या या ही तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असतात. भारतात आकाशवाणीची सुरवात २३ जुलै १९२७ रोजी झाली आहे. रेडिओवरून बातमीपत्रे, परिसंवाद, प्रबोधनपर कार्यक्रम प्रसारित केले जातात. थोर राष्ट्रपुरुष महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस तसेच महान शास्त्रज्ञ, गायक, संगीतकार यांच्या मूळ आवाजातील ध्वनिमुद्रितसहित आकाशवाणी केंद्राकडे संग्रहित केलेलं असते. त्यामुळे तत्कालीन इतिहासासाठी आकाशवाणी हे एक महत्वाचे आधुनिक साधन ठरते.

#### ५.४.१४.२ दूरचित्रवाणी

हे माध्यम दृकश्राव्य स्वरूपाचे आहे. त्यामुळे घडलेल्या घटनांची माहिती आपण स्वत: डोळयाने पाहू शकतो. दूरचित्रवाणीमुळे समकालीन ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय घडामोडींचे प्रत्यक्ष दर्शन आपल्याला होत असते. यातून बातम्या, शिक्षण, कला, क्रीडा आरोग्य, कृषी, अशा विविध क्षेत्रातील माहिती दिली जाते. दूरचित्रवाणीवरून प्रसारित होणारी ऐतिहासिक नाटके, चित्रपट यातून तत्कालीन लोकजीवनाचे दर्शन घडते त्यामुळे याचाही वापर साधन म्हणून करण्यास मदत होऊ शकते.

munotes.in

### ५.४.१४.३ लघुपट

१९६० साली फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इस्टीटयूट ऑफ इंडिया (FTII) ची स्थापना भारत सरकारने पुणे येथे केली. या संस्थेने राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा आणि संस्कृती या विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित वृत्तपट तयार केले. समाजसेवक, समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती, देशकार्य करणाऱ्या व्यक्ती आणि महत्त्वाच्या स्थळांची माहिती देणारे अनुबोधपट (डॉक्यूमेंटरीज) या विभागाने तयार केली आहेत. हे वृत्तपट व अनुबोधपट (डॉक्यूमेंटरीज) आधुनिक भारताचा इतिहास अभ्यासण्यासाठी उपयोगी आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीपासून ते जागतिक पातळीपर्यंत सर्व विषयांना स्पर्श करण्याची ताकद बाळगणारे लघुपट हे एक प्रभावी माध्यम आहे. एखादा विषय कमीतकमी वेळात प्रेक्षकांसमोर मांडण्याचे कसब ह्या लघुपटातून करता येते. ३ ते ४ लघुपटांची एकत्र सांगड घालून एखादा सिनेमा होऊ शकतो. छ. शिवाजी महाराज, सम्राट अशोक, सम्राट, अकबर, म. गांधी यासारख्या अनेक महान व्यक्तीवर लघुपट निर्माण केलेले आहेत. हे करत असताना दिग्दर्शक इतिहास संशोधकांची मदत घेत असतो. त्यामुळे या लघुपटातून आपल्याला तत्कालीन वेशभूषा, केशभूषा, समाजजीवन याची माहिती मिळत असते. त्यामुळे ही लघुपट इतिहासासाठी एक साधनच ठरत असतात.

### ५.४.१४.४ महाजाल (इंटरनेट) व वेब जर्नल्स

इंटरनेट हे संगणकांच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्कचे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क आहे. यामुळे जगभरातील माहिती आपल्याला घरबसल्या उपलब्ध होते. तर इंटरनेटच्या माध्यमातून जी पत्रकारिता केली जाते त्यास वेब जर्नालिझम असे म्हणतात. या सर्वांचा ही अलीकडे इतिहासाचे साधन म्हणून उपयोग केला जातो.

## ५.५ सारांश

इतिहासलेखनाचा आत्मा म्हणजे साधने (Sources) होत. इतिहास, एक शास्त्र या दृष्टीने विसाव्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे. कोणत्याही शास्त्राचा मुख्य आधार 'साधने' हा असतो. पुराव्याशिवाय कोणतीही बाब शास्त्रामध्ये सिद्ध करता येत नाही. किंबहुना पुराव्याशिवाय केलेले प्रतिपादन शास्त्रीय ठरू शकत नाही. म्हणून शास्त्रामध्ये (पुरावा) महत्त्वाचा असतो. इतिहासाला शास्त्राच्या दर्जापर्यंत नेण्याचा प्रयत्न असल्याने पुरावा' म्हणजे ऐतिहासिक साधने इतिहासलेखनासाठी महत्त्वाची असतात. ऐतिहासिक साधनांचे महत्त्व स्पष्ट करीत असताना प्रो. ॲलन नेव्हिन्स म्हणतात की,“ इतिहासामध्ये दोन महत्त्वाच्या बाबी असतात, विश्वसनीय संदर्भसाधने व त्या साधनांसाठी उपयोगात आणलेली शास्त्रशुद्ध मूल्यमापन पद्धती." या दोन बाबी निर्माण झाल्यावरच खऱ्या अर्थाने इतिहासलेखनास विशिष्ट दर्जा प्राप्त झाला. योग्य प्रकारचे संदर्भसाधन प्राप्त होणे ही इतिहासामधील एक समस्या आहे; कितीही जुने वाटणारे, सकृत दर्शनी खरे वाटणारे कागद खरे असतीलच असे नाही. जुन्या कागदपत्रामध्ये घालमेल करून बनावटगिरी होण्याचीही दाट शक्यता असते. सबब नुसते संदर्भसाधन मिळाले असे वाटून काम होते असे नाही. एखादी घटना अनेकांनी पाहिलेली असली तरी त्याचा अन्वयार्थ वेगवेगळा असू शकतो. उदा. फोर्ड नाट्यगृहात प्रे. लिंकनचा खून झाला. अनेकांनी हा प्रकार पाहिला, पण जेव्हा या

घटनेसंबंधी चौकशी सुरू झाली तेव्हा प्रत्येक व्यक्तीने त्या प्रसंगाचे केलेले वर्णन एकमेकांपासून भिन्न असल्याचे दिसून आले. तसेच दुसरे उदाहरण म्हणजे १९२० साली अमेरिकेमध्ये वॉल स्ट्रीटवर झालेल्या बॉम्बस्फोटाची हकिकत. या घटनेच्या वेळी नऊ साक्षीदारांना त्या वेळी वॉल स्ट्रीटवर अनेक वाहने दिसली. यापैकी फक्त एकालाच लाल रंगाची मोटारकार दिसली, ही साक्षसुद्धा घटना घडल्यानंतर अत्यंत अल्प काळानंतर घेतलेली आहे. म्हणजेच कोणत्याही संदर्भसाधनांसंबंधी ठामपणे काही सांगणे कठीण असते. म्हणजेच समकालीन घटनेसंबंधी जर एवढी संदिग्धता असेल तर १०० वर्षांपूर्वीच्या किंवा त्याहूनही जुन्या घटनासंबंधी काही ठामपणे बोलणे किती कठीण आहे याची आपल्याला कल्पणा येईल.

## ५.६ प्रश्न

१. ऐतिहासिक प्राथमिक लिखित साधने सविस्तर लिहा.

२. प्राथमिक अलिखित साधने स्पष्ट करा.

३. ऐतिहासिक  दुय्यम साधने म्हणून 'बखर' बद्दल सविस्तर लिहा.

४. इतर  आधुनिक साधने स्पष्ट करा.

## ५.७ संदर्भ ग्रंथ


१. कोठेकर, शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, २००४

२. सरदेसाई, बी.एन., इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५

३. शिंदे, सुखदेव, मासाळ धनाजी, देशमुख राजेंद्र, इतिहासलेखनशास्त्राची तोंडओळख व इतिहासाची उपयोगिता, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद २०१५

४. सातभाई, श्रीनिवास, इतिहासलेखनशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद २०११

५. गाठाळ, एस.एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलाश पब्लिशर्स, औरंगाबाद २०११.

६. देव, शां. भा. पुराणतत्त्वविद्या, पुणे, १९७६.देव, शां. भा.

७. गुप्ते, जगदीश, प्रागैतिहासिक भारतीय चित्रकला, प्रयाग, १९६४.

८. माटे म.श्री., मराठवाड्यातील शिल्पवैभव, मुंबई, १९६४.

९. मिराशी वा. वि., संशोधनमुक्तावलि, सर दुसरा, नागपूर, १९५७.

१०. ढवळीकर म. के., प्राचीन नाणकशास्त्र, पुणे, १९७५.

११. Deheja, Vidya, Early Buddhist Rock-Temples. London, 1981.

१२. Fergusson, James Burgess, James, Cave temples of India, London, 1880.

१३. Nagaraju S. Buddhist Architecture of Western India, Delhi, 1981.

१४. Neumayer, Erwin, Prehistoric Indian Rock-Paintings, Bombay, 1984.

१५. Soundara Rajan, K.V. Cave Temples of the Deccan, New Delhi, 1981.

१६. Altekar, A. S. Coinage of the Gupta Empire, Banaras, 1957.

१७. Bhandarkar, D. R. Lectures on Ancient Indian Numismatics, Calcutta, 1921.

१८. Carson, R. A. G. Coins, Ancient, Mediaeval and Modern, London, 1970.

१९. Chakraborty, S. K. A Study of Ancient Indian Numismatics, Mymensingh, 1931.

२०. Codrington, O. A. Manual of Musalman Numismatics, London, 1904.

२१. Cunnigham, Alexander, Coins of Ancient India, Varanasi, 1963.

२२. Henderson, J. R. The Coins of Haider Ali and Tipu Sultan, Madras, 1921.

२३. Mehta, V. M. The Indo-Greek Coins, Ludhiana, 1967.

२४. Rapson, E. J. Indian Coins, Strassburg, 1897.

२५. Thurston, E. History of the Coinage… of the East India Company, 1890.

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ६

# अपारंपारिक साधने

**घटक रचना**

६.० उद्दिष्टे

६.१ प्रस्तावना

६.२ इतिहासलेखनातील पारंपारिक साधने

६.२.१ प्राथमिक साधने

६.२.२ दुय्यम साधने

६.३ इतिहासलेखनातील अपारंपारिक स्रोत व आधुनिक पद्धती

६.३.१ मौखिक साधने

६.३.२ रेडिओ व टेलिव्हिजन

६.३.३ डिजिटल स्रोत

६.४ सारांश

६.५ प्रश्न

६.६ संदर्भ ग्रंथ

## ६.० उद्दिष्टे

१. इतिहास संशोधनातील पारंपारिक साधनांची माहिती घेणे.
२. इतिहास संशोधनातील अपारंपारिक साधनांची माहिती घेणे
३. इतिहास लेखनातील प्राथमिक व दुय्यम साधना बद्दल माहीती घेणे.
४. इतिहासलेखनातील अपारंपारिक स्रोत व आधुनिक पद्धती यांचा आढावा घेणे.

## ६.१ प्रस्तावना

इतिहासाचे लेखन आणि अभ्यास हा भूतकाळासंबंधी माहिती देऊ शकणाऱ्या विविध साधनांवर अवलंबून असतो. भूतकाळाविषयीची माहिती ज्यातून मिळू शकते अशा साधनांना इतिहासाच्या अभ्यासाची साधने म्हणता येते. भूतकाळाविषयी माहिती देणारी अशी साधने विविध स्वरूपाची असतात. त्यांचे वर्गीकरण विविध निकष लावून करण्यात येते. भूतकाळात घडलेल्या घटनांची कालक्रमानुसार शास्त्रशुद्ध आणि पद्धतशीर दिलेली माहिती म्हणजे इतिहास होय व्यक्ती समाज स्थळ आणि काळ हे चार घटक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. इतिहास हा विश्वसनीय पुराव्यांवर आधारित असतो या पुराव्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. साधनांचे भौतिक साधने, लिखित साधने आणि मौखिक साधने असे वर्गीकरण करता येते. त्याचप्रमाणे इतिहासात साधनांचे मुल्यमापन देखील केले जाते. ज्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करायचा असतो तिच्याशी संबंधित अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा आधार घेतला जातो, ही

munotes.in

साधने तपासून घेणे गरजेचे असते.त्याचा अस्सलपणा तपासावा लागतो. या साधनांचा तारतम्याने व चिकित्सकपणे वापर करणे आवश्यक असते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत उपलब्ध पुराव्यांवरून त्या त्या काळातील मानवी प्रयत्न, सामाजिक जीवनातील घडामोडी व परिस्थिती यांविषयी स्थळ, काळ व व्यक्ती यांच्या निर्देशांसह जे लेखन केले जाते, त्यास इतिहासलेखन म्हणतात. प्रत्येक काळात इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. वेगवेगळ्या कालखंडात इतिहासकारांनी इतिहासाचे सुसंगतवार लिखाण केले नसले तरी हा इतिहास जाणून घेण्यासाठी अनेक साधने निर्माण केली आहे. इतिहासाचे लिखाण करत असतांना साधनांना विशेष महत्व असते. काळानुसार या साधनांमध्ये बदल होत गेला.

२० व्या शतकाच्या सुरवातीपासूनच इतिहासाच्या साधनांमध्ये बदल झालेला दिसून येतो. छायाचित्रण व चलचित्रण तंत्र उपलब्ध झाल्याने या साधनांमध्ये आमूलाग्र बदल झाला. छापखान्यामुळे घडणाऱ्या घटनांच्या नोंदी वृत्तपत्रात आढळू लागल्या. २०व्या शतकाच्या मध्यावर विडिओ कॅमेरामुळे आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांमुळे प्रत्येक घटनेचे जिवंत चित्रण होऊ लागले. २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान युगामुळे इंटरनेट, व वेबसाईट यासारखी नवनवीन साधने हाती आली आहेत. ध्वनिफीत, चलचित्रफिती, ही इतिहासाची नवीन विश्वसनीय साधने पुराभिलेख साधनांचे नवीन रूप आहेत. ही सर्व साधने अपारंपारिक किंवा आधुनिक साधने म्हणून ओळखली जातात. ज्याचा वापर हा इतिहासलेखनात होत असतो.

भारताचा इतिहास म्हंटला की  त्या मध्ये मुख्यत: तीन प्रकार पडले आहे. ते म्हणजे प्राचीन भारताचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास, आणि आधुनिक भारताचा इतिहास. या तिन्ही कालखंडात आपल्या पूर्वजांनी काही संसाधने वापरले, तयार केले आणि त्यांचा उपयोग देखील केला. आपण त्या संसाधनांचा अभ्यास केला असता आपले पूर्वज कसे होते ? ते कोणत्या साधनांचा उपयोग करत होते ?  हे सर्व आपल्या लक्षात येणार आहे. तसेच त्या साधनांवरून आपल्याला त्यांचे राहणीमान, त्यांचे संशोधन, तसेच आपली इतिहासातील संस्कृती, चालीरीती, परंपरा, लोककला, लोकसाहित्य आपल्याला कळणार आहे. तर चला आज आपण आपल्या इतिहासाच्या साधनांबद्दल माहिती घेऊया.

## ६.२ इतिहासलेखनातील पारंपारिक साधने

'साधने' हा कोणत्याही शास्त्राचा आधार असतो, तसा तो इतिहासलेखनाचा देखील आहे. इतिहासाच्या लेखनाला आकार प्राप्त करून देण्यासाठी साधनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक्य आहे. इतिहासाच्या पारंपारिक साधनांमध्ये लिखित व अलिखित साधनांचा समावेश होतो. इतिहासाचा अभ्यास करतांना साधारणपणे इतिहासाची दोन साधनांमध्ये वर्गीकरण केले जाते :

### ६.२.१ प्राथमिक साधने

ऐतिहासिक साधनांमध्ये प्राथमिक साधनांना 'मूळ साधने' म्हणून देखील ओळखले जाते. ज्यावेळी घटना घडत असते तेव्हा एखाद्या व्यक्तीने ती घटना जर स्वतःच्या डोळ्यांनी पहिली असेल, तर त्यापासून निर्माण होणाऱ्या साधनाला 'प्राथमिक साधने' म्हणतात. उदा.

बाणभट्टचे हर्षचरित्र, अबुल फजलचा अकबरनामा, अशोक शिलालेख, अलाहाबादचा गुप्तकालीन लेख, इमारती, स्थापत्य, मंदिरे, पुरावशेष, मूर्ती, नाणी, समकालीन प्रशासकीय कागदपत्रे. याव्यतिरिक्त आधुनिक काळात वर्तमानपत्रे, छायाचित्रे, बातमीपत्रे, चलचित्रे, चित्रफिती, ध्वनिफिती, तसेच प्रत्यक्ष घटनांचे चित्रीकरण हे प्राथमिक साधनांच्या अंतर्गत येते.

साधनांचे लिखित व अलिखित साधने असेही एक वर्गीकरण करता येते. लिखित साधनांत निरनिराळ्या भाषांमधील ग्रंथ, शकावल्या, करीने, वंशावळी, मआसिर, बखरी, तवारिखा, कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख, नामे इत्यादिंचा समावेश होतो. अलिखित साधनांत पुरातत्त्वीय वस्तू, भांडी, आयुधे, चित्रे, शिल्पे, वास्तू व स्मारके यांचा समावेश होतो. याशिवाय इतिहाससाधनांच्या भाषेवरून उदा., मराठी, फार्सी, डच, इंग्रजी इ. किंवा लेखनासाठी वापरण्यात आलेली माध्यमे उदा., सोने, तांबे, रुपे, कातडे, लाकूड, कागद, भूर्जपत्र, दगड, माती इत्यादींवरूनही इतिहास साधनांचे वर्गीकरण करता येते. समकालीन, उत्तरकालीन तसेच सार्वकालीन व विशिष्टकालीन असेही वर्गीकरण करता येते.

### ६.२.२ दुय्यम साधने

दुय्यम या शब्दावरून अशा प्रकारच्या साधनांचे स्वरूप मुळात दुय्यम असते. एखादी घटना घडून गेल्यानंतर काही काळाने जेव्हा ती घटना कागदावर उतरून ठेवली जाते तेव्हा अशा साधनांना दुय्यम साधने असे म्हणतात. या साधनांचे वैशिष्ट्ये असे कि, घटना घडून गेल्यानंतर काही काळाने या साधनांची नोंद केली जाते. या दुय्यम साधनांच्या अंतर्गत मूळ साधनांच्या आधारे लिहण्यात येणारे संशोधन पर ग्रंथ, बखरी,शकावल्या, पोवाडे इ. साधनांचा समावेश होतो. दुय्यम साधने हि देखील इतिहासकाराला प्राथमिक साधना इतकीच महत्वाची असतात.

**आपली प्रगती तपासा.**

१) इतिहासलेखनातील पारंपारिक साधनांचा आढावा घ्या.

....................................................................................................
....................................................................................................
....................................................................................................
....................................................................................................
....................................................................................................

## ६.३ इतिहासलेखनातील अपारंपारिक स्रोत व आधुनिक पद्धती

इतिहासाचे लेखन करत असतांना जिथे पारंपारिक साधने उपलब्ध होत नसतात अश्या ठिकाणी अपारंपारिक साधनांचा वापर केला जातो. आजच्या आधुनिक युगात अनेक नवीन तंत्रज्ञानावर आधारित साधने आहेत जी संशोधकाला किंवा एखाद्या अभ्यासकाला संशोधनासाठी उपयुक्त ठरू शकतात, ती साधने पुढील प्रमाणे:

### ६.३.१ मौखिक साधने

मौखिक साधने म्हणजे अशी साधने जी ना कुठे लिहिल्या गेली आहे ना कोणी तयार केली याचा पुरावा आहे. ती फक्त एका पिढी पासून दुसऱ्या पिढी ला तोंडी स्वरुपात शिकवल्या आणि पाठ करून देण्यात आली आहे. अश्मयुगीन आणि मध्ययुगीन इतिहासात ओव्या, लोकगीते, लोककथा, बुद्ध व जैन साहित्य, अनेक धर्माच्या रूढी, परंपरा, चालीरीती ही मौखिक साधने म्हणून ओळखली जातात. आधुनिक इतिहासात मानवाला सर्व कला अवगत होत्या त्यामुळे आधुनिक काळातील मौखिक साधनात स्फुर्तीगीते, पोवाडे, दृक-श्राव्य साधने, छायाचित्रे, ध्वनिमुद्रीते आणि चित्रपट या सारख्या आधुनिक साधनांचा समावेश करण्यात येते.

मौखिक साधने किंवा मौखिक इतिहास म्हणजे इतिहासाच्या लेखनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यक्तिगत, कौटूंबिक, समूहसंबधी, दैनंदिन जीवनासंबंधी महत्वपूर्ण घटनासंबंधी मौखिक स्वरूपातील माहितीचा ध्वनिमुद्रण म्हणजेच साऊंड रेडकॉर्डिंग, किंवा मुलाखतीची ट्रांसस्क्रिप्ट इ. माध्यमातून संग्रह आणि अभ्यास होय. थोडक्यात, ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने जात असते. ज्या संशोधनात लिखित साधनांचा अभाव असतो तिथे मौखिक साधने काळजीपूर्वक उपयोगात आणता येतात. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित - सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी देखील केला गेला. तसेच पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

munotes.in



एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित - सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासाचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी देखील उपयुक्त ठरला. तसेच

पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला. १९४० मध्ये ध्वनीमुद्रणाच्या साह्याने मौखिक इतिहास लिहला गेला; मात्र एकविसाव्या शतकात त्यासाठी डिजिटल ध्वनीमुद्रणाचा वापर होत आहे. मुलाखतिचे दस्तावेज किंवा मौखिक इतिहासाचे ध्वनीमुद्रणाचे लिप्यंतरण, सारांशित वा अनुक्रमित केले जाऊन ते संग्रहालय किंवा ग्रंथालयात ठेवले जातात. या ध्वनीमुद्रीत मौखिक इतिहासाचा उपयोग संशोधन, प्रकाशन, माहितीपट, प्रदर्शन, नाटक वा सादरीकरणाच्या इतर प्रकारात केला जाऊ शकतो.

मौखिक इतिहासाचा मुळ उद्देश अशा व्यक्तिची मुलाखत घेण्याचा असतो की, ज्याला इतिहासातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे एखादा महत्त्वपूर्ण अलिखित इतिहास उलगडण्यासाठी लोकांचा दबलेला आवाज पुढे आणण्याचे, लोकांना व्यक्त करण्याचे मौखिक इतिहास हे एक साधन आहे. स्त्रिया, कामगार, अल्पसंख्याक, आदिवासी समुदाय इत्यादी लोकांची माहिती आणि त्यांवर भूतकाळात झालेले अन्याय-अत्याचार मौखिक इतिहासामुळे कोणत्या ना कोणत्या व्यक्तीच्या माध्यमातून पुढे येऊ शकते. त्यामुळे मौखिक इतिहास हे ऐतिहासिक संशोधनासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे पूरक असे साधन मानले जाते. त्याचप्रमाणे मौखिक इतिहास हे भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडण्याचे काम करते. या पद्धतीमुळे लोक समाजाला व स्वतःला कसे सादर करतात, हे समजण्यास मदत होते.

ऐतिहासिक घटनांमधील साक्षीदारांकडून त्यांच्या स्मृतींवर आधारित माहिती गोळा करणे व त्यांचे विश्लेषण करणे म्हणजे मौखिक इतिहास होय. ही क्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिकपद्धतीने जात असते. असंरचित मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीकडून एखाद्या घटनेची, कार्यक्रमाची किंवा क्रियेची माहिती गोळा करण्याची ही पद्धती होय. मौखिक इतिहास हा व्यक्तिच्या आठवणींवरती आधारित असतो. भूतकाळात घडलेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक या घटना व्यक्ती तिच्या आठवणींच्या आधारे एखाद्यास सांगतो व ऐकणारा त्या आठवणींच्या आधारावरून विश्लेषण करीत असतो. मौखिक इतिहासपद्धती ही ऐतिहासिक दस्तऐवजीकरणासाठी वापरात येणारी सर्वात जुनी पद्धती मानली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात युरोपियन समाजात प्रामुख्याने अशिक्षित–सर्वसामान्य समाजावरील संशोधनात मौखिक इतिहासपद्धतीचा वापर केला गेला. मौखिक इतिहासपद्धतीचा वापर ब्रिटनमधील कामगारांची परिस्थिती समजून घेण्यासाठी देखील केला गेला. तसेच पहिल्या व दुसऱ्या जागतिक युद्धांतील साक्षीदारांकडून युद्धाच्या आठवणी जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर या पद्धतीचा वापर करण्यात आला.

१९४० मध्ये ध्वनीमुद्रणाच्या साह्याने मौखिक इतिहास घेतला गेला; मात्र एकविसाव्या शतकात त्यासाठी डिजिटल ध्वनीमुद्रणाचा वापर होत आहे. मुलाखतिचे दस्तावेज किंवा मौखिक इतिहासाचे ध्वनीमुद्रणाचे लिप्यंतरण, सारांशित वा अनुक्रमित केले जाऊन ते संग्रहालय किंवा ग्रंथालयात ठेवले जातात. या ध्वनीमुद्रीत मौखिक इतिहासाचा उपयोग संशोधन, प्रकाशन, माहितीपट, प्रदर्शन, नाटक वा सादरीकरणाच्या इतर प्रकारात केला जाऊ शकतो. मौखिक इतिहासाचा मुळ उद्देश अशा व्यक्तिची मुलाखत घेण्याचा असतो की, ज्याला इतिहासातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे एखादा महत्त्वपूर्ण अलिखित इतिहास उलगडण्यासाठी लोकांचा दबलेला आवाज पुढे आणण्याचे, लोकांना व्यक्त करण्याचे मौखिक इतिहास हे एक साधन आहे. स्त्रिया, कामगार, अल्पसंख्याक इत्यादी लोकांची माहिती आणि

त्यांवर भूतकाळात झालेले अन्याय-अत्याचार मौखिक इतिहासामुळे कोणत्या ना कोणत्या व्यक्तीच्या माध्यमातून पुढे येऊ शकते. त्यामुळे मौखिक इतिहास हे ऐतिहासिक संशोधनासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वाचे पूरक असे साधन मानले जाते. त्याचप्रमाणे मौखिक इतिहास हे भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडण्याचे काम करते. या पद्धतीमुळे लोक समाजाला व स्वत:ला कसे सादर करतात, हे समजण्यास मदत होते. मौखिक इतिहासाचा वापर १९८० मध्ये 'इतिहास' व 'आठवणी' यांच्या सहसंबंधातील उदयामुळे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. आठवण ही मौखिक इतिहासाचा खूप मोठा आधार आहे. आठवण ही सामाजिक उत्पादनाचे प्रभावी साधन मानता येत; कारण आठवणीतून दैनंदिन जीवनातील भूतकाळ व वर्तमानकाळ यांना जोडणारे ज्ञान तयार होत असते. मौखिक इतिहासपद्धतीमुळे दुर्लक्षित घटकांची जाणीव, संवेदना समजून घेण्यास मदत होते. मौखिक इतिहास हा सत्ताधारी घटकाकडून न येता, तो थेट भोगलेल्या व्यक्तिच्या तोंडून बाहेर येत असतो. ग्लक यांच्या मते, 'ज्या स्त्रियांनी औपचारिक शिक्षण घेतले नाही किंवा ज्या स्त्रियांना संवाद साधण्यास जमत नाही, अशा स्त्रियांची माहिती घेण्यासाठी व त्यांना सशक्त बनविण्यासाठी मौखिक इतिहास महत्त्वाचे साधन आहे.

कोणताही घटक जसजसा व्यापक बनत जातो, तसतसा त्याच्या विकासाच्या मार्गात आव्हाने निर्माण होत जातात. हा प्रकार काहीसा मौखिक इतिहासाच्या बाबतीतही सिद्ध होताना दिसतो. प्रत्यक्षार्थवादाच्या (positivism) वाढत्या प्रभावामुळे मौखिक इतिहासपद्धतीकडे तथाकथित विश्वसनियतेच्या मुद्द्यावरून संशयास्पदपद्धतीने बघितले गेले. पुढे महायुद्धोत्तर काळात मात्र युरोप आणि अमेरिका यांमध्ये सामाजिक इतिहास या अभ्यास विषयाच्या उदयामुळे मौखिक इतिहासपद्धतीचे एकप्रकारे पुनरुज्जीवन झाले. या पुनरुज्जीवनाच्या टप्प्यावर प्रामुख्याने दबलेल्या, परिघावरील तसेच सर्वसामान्य आवाजांचे दस्तावेजीकरण करण्यासाठी उपयुक्त आणि योग्य पद्धती म्हणून मौखिक इतिहास पद्धती प्रस्तापित झाल्याचे दिसते.

प्रत्यक्षार्थवादाने मौखिक इतिहासावर टिका करताना म्हटले आहे की, मौखिक इतिहासपद्धती वापरताना राजकीय दृष्टिकोन बळावू शकतो. वस्तुनिष्ठता आणि व्यक्तिनिष्ठतेच्या पातळीवर प्रत्यक्षार्थवादींनी प्रश्न उपस्थीत केला; कारण मौखिक इतिहासाद्वारे अशा व्यक्तीची माहिती घेतली जाते, ज्या बरेचदा मृत असतात आणि मौखिक इतिहास सांगणाऱ्या व्यक्तीला तिच्या स्वतःच्या इतिहासाबद्दल विशेष ओढ असते. त्यामुळे त्या आपल्याला माहिती देताना ते 'कल्पनेतील विश्व' अशी माहिती सांगू शकतात. त्यांनी सांगितलेली ती मौखिक माहिती रास्त असेलच असे नाही. मौखिक इतिहासपद्धतीवर वस्तुनिष्ठतेच्या बाबतीत मोठी टीका केली जाते. असे मानले जाते की, संशोधक एखाद्याच्या मौखिक माहितीमध्ये सोयीनुरूप बदल करू शकतो किंवा मुलाखत घेताना त्या व्यक्तिबद्दल त्याच्या मनात भावनिकता निर्माण होऊ शकते. त्यामुळे मौखिक इतिहासपद्धतीच्या संशोधनामध्ये वस्तुनिष्ठता कमी असू शकते, असे मानले जाते.

मौखिक इतिहासाच्या बाबतीत ज्या अडचणी आल्या आहेत, त्या सर्वसाधारणपणे सर्वच संशोधनपद्धतींपुढे आलेल्या दिसतात. मौखिक इतिहासाच्या विकसित स्वरूपाने या सर्व अडचणींवर मात केले असून ही पद्धती देखील पुढे जात आहे. या विकसित स्वरुपात वस्तुनिष्टतेच्या आक्षेपाची दखल घेतांना असे म्हटले गेले की, एखादी आठवण किंवा



munotes.in

ऐतिहासिक सत्य यातील तथाकथित तथ्य शोधण्याऐवजी ती आठवण किंवा ते ऐतिहासिक सत्य कोणत्या विशिष्ट प्रकारे मांडले गेले आहे, याकडे बघणे अधिक गरजेचे आहे. ही सत्याची विशिष्ट प्रकारची मांडणी संशोधकांसाठी महत्त्वाचे दालन खुले करणारी ठरू शकते.

१९४८ मध्ये डॅलन नेवील व पॉल थॉमसन यांनी मौखिक इतिहासाचा वापर सुरू केला. या पद्धतीवरती पॉल थॉमसन यांनी १९८७ मध्ये लिहिलेले द वॉइस ऑफ द पास्ट हे अतिशय मूलभूत पुस्तक आहे. मौखिक इतिहासाची 'मौखिक इतिहास समाज' (Oral History Society) नावाची जागतिक संघटना आहे. ज्याच्या माध्यमातून मौखिक इतिहास नावाचे मासिक चालवले जाते. इतिहास लेखन करताना मौखिक साधनांनद्वारे त्या काळातील माहिती मिळते. त्या काळातील रुढी - परंपरा, चालीरिती , समाज अशा सर्वच बाबतीतील माहिती मिळते.

## ६.३.२ रेडिओ व टेलिव्हिजन

आधुनिक काळात इतिहासाचे साधन म्हणून रेडिओ व टेलिव्हिजन यांना ओळखले जाते. रेडिओ वरील बातम्या, वृत्तविशेष घटनांचे समालोचन हि सर्व समाजप्रबोधनाचे साधन आहे. रेडिओ प्रेषण हे एकमार्गी संदेशवहन प्रस्थापित करण्याचे साधन आहे. रेडिओ प्रेषणात फक्त ध्वनीचे प्रेषण करण्यात येते, तर दूरचित्रवाणी प्रेषणात दृक् तसेच श्राव्य असे संयुक्त प्रेषण करण्यात येते. या अर्थाने रेडिओ प्रेषणास १९२० च्या सुमारास तर दूरचित्रवाणी प्रेषणाला १९३० नंतरच्या दशकात (१९३६ मध्ये) प्रारंभ झाला. कित्येक देशांत रेडिओ व दूरचित्रवाणी यांच्या प्रेषणाचे व्यवस्थापन एकत्रितपणे करण्यात येत असल्याने प्रस्तुत नोंदीत रेडिओ प्रेषणाबरोबरच दूरचित्रवाणी प्रेषणाचीही (व अनुषंगिक बाबींची) माहिती दिलेली आहे.

रेडिओ मधील एखाद्या व्यक्तीची मुलाखत किंवा एखादे भाषण व एखादी घटना हि ऐतिहासिक साधन म्हणून त्याचा वापर केला जाऊ शकतो. उदा. इंदिरा गांधींनी रेडिओवरील आणीबाणीची केलेली घोषणा. टेलिव्हिजन ने आधुनिक जगात क्रांती घडवून आणली. जगात एखादी घटना घडत असतांना टेलिव्हिजनच्या माध्यमातून ती घटना आपणास कळू शकते. उदा. तालिबान्यांनी अफगाणिस्तानवर केलेला कब्जा किंवा कोरोना काळात जगातील सर्व देशांच्या आरोग्य व्यवस्थेची मिळालेली माहिती. रेडिओ व टेलिव्हिजन द्वारे मिळणाऱ्या माहिती ही एखाद्या संशोधकांसाठी किंवा विद्यार्थ्यांसाठी संशोधनात उपयुक्त ठरू शकते.

## ६.३.३ डिजिटल स्रोत

आज आपण डिजिटल जगात वावरत आहोत. एकविसाव्या शतकाला डिजिटायझेशनचे शतक म्हणता येईल, कारण बहुतेक स्त्रोतांचे डिजिटायझेशन झाले आहे आणि ते संशोधकाला डिजिटायझेशन स्वरूपात उपलब्ध आहेत. डिजिटायझेशनमुळे अनेक ग्रंथालये, संग्रह, संग्रहालये इत्यादींमध्ये उपलब्ध असलेले समृद्ध स्रोत संशोधकाला माउसच्या एका क्लिकवर उपलब्ध होतात. आजकाल, संशोधक डिजिटेशन्समुळे दूरच्या टोकावर बसून डेटाबेस तसेच लायब्ररी, आर्काइव्ह इत्यादी संग्रहांमध्ये प्रवेश करू शकतात. महामारी आणि लॉकडाऊनसारख्या विलक्षण काळात संशोधक त्यांचे संशोधन कार्य संबंधित ग्रंथालयात न जाता किंवा भौतिकरित्या संग्रहित न करता करू शकतात.

या डिजिटल स्त्रोतामध्ये विविध साधने आहेत ती पुढीलप्रमाणे :

### ६.३.३.१ डिजिटल अर्काइव्ह (संग्रहण)

२१व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे डिजिटल माहितीची निर्मिती आणि वापर हा वाढलेला दिसतो. इंटरनेटमुळे जगभरातील सर्व्हर आणि संगणक एकमेकांशी जोडले गेले आहे. डिजिटल अर्काइव्ह स्थापन करण्यामागे दोन मुख्य उद्देश असतात. एक, मौल्यवान डिजिटल माहितीचा कोणत्याही प्रकारे ह्रास न होऊ देता पुढील पिढ्यांसाठी ती माहिती संग्रहित करणे. दोन व्यवस्थितरीत्या निर्माण केलेल्या डिजिटल अर्काइव्ह मध्ये कोणत्याही पद्धतीचा तांत्रिक दोष होऊ नये यासाठी उपाययोजना करणे. डिजिटल अर्काइव्ह मध्ये पुराभिलेखाप्रमाणे ऐतिहासिक कागदपत्रांचे, ऐतिहासिक वस्तूंचे छायाचित्रण अथवा स्कॅनिंग करून त्यांचे डिजिटल माहितीत रूपांतर केले जाते. याद्वारे ऐतिहासिक कागदपत्रांचे व ऐतिहासिक वस्तूंचे डिजिटल माहितीच्या स्वरूपात जतन करता येते. डिजिटल अर्काइव्ह जतन केलेली माहिती हि संशोधकाला ऑफलाईन अथवा ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिली जाते.

डिजिटल अर्काइव्ह हे प्रामुख्याने तीन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह हे शासकीय पुराभिलेखागार, ग्रंथालये, विदयापीठे, संग्रालये, शासकीय संस्था, इतिहासविषयक व सांस्कृतिक मंडळ इ. द्वारे चालवले जाते. या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह संशोधकांना वापरण्यासाठी मोफत किंवा नाममात्र शुल्कात संशोधकांना उपलब्ध करून दिले जाते. उदा. भारत सरकारचे नॅशनल अर्काइव्ह व पुणे येथील भांडारकर रिसर्च इन्स्टिटयूट. दुसऱ्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह हे कोणत्याही एका व्यक्तीद्वारे लोकांच्या छोट्या समूहाद्वारे अथवा स्वयंसेवी संस्थांद्वारे तयार केले जाते. उदा. महाराष्ट्रातील धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळ. तिसऱ्या प्रकारातील डिजिटल अर्काइव्ह मध्ये प्रकाशक अथवा व्यावसायिक संस्थांच्याद्वारे संशोधकांना, विद्यापीठांना आणि ग्रंथालयांना सशुल्क उपलब्ध करून दिले जातात.

### ६.३.३.२ इंटरनेट संग्रहण

इंटरनेट आर्काइव्हज हा लाखो पुस्तके, चित्रपट, सॉफ्टवेअर, वेबसाइट इत्यादींमध्ये प्रवेश देण्यासाठी हाती घेतलेला एक मोठा प्रकल्प आहे. हा एक स्वतंत्र ना-नफा प्रकल्प आहे. इंटरनेट आर्काइव्हज हे एक स्वतंत्र ना-नफा ग्रंथालय आहे जे मोफत पुस्तके, सॉफ्टवेअर्स, वेबसाइट्स इत्यादींना विनामूल्य प्रवेश देण्यासाठी तयार केले गेले आहे. इंटरनेट आर्काइव्हज देणगीच्या मदतीने चालवले जाते आणि व्यवस्थापित केले जाते. ते स्वतःची प्रणाली विकसित करते आणि ते त्याच्या सामग्रीमध्ये विनामूल्य प्रवेश देते, वापरकर्त्यांची माहिती विकत नाही आणि जाहिराती देखील चालवत नाही. आधी सांगितल्याप्रमाणे इंटरनेट आर्काइव्हज संशोधक आणि इतिहासकारांना त्यातील सामग्री विनामूल्य प्रवेश प्रदान करते.

१९९६ पासून याने इंटरनेट जतन करणे किंवा संग्रहित करणे सुरू केले. सध्या त्याच्या संग्रहात पंचवीस वर्षांपेक्षा जास्त वेब इतिहास आहे. ज्याने लाखो पुस्तके आणि मजकूर, वेब पृष्ठे, दूरदर्शनवरील बातम्यांचे कार्यक्रम, प्रतिमा, ऑडिओ रेकॉर्डिंग आणि सॉफ्टवेअर प्रोग्राम हे जतन केले आहेत. ऐतिहासिक संशोधनासाठी वेब अभिलेखागार हे इतिहासकारांसाठी,

विशेषतः सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासकारांसाठी उपलब्ध असलेले आणखी एक डिजिटल व्यासपीठ आहे. या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध माहिती आणि डेटामध्ये प्रवेश करून एखाद्याच्या ऐतिहासिक संशोधनाला चालना मिळू शकते. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे यात करोडो वेबपेजेस आहेत ज्यात वैयक्तिक होम पेज तसेच व्यावसायिक आणि शैक्षणिक वेबसाइट्सचा समावेश आहे. या स्त्रोतावरून मिळालेली माहिती इतिहासकारांना एखाद्या विशिष्ट गोष्टीच्या किंवा क्षेत्राच्या इतिहासाची पुनर्रचना करण्यात नक्कीच मदत करेल. या अनोख्या प्रकल्पाची उद्दिष्टे म्हणजे ऐतिहासिक संसाधन म्हणून वेबबद्दल जागरूकता निर्माण करणे, इतिहासकारांना या नवीन माध्यमाशी जोडणे आणि डिजिटल मेमरी आणि रेकॉर्डबद्दल जागरूकता निर्माण करणे. इतिहासकारांना अलीकडील भूतकाळातील डिजिटल प्राथमिक स्त्रोतांपर्यंत पोहोचण्यास मदत करणे हा देखील त्याचा उद्देश आहे. इतकेच नाही तर ते या स्त्रोतांचा अर्थ लावण्याचा आणि क्यूरेट करण्याचाही प्रयत्न करते.

इंटरनेटचा उपयोग करण्यासाठी संगणक, फोन याशिवाय त्या दोघांना जोडणारे मॉडेम नांवाचे उपकरण लागते. मॉडेमची क्षमता बॉड रेटमध्ये (बिट्स पर सेकंद) म्हणजे एका सेकंदात माहितीचे कण वहन करण्याची क्षमता यात दर्शविली जाते. जास्त बॉडचे उपकरण घेणे भविष्यातील प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे. इंटरनेट वरून तुम्हाला समजा माहिती पाठवायची असेल तर जेथे ती पाठवायची त्याचा सांकेतिक क्रमांक देऊन ती पाठवावी लागते. ही माहिती जशीच्या तशी न जाता आधी त्याचे छोट्या भागांत (पॅकेज) रूपांतर केले जाते हे भाग कमी जास्त लांबीचे असू शकतात. हे भाग रूटर नावाच्या विशिष्ट संगणकाव्दारे एका नेट वरून दुसऱ्या नेटवर असे करत योग्य पत्त्यावर पाठविले जातात. (जणू काही वेगवेगळया बॅगांमधून पाठविलेले सामान) ज्या ज्या ठिकाणाहून भाग घेतले वा पाठविले जातात तेथे अनेक मार्गांनी माहितीची पाकिटे येत असतात. ज्या ठिकाणी जायचे त्यासाठी देखील अनेक मार्ग उपलब्ध असतात. त्यामुळे कोणत्या मार्गावर रहदारी कमी आहे व वेळ कमी लागेल याचा विचार करून प्रत्येक पॅकेज पाठविले जाते. हे सर्व अतिशय वेगात चालत असल्याने वेगवेगळया मार्गाने प्रवास करूनही हे भाग अत्यल्प वेळात मुक्कामी पोचतात. त्याचवेळी इतर ठिकाणहून माहिती येत असल्यास त्याचा क्रम लावला जातो. व पोस्ट बॉक्ससारखी त्या संगणाकावर सर्व माहिती साठवून ठेवली जाते. म्हणजे रोज कामाला सुरूवात करण्यापूर्वी कोणाकोणाची पत्रे आली आहेत ते ही पोस्ट बॉक्स उघडून पाहता येते

### ६.३.३.३ गुगल पुस्तके

गुगल बुक्सना आधी गुगल बुक सर्च आणि गुगल प्रिंट आणि त्याचे कोडनेम प्रोजेक्ट ओशन असे संबोधले जात असे. ही गूगल Inc. द्वारे वाचक आणि संशोधकांसाठी उपलब्ध करून दिलेली हि मोफत सेवा आहे. Google Books चे वैशिष्ट्य म्हणजे ते पूर्ण पाठ्य पुस्तके आणि मासिकांमध्ये प्रवेश देते. ती पुस्तके आणि मासिके उपलब्ध आहेत ज्या Google Inc द्वारे मजकूरात रूपांतरित केलेल्या स्कॅन केलेल्या प्रती आहेत. मजकुरात रूपांतर करण्यासाठी ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR) वापरला जातो. Google Books वर उपलब्ध असलेली पुस्तके ही Google Books Partner Program या कार्यक्रमांतर्गत लेखक किंवा प्रकाशकांकडून मिळवली जातात. गुगलच्या लायब्ररी पार्टनर्सकडूनही पुस्तके मिळवली जातात आणि त्यासाठी गुगलच्या लायब्ररी प्रोजेक्टचा खूप उपयोग होतो. या आधी उल्लेख केलेली मासिके गुगल बुक्स वर उपलब्ध करून दिली आहेत. Google वर उपलब्ध डेटाबेस,

ई-संसाधने आणि एकूण माहिती. संशोधक आणि इतिहासकारांना पुस्तकांचा नक्कीच उपयोग होतो. माहिती गोळा करण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी आणि ऐतिहासिक संशोधनाला चालना देण्यासाठी हे नवीन युगाचे साधन किंवा स्त्रोत म्हणून योग्यरित्या वर्णन केले जाऊ शकते.

### ६.३.३.४ ब्रिटिश संग्रहालय

ब्रिटिश म्युझियम अथवा संग्रहालय ही सार्वजनिक संस्था आहे, जी मानवी इतिहास, कला आणि संस्कृतीला वाहिलेली आहे. हे युनायटेड किंगडमची राजधानी लंडनमधील ब्लूम्सबरी भागात आहे. ब्रिटीश म्युझियममध्ये जगातील प्राचीन संस्कृतींशी संबंधित महान संग्रह आहे. उदा. इजिप्शियन संस्कृती. प्राचीन संस्कृतींची वेबसाइट जगातील प्राचीन संस्कृतींची माहिती देते. त्याच्या नवीन ऑफर देखील प्राचीन भारताशी संबंधित अनिमेशन, 3D मॉडेल्स इत्यादी स्वरूपात आहेत. ब्रिटीश म्युझियमच्या वेबसाइटवर आणि इतर साधनांवर उपलब्ध असलेल्या माहितीमुळे संशोधक आणि इतिहासकार समृद्ध होऊ शकतात. इतिहासकारांना या स्त्रोतांच्या प्रकाशात इतिहासाची पुनर्बांधणी आणि अर्थ लावण्यास नक्कीच मदत होईल. २१व्या शतकातील इतिहासाच्या नवीन साधनांमध्ये याचे विशेष महत्व आहे.

### ६.३.३.५ चित्रपट किंवा सिनेमा

चित्रपट हे एक मनोरंजनाचे साधन आहे, पण त्याचबरोबर ते आपल्याला काही संदेशही देतात. सध्याच्या या युगात मनोरंजनाची माध्यमे आणि संदेश देण्याचे व्यासपीठ याशिवाय, चित्रपट ऐतिहासिक संशोधनाचा स्त्रोत ठरत आहेत. चित्रपट किमान ऐतिहासिक संशोधनाला मदत करत आहेत असे सोयीस्करपणे म्हणता येईल. जेव्हा आपण म्हणतो की, चित्रपट हा ऐतिहासिक साहित्याचा एक चांगला स्त्रोत असू शकतो, तेव्हा एखाद्याने हे पहावे की निर्मात्याने पटकथा लिहिण्यापूर्वी सखोल संशोधन केले आहे आणि कथा ऐतिहासिक घटनेवर आधारित आहे. काही चित्रपट दिग्दर्शक आणि लेखक सखोल संशोधन करतात आणि चित्रपट लिहिण्यासाठी अस्सल आणि विश्वासार्ह स्त्रोतांचा संदर्भ घेतात, असे चित्रपट केवळ वास्तविक ऐतिहासिक तथ्ये सांगत नाहीत, तर चित्रपटाच्या स्क्रिप्टिंगसाठी संदर्भित केलेल्या दर्शकांना संदर्भ देखील देतात. समाजातील काही लोकांच्या ऐतिहासिक सामाजिक आणि आर्थिक शोषणावर आधारित आणि त्यावर प्रकाश टाकणारे हिंदीसह विविध भाषांमध्ये भारतात अनेक चित्रपट तयार झाले आहेत.

अलीकडच्या काळात अनेक ऐतिहासिक विषयांवर असंख्य चित्रपट बनवले गेले आहे. ज्या मुळे एखाद्या ऐतिहासिक विषयाची माहिती त्या चित्रपटांमधून मिळते. उदा. बाजीराव - मस्तानी या चित्रपटात पेशवा बाजीराव याचे चित्रण रेखाटले आहे. तर सरदार उधम या चित्रपटात उधम सिंग यांच्या क्रातींकारी जीवनाचा आढावा घेतला आहे. परंतु अशा चित्रपटातून अनेक वेळा ऐतिहासिक ह्या तोडून मोडून दाखवल्या जातात. त्यामुळे त्यांच्या विश्वासतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतात.

### ६.३.३.६ वर्ल्डकॅट

ओहायो कॉलेज लायब्ररी सेंटर ( OCLC) ची स्थापना १९६७ च्या आसपास झाली आणि नंतर ते ऑनलाइन कॉम्प्युटर लायब्ररी सेंटर म्हणून ओळखले जाऊ लागले आणि नंतर त्याचे

नाव OCLC Inc असे बदलले गेले. OCLC आणि इतर लायब्ररींनी वर्ल्डकॅट विकसित केले आहे. वर्ल्डकॅट हा सर्वात मोठा ऑनलाइन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (OPAC) मानला जातो. वर्ल्डकॅटचा संग्रह संशोधकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्याच्या भांडारात बरेच लेख आहेत. संदर्भग्रंथांशी संबंधित माहिती तसेच गोषवारा मिळू शकतात. हे वाचकांना पूर्ण मजकूर माहिती देखील प्रदान करते. वर्ल्डकॅट जगभरातील हजारो लायब्ररींच्या सामग्रीमध्ये प्रवेश देते आणि सामग्रीमध्ये डीव्हीडी आणि सीडी देखील समाविष्ट आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) इतिहासलेखनातील अपारंपारिक व आधुनिक पद्धतींचा आढावा घ्या

.............................................................................................
.............................................................................................
.............................................................................................
.............................................................................................

## ६.४ सारांश

ऐतिहासिक प्रक्रियांचे वर्णन करणारी आणि भूतकाळातील मानवी समाजाची वाढ आणि विकास जाणून घेण्यास आणि अभ्यास करण्यास मदत करणारी कोणतीही सामग्री इतिहासाचा स्रोत मानली जाऊ शकते. फक्त एक गोष्ट म्हणजे संबंधित सामग्री प्रामाणिक आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे आपण असे म्हणू शकतो की ऐतिहासिक स्त्रोत म्हणजे काहीही नसून सांस्कृतिक आणि भौतिक वस्तूंच्या रूपात राहते आणि भूतकाळात मानवाने तयार केलेल्या लिखित नोंदी देखील असतात. हे स्त्रोत आपल्याला भाषा, चालीरीती, चालीरीती आणि भूतकाळातील मानवी जीवनाच्या सर्व पद्धतींबद्दल माहितीची पुनर्रचना करण्यास मदत करतात. जोपर्यंत लिखित स्त्रोतांचा संबंध आहे तोपर्यंत ते खडकांवरील लेखन, बर्च झाडाची साल, कागद इत्यादी विविध स्वरूपात आढळतात. आणि लिखित स्त्रोतांनी पुस्तके, मासिके, लेख, वृत्तपत्रे इत्यादी स्वरूपात छापलेली सामग्री देखील समाविष्ट केली आहे. लिखित स्रोत हे इतिहासातील सर्वात मोठे स्त्रोत साहित्य बनवतात. लिखित स्रोत अफाट आहेत आणि ते सरकारी अभिलेखागार, पितृसंस्था, कारखाने, कौटुंबिक संग्रह, संस्थांचे संग्रह इत्यादींमध्ये आढळतात. लिखित दस्तऐवज किंवा स्रोत आर्थिक, सांख्यिकीय, न्यायिक, प्रशासकीय, वैधानिक, राजनैतिक अशा विविध प्रकारची माहिती देतात. लष्करी इ. समकालीन काळात डिजिटल आणि इंटरनेट आधारित स्त्रोत मुबलक आणि सोयीस्करपणे उपलब्ध आहेत ज्यामुळे ऐतिहासिक संशोधन तुलनेने सोपे झाले आहे.

## ६.५ प्रश्न

१. इतिहास लेखनातील पारंपारिक व अपारंपारिक साधनांचा आढाव घ्या

२. इतिहास लेखनातील प्राथमिक व दुय्यम साधनांबद्दल सविस्तर माहीती लिहा.

३. इतिहास लेखनातील आधुनिक साधने कोणती माहिती द्या

४. डिजिटल अर्काइव्ह ( संग्रहण ) बद्दल सविस्तर माहिती द्या

## ६.६ संदर्भ ग्रंथ


१. कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५

२. सरदेसाई बी. एन, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२

3. शेळके नागेश, मौखिक इतिहास, विकीपीडिया, ७/८/२०२०

4. इतिहास लेखनातील नवे प्रवाह, (स्टडी मटेरियल ) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५. Deshpande Anirudh, Films as Historical Sources or Alternate History, Economic and Political Weekly, Vol. 39, No. 40 (Oct. 2-8, 2004), Published by Economic and Political Weekly.

६. Barber S. & Penistone - Bird, History Beyond the Text: A Student's Guide to Approaching Alternative Sources, New York.


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

७

# उद्धरण पद्धती

**घटक रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ उद्धरण व संदर्भ महत्त्व

७.३ उद्धरणाची योग्य पद्धत

७.४ लिखित मजकूरात उद्धरण पद्धती

७.५ उद्धरणासाठी टीपा देण्याच्या पद्धती

७.६ तळटीप

७.७ सारांश

७.८ प्रश्न

७.९ संदर्भ ग्रंथ


## ७.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास झाल्यानंतर विद्यार्थी-

१. संदर्भातील तर्कसंगती आणि विविध पद्धती समजून घेण्यास सक्षम असेल.

२. संदर्भ आणि त्यातील विविध प्रकारांचे महत्त्व समजावून घेतील.

३. ग्रंथसंग्रहात घ्यावयाचे महत्त्व आणि काळजी व यांचे योगदान समजून घेण्यास सक्षम होतील.

४. इतिहासातील तांत्रिक सहाय्य समजून घेतील.

५. शोध प्रबंध लेखनामध्ये उद्धरण पद्धतीचा तसेच तांत्रिक सहाय्याचा वापर कशा पद्धतीने करावा याचे योग्य आकलन होण्यास मदत होईल.

## ७.१ प्रस्तावना

ऐतिहासिक संदर्भ नमुद करण्यासाठी इंग्रजी भाषेत Citation हा शब्द वापरला जातो. त्यास मराठी पारभाषिक शब्दकोशात 'उद्धरण', 'उल्लेख निर्देश', 'अवतरण', 'वाक्संहिता', 'प्रावाहन' हे शब्द सूचवले गेले आहेत. विद्वत्तापूर्ण लेखनामध्ये चर्चा केलेल्या विषयाबद्दलच्या परिच्छेद अथवा ओळी पुढे इतर पुर्वासुरींच्या मांडणीचा वाङ्मयसूचीनुसार सुसंबद्ध निर्देश उद्धृत केला जातो, यास उद्धरणे म्हणतात. उद्धरणांमध्ये प्रकाशित अथवा अप्रकाशित स्रोताचा संदर्भ नमुद केला जाऊ शकतो. उद्धरणे ही मूळ स्रोतातूनच नमुद केली जातात असे नाही. सर्वसाधारणपणे संदर्भार्थ उद्धरण नमुद करावयाच्या परिच्छेद अथवा ओळी नंतर लगेचच

संक्षिप्त वर्ण-संख्यानुसार अनुक्रमांक आंतर्भूत केला जातो, आणि लेखपान, लेख अथवा ग्रंथाच्या शेवटी या अनुक्रमांकापुढे संबंधीत संदर्भ कोणत्या लेख, ग्रंथ, व्याख्यान, बातमी, दस्तएवजातून घेतला गेला हे नमुद केले जाते. एखादी माहितीस्त्रोताचे उद्धरण म्हणजे एखाद्या व्यक्तीला त्याच्या सर्जनशील आणि बौद्धिक कार्यांसाठी श्रेय देण्याचा एक मार्ग आहे. असा संदर्भ आपल्या संशोधनास मजबुती देण्यासाठी वापरला जातो. उद्धरणात लेखकाचे नाव, तारीख आणि प्रकाशन कंपनीचे स्थान, संशोधन पत्रिकेचे शीर्षक समाविष्ट असू शकते. विशिष्ट उद्धरण शैलीनुसार आवश्यक माहिती आणि विरामचिन्हे नमूद केली जातात. शैक्षणिक संस्था आणि वैज्ञानिक प्रकाशने यांच्यासाठी लेखनाच्या काळात वापरल्या जाणाऱ्या सर्व स्त्रोतांसाठी संदर्भांची आवश्यकता असते. विद्यार्थी आणि संशोधक बऱ्याचदा यास एक जटिल प्रक्रिया म्हणून पाहतात ज्यासाठी खूप वेळ आणि प्रयत्न आवश्यक असतात. अशा संशोधन लेखांना उद्धरित किंवा संदर्भित केल्या जाणाऱ्या माहिती सामग्रीमध्ये पुस्तके, संशोधन पत्रिका,मासिके, वर्तमानपत्रे, अहवाल, विद्यार्थ्यांचे प्रकल्प (प्रबंध आणि प्रबंध) यासारख्या सर्व मुद्रित आणि न छापलेल्या साहित्यांचा समावेश आहे. उदारणार्थ: शब्दकोष, विश्वकोश, अक्षरे, व्याख्यान, पोस्टर्स, पुस्तिका, माहितीपत्रक, आणि निर्देशिका. इतर इलेक्ट्रॉनिक संसाधनांमध्ये वेब पृष्ठे, सोशल नेटवर्क मजकूर, संग्रहित ई-मेल आणि संदेश, ऑनलाइन ध्वनिफीत आणि व्हिडिओ हे देखील समाविष्ट असतात.

## ७.२ उद्धरण व संदर्भ महत्त्व

विद्यार्थी किंवा संशोधकाने आपल्या संशोधन लिखाणातील स्त्रोतांचा उल्लेख करणे आणि उद्धृत करणे पुढील बाबींसाठी आवश्यक आहे.

१. संशोधन हे तथ्यांवर आधारित आहे याचा तो एक पुरावा आहे. स्त्रोतांचे उद्धरण वाचकांना त्याच विषयावर विस्तृत माहिती मिळवण्यास करण्यास मदत करतात. एखाद्या विषयाबद्दल अधिकृत, संबंधित स्त्रोत शोधण्यासाठी सर्वात प्रभावी धोरणांपैकी एक म्हणजे ज्ञात स्त्रोतांकडील तळटीप किंवा संदर्भांचे पुनरावलोकन करणे.

२. हे संशोधनाचा सैद्धांतिक पाया दर्शविते. जेव्हा आपण आपल्या संशोधनाची माहिती एखाद्या माहितीच्या आणि समीक्षात्मक दृष्टिकोनातून नोंदवित आहात तेव्हा वापरलेल्या स्त्रोतांची सूची लेखक म्हणून आपली विश्वासार्हता वाढवते. आपण एखाद्या संशोधकाच्या कल्पनांशी सहमत नसल्यास किंवा संशोधनाची समस्या समजून घ्यायची असल्यास उद्धरण व संदर्भ स्त्रोत म्हणून काम करू शकतात.

३. हे संशोधन निष्कर्ष आणि निष्कर्षांच्या विश्वासार्हतेचे समर्थन करते. स्त्रोतांचे योग्य केल्यास लेखकाने घेतलेल्या संदर्भाचे ज्ञान वाचकाला व इतर संशोधकांना होते. ज्या संशोधकाचे आपण संदर्भ देतो त्यांना देखील संशोधनाचे श्रेय मिळते.

४. आपण इतर संशोधकांचा दाखला दिल्यास अथवा त्याचे उद्धरण केल्यास त्यांच्या बौद्धिक प्रतिभेला न्याय मिळतो. आपण असे न केल्यास ते संशोधन चौर्य गणले जाते व अशा संशोधकावर यामुळे कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**आपली प्रगती तपासा :**

१. ऐतिहासिक संशोधनात उद्धरण व संदर्भ याचे महत्त्व सांगा.

.......................................................................................................
.......................................................................................................
.......................................................................................................
.......................................................................................................

## ७.३ उद्धरणाची योग्य पद्धत

शैक्षणिक विद्याशाखांना निश्चित केल्याप्रमाणे वेगवेगळ्या संदर्भ पद्धतीची आवश्यकता असते. वैज्ञानिक संशोधन प्रकाशने आणि इतर व्यावसायिक प्रकाशनांमध्येही हेच अपेक्षित आहे. विद्यार्थी किंवा संशोधकाने प्रथम आपल्याला कोणती उद्धरण पद्धत वापरली पाहिजे याचा आढावा घेतला पाहिजे. प्रत्येक संशोधन केंद्राची किंवा संधोधन पत्रिकेची उद्धरणाची पद्धत वेगवेगळी असू शकते.

| | |
|---|---|
| हार्वर्ड पद्धती | सर्व भाषा अभ्यास, इतिहास, कला आणि साहित्य अभ्यास, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, गुन्हेगारीशास्त्र इ. |
| ए.पी.ए. पद्धती<br><br>(अमेरिकन सायकोलॉजिकल असोसिएशन) | एजुकेशन, लायब्ररी अँड इन्फॉरमेशन सायन्स, मॅनेजमेन्ट सायन्सेस, नर्सिंग, इतर वर्तनविषयक आणि सोशल सायन्स विषयांसारखी सामाजिक आणि वर्तणूक विज्ञान. |
| एम.एल.ए. पद्धती<br><br>(मॉडर्न लँग्वेज असोसिएशन) | भाषाशास्त्र आणि साहित्यिक विषय. |

**ए.पी.ए. (अमेरिकन सायकोलॉजिकल असोसिएशन) पद्धतीची उदाहरणे**

संशोधन पत्रिकेतील लेख- 'अर्नेस्ट रेनन' (१९९४), व्हाट इस अ नेशन? ऑक्सफोर्ड रीडर्स नॅशनॅलिझम यातून, संपादन- जॉन हचिन्सन आणि अँथनी डी स्मिथ, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क.

पुस्तक- गेल ओम्वेट (१९७६), कल्चरल रीव्होलट इन कोलोनियल इंडिया: नॉन ब्राह्मण मुवमेंट इन वेस्टर्न इंडिया १८७३ ते १९३०, सायंटिफिक सोशालीस्त एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई

एम.एल.ए. ((आधुनिक भाषा असोसिएशन) शैली नुसार पद्धती

पुस्तक- गेल ओम्वेट, कल्चरल रीव्होलट इन कोलोनियल इंडिया: नॉन ब्राह्मण मुवमेंट इन वेस्टर्न इंडिया १८७३ ते १९३०, सायंटिफिक सोशालीस्त एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई, १९७६

संशोधन पत्रिकेतील लेख- 'अर्नेस्ट रेनन', व्हाट इस अ नेशन ? ऑक्सफोर्ड रीडर्स नॅशनॅलिझम यातून, संपादन- जॉन हचिन्सन आणि अँथनी डी स्मिथ, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यूयॉर्क, १९९४

## ७.४ लिखित मजकूरात उद्धरण पद्धती

विद्यार्थी किंवा संशोधक वैज्ञानिक लेखनादरम्यान स्त्रोत किंवा संदर्भ चार प्रकारे उद्धृत करू शकतात.

अ) विशिष्ट विषयावर अधिक माहिती देऊ शकणाऱ्या इतर स्त्रोतांपर्यंत वाचकाला परिचित करणे

ब) मजकूरामध्ये माहिती स्पष्ट करणे. उदाहरणार्थ लोकांविषयी किंवा स्थानाविषयी अधिक माहिती देऊन, महत्वाच्या शब्दांचे स्पष्टीकरण देणे इ.

क) अतिरिक्त माहिती उपलब्ध करणे, जी महत्वाची असूनही प्रवाहात व्यत्यय आणता मजकूरात समाविष्ट केली जाऊ शकत नाही.

ड) दृष्टिकोण विस्तृत करणे.

## ७.५ उद्धरणासाठी टीपा देण्याच्या पद्धती

एन्डनोट्स (लेखांच्या शेवटी) आणि फूटनोट्स (तळटीप-त्याच पानावर खाली) एन्डनोट्स (लेखांच्या शेवटी) संशोधन प्रकल्पाच्या शेवटी वेगळ्या पानावर दिसतील. ते मजकूरामध्ये अंकाद्वारे दर्शवितात. एन्डनोट्स फूटनोट्सपेक्षा अधिक अवघड वाटू शकते कारण माहिती मिळविण्यासाठी वाचकांना मागील पृष्ठावर जावे लागते.

एन्डनोट्स (लेखांच्या शेवटी) वापरण्याचे फायदे

१) एन्डनोट्स वाचकाला कमी विचलित करतात आणि त्यांचा वाचन प्रवाहात कोणताही अडथळा येत नाही.

२) त्या वाचकाला गोंधळात टाकत नाहीत.

३) शोधनिबंधाचा स्वतंत्र विभाग म्हणून, एन्डनोट्स वाचकांना एकाच वेळी वाचण्यास आणि त्यांचा विचार करण्यास अनुमती देतात.

## ७.६ तळटीप

तळटीप पृष्ठाच्या तळाशी दिसतात आणि मजकूराच्या शेवटच्या ओळीपासून अतिरिक्त जागा किंवा रेखा किंवा वेगळ्या अंकप्रकाराद्वारे विभक्त केल्या जातात. ते मजकूरात अंकाद्वारे देखील सूचित केले जातात, ते शक्यतो वाक्याच्या शेवटी ठेवले जातात आणि सामान्यतः प्रत्येक संदर्भाच्या विरामचिन्हे नंतर सामान्यतः सर्व प्रकारच्या माहिती स्त्रोतांच्या संदर्भात काही आवश्यक घटक असतात.

### ७.६.१ तळटीपा देण्याचे उद्देश

संशोधन कार्यात तळटीपा देण्याचे चार उद्देश असतात असे डॉ. शांता कोठेकर यांनी त्यांच्या इतिहास संशोधन: स्वरूप व तंत्र या ग्रंथात खालील प्रमाणे सांगितले आहे.

१) संशोधनाकरिता ज्या स्त्रोत साधनांमधून माहिती मिळाली असेल, त्यांचा ऋणनिर्देश करणे.

२) संशोधनात केलेल्या विधानांची पुष्टी करणे.

३) संशोधनात उपस्थित होणारे मुदे व त्यात उल्लेख केलेल्या व्यक्ती किवा प्रसंगा अधिक माहिती देणे.

संशोधनात पूर्वी येऊन गेलेल्या संदर्भाचा पुन्हा निर्देश करणे आवशक असल्यास पूर्वीच्या संदर्भाचा उल्लेख करणे.

संशोधकांनी संशोधनात नवीन माहिती दिली आहे व ती विश्वसनीय आहे हे पटवून देण्यासाठी ती माहिती कोणत्या साधनांमधून घेतली त्याचा उल्लेख करणे आवशक असते. तळटीपा दिल्यामुळे संशोधन कार्याला भक्कम आधार मिळत असतो, संशोधन कार्याची विश्वसनियता वाढत असते. तळटीपांमुळे संशोधकाला आपल्या मातांना पुष्टी देता येते. संशोधन करता असतांना अनेक वेळा संशोधन विषयाच्या अनुषंगानी घटना किवा व्यक्तींची बरीच माहिती मिळत असते, ती सर्वच माहिती संशोधनाकरिता आवश्यक असते असे नाही, मात्र सदर माहिती दिल्यास त्या विषयावर नवीन प्रकाश पडत असतो. मात्र अशी माहिती अतिशय लांबलचक नसावी. माहिती प्राथमिक स्वरुपाची असल्यास ती परिशिष्ठाच्या स्वरुपात द्यावी.

संशोधकांनी तळटीपांच्या माध्यमातून संदर्भ साधनांचा पुरावा दिल्यामुळे तो पुरावा इतर संशोधकांना तपासून पाहता येतो. संशोधकांनी एखादा विचार जरी एखाद्या ग्रंथातून घेतला असेल तरीही त्याचा उल्लेख तळटीपांमध्ये करणे आवश्यक आहे. तळटीपा देण्यामागचा दुसरा उद्देश असा की, वाचकाला सबंधित विषयावर अनेक संदर्भ देऊन त्यांच्या ज्ञानात भर घालणे असतो. तळटीपा दिल्यामुळे अनेक विचार प्रवाह वाचकाला समजू शकतात. त्यामुळे त्याची विचारसरणी तयार होत असते. संशोधाकालाही तळटीपांमुळे एखाद्या विषयावर किती संशोधन झाले आहे याची जाणीव होते.

### ७.६.२ तळटीपांचा वापर

सिद्धांत खोटे आहेत. ते इतर दृष्टीकोनांवर दडपशाही करतात. त्यांनादुर्लक्षित करतात किंवा शांत करतात.

उत्तर संरचनावाद फ्रान्समध्ये सुरू झालेली विसाव्या शतकातील ही तात्त्विक चळवळ आणि समीक्षात्मक साहित्य आहेस्विस विद्वान फर्डिनांड द सॉस्यूर ., फ्रेंच मानववंशशास्त्रज्ञ क्लॉड लेवीआणि तत्त्वज्ञ जॅक डे (संरचनावादाशी संबंधित) स्ट्रॉस-रिडा यांच्या भाषिक तत्त्वांच्या पुनर्रचनेच्या संकल्पनांवर ती आधारित आहे.

या सिद्धांतानुसार भाषा ही काही बाह्य वास्तवाशी संवादाचे साधन म्हणून काम करत नाही, जसे सामान्यतः प्रमेय असते. त्याऐवजी, "बाह्य जगाशी" असलेल्या संबंधांवर अवलंबून, विशिष्ट शब्द आणि इतर यांच्यातील संबंधातून भाषा संप्रेषणात्मक जग तयार करते.पोस्टस्ट्रक्चरलिस्ट समीक्षकाकडे एखाद्या मजकुराचे निरनिराळ्या दृष्टिकोनातून विश्लेषण करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. त्यामुळेत्याबद्दल वेगवेगळे अर्थ लावता येतील.

## ११.४ मिशेल फुको : उत्तर आधुनिकतावादी आणि उत्तर-संरचनावादी

इतिहासाकडे पाहण्याच्या या उत्तरआधुनिक दृष्टिकोनाचा प्रवर्तक फूको आहे.प्रोफेसर जॉन कॉफी यांनी चरित्रग्रंथातफुकोच्या पार्श्वभूमीचा त्याच्या इतिहासावरील विचारांवर कसा परिणाम झाला याबद्दल सखोल विवेचन केले आहे. सत्य आणि ज्ञान हे सत्तेच्या दाव्यांशिवाय दुसरे काहीही नाही हा फूकोच्या प्रमुख प्रबंधांपैकी एक सिद्धांत होता. सत्य वास्तवाशी सुसंगत असण्याची गरज नाहीकारण आपण आपले स्वतःचे वास्तव अथवा सत्य अशा रीतीने निर्माण करतो कीआपण इतरांवर सत्ता गाजवू इच्छितो. मानवतेच्या इतिहासालाच काही उद्देश नसलातरी ऐतिहासिक वृत्तान्तांच्या लेखनाला विशिष्ट उद्देश असतो.

## ११.५ इतिहासाकडे पाहण्याचाउत्तर आधुनिक दृष्टीकोन

अनेक वेळा महाविद्यालयीन आणि पदवीधर विद्यार्थ्यांना एक महत्वाचा प्रश्न असतो कीपाठ्यपुस्तकातून भूतकाळात काय घडले होते हे आपल्याला कसे कळेल? प्राथमिक स्त्रोत अभ्यासाच्या कालावधीत तयार केले जातात आणि विचाराधीन कालावधीची प्रत्यक्ष आणि प्रामाणिक झलक देतात. पण जेव्हा दोन किंवा अधिक इतिहासकार एकाच प्राथमिक स्त्रोताचे परीक्षण करतात आणि नाटकीयपणे भिन्न अर्थ लावतात तेव्हा काय होते? कोणते खरे आहे? ते दोन्ही खरे असू शकतात का? या प्रश्नांचे आकलन आपल्याला उत्तर आधुनिकतेकडे घेऊन जाते. इतिहासाच्या अनुशासनाच्या उत्तर-आधुनिक पद्धतींचा शोध घेणे फायदेशीर ठरेल. हा एक बौद्धिकदृष्ट्या गुंतवून ठेवणारा विषय आहे ज्याचा आपण सखोल विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम आपल्याला इतिहासाच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा आणि त्याच्या ऐतिहासिक मार्गाचा एक शिस्त म्हणून आढावा घेणे आवश्यक आहे. मग आपण उत्तर आधुनिक इतिहासलेखनाचे वैचारिक आधार, पद्धती, मुख्य संकल्पना आणि वैचारिक स्थान समजून घेऊ शकतो. विविध ऐतिहासिक अभिमुखतेचे इतिहासकार ज्या मुख्य वादविवाद,टीका आणि युक्तिवादांमध्ये गुंतलेले आहेत ते आपण अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो

डॉ. यिलमाझ दाखवतात की इतिहासाचे तत्वज्ञान त्याच्या मूळ (म्हणजे प्रस्तावित) आणि वाक्यरचनात्मक (म्हणजे प्रक्रियात्मक) वैशिष्ट्यांच्या संदर्भातअंदाज आणि विश्लेषणात्मक अशा दोन मूलभूत शाखांमध्ये विभागलेले आहे. इतिहासाचे विश्लेषणात्मक तत्त्वज्ञान इतिहासाच्या स्वरूपावर आणि पद्धतींवर शिस्त म्हणून लक्ष केंद्रित करते. डॉ. काया इल्माझ दाखवून देतात की उत्तर आधुनिकतेमध्येकेवळ इतिहासच नव्हे तर सर्व मानवता आणि सामाजिक विज्ञानांच्या सत्य दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. उत्तर आधुनिकतेचे मूळ गृहितक असे आहे की समाज आणि संस्कृती बदलत आहेत ज्यामध्ये वस्तुनिष्ठता, सत्य, औद्योगिक वाढ, वाढत्या आर्थिक अपेक्षा आणि पारंपारिक मध्यमवर्गीय मानदंड यासंबंधीच्या जुन्या आवश्यकवादी गृहितकांना धक्का बसला आहे. इतिहासाच्या उत्तर-आधुनिक दृष्टिकोनाचे आणखी एक प्रमुख सूत्र म्हणजे उच्चभ्रू संस्कृती आणि शैक्षणिक संस्कृती यांच्यातील सीमा आणि श्रेणीबद्ध भेदांचे डिकन्स्ट्रक्शन (विघटन), डिमिस्टिफिकेशन (रहस्यांची उकलन) आणि डीरेफरेन्शिअलायझेशन (भेदभाव अथवा वेगळेपण)या नवीन संकल्पनांच्या द्वारे निर्मूलन करणे. उत्तर आधुनिकतावादाचा अर्थ असा आहे की अलिकडच्या दशकात पाश्चात्य समाज आधुनिकतेपासून उत्तर आधुनिक युगात मोठ्या प्रमाणात बदलला आहे. त्यामुळे प्रस्थापित भाषाप्रणाली किंवा विचारप्रणाली बदलून नवीन परीभाषेद्वारे हे स्पष्ट केले जावू शकते.

भाषेची संकल्पना आणि वास्तववादाचा नकार ही त्याची दोन प्रमुख वैशिष्ट्ये म्हणता येतील. भाषिक आदर्शवाद किंवा भाषावादाचे तत्वज्ञान यांचा असा दावा आहे की भाषा मानवी मनासाठी वास्तविकता बनवते आणि परिभाषित करते. त्यात असे म्हटले आहे की भाषेत किंवा प्रवचनात आपण जे प्रतिनिधित्व करतो त्यापेक्षा स्वतंत्र कोणतेही बाह्य भाषिक वास्तव नाही. ती भाषेला स्वतःला चिन्हांची एक प्रणाली मानते जी कधीही स्थिर अर्थापर्यंत पोहोचत नाही अशा अर्थाच्या अंतहीन प्रक्रियेमध्ये आंतरिकरित्या एकमेकांचा संदर्भ देते. उत्तर अधुनिकातावाद अशा प्रकारे वस्तुस्थिती आणि गोष्टींच्या स्वतंत्र जगाचा संदर्भ देण्यासाठी भाषेची किंवा प्रवचनाची क्षमता आणि मजकूराच्या अर्थाची दृढनिश्चय किंवा निर्णयक्षमता दोन्ही नाकारतो. इतिहासाच्या उत्तर-आधुनिकतावादी सिद्धांताचे प्रमुख वकील आणि अभ्यासक म्हणूनजेनकिन्स असे ठामपणे सांगतात की पारंपारिक शैक्षणिक इतिहास किंवा हा फक्त बुर्जुआ विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात. उत्तर-आधुनिकतावादी विचारसरणीचे समर्थक असे ठामपणे सांगतात की इतिहासलेखनाने राष्ट्र, वर्ग आणि धर्माभोवती उभारलेले महान मार्ग हे भव्य कथानक आहेत.

ऐतिहासिक संशोधन पद्धतींऐवजी उत्तर-आधुनिकतावाद्यांनी सत्य आणि वस्तुनिष्ठता यांसारख्या संकल्पनांवर त्यांचे युक्तिवाद तयार करून इतिहासकारांच्या गृहितकांवर आणि शिस्तीच्या ज्ञानशास्त्रीय पायावर प्रश्नचिन्ह उभे केले. दुसरीकडेआधुनिकइतिहासकारांनी उत्तरआधुनिक वादाचा जोराचा प्रतिकार करण्यासाठी त्यांच्या पद्धती स्पष्ट केल्या. त्यामुळे दोन्ही पक्षांनी एकमेकांना न्याय दिला नाही. पाश्चात्य इतिहासलेखनाच्या उत्तर-आधुनिक वळणाच्या त्याच्या समालोचनात,विंडशटल यांनी परंपरागत इतिहासलेखनाच्या अभ्यासावर उत्तर-आधुनिक समीक्षकांच्या हल्ल्याची रूपरेषा दिली आहे. अनुशासनाच्या उत्तर-आधुनिक समालोचनानुसार, (१) पारंपारिक इतिहासलेखन ही एक हुकूमशाही प्रथा आहे जी समकालीन पाश्चात्य समाजातील वंशकेंद्री आणि सांस्कृतिक अभिमान दर्शवते (म्हणजे गोरे, मध्यमवर्गीय,युरोपियन पुरुषांची मते आणि आवडी); (२) डावे, उजवे किंवा राजकीय दृष्ट्या

यांमधील लेखक,त्रयस्थ व्यक्तीचा आवाज आणि सर्वज्ञ दृष्टिकोन गृहीत धरून वास्तवाच्या नावाखाली त्यांच्या वाचकांवर त्यांची सत्ता प्रस्थापित करतात; (३) इतिहासकार (अ) केवळ त्यांच्या काळातील विचारधारा व्यक्त करू शकतात (ब) त्यांच्या स्वत:च्या वर्ग, लिंग, नैतिकता किंवा सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या पलीकडे पाहण्याइतपत वस्तुनिष्ठ असू शकत नाहीत.

या समस्या दूर करण्यासाठी, उत्तर-आधुनिकतावादी ज्यांना सध्या त्यांचा स्वतःचा इतिहास लिहिण्याच्या संधीपासून वंचित आहे त्यांच्यासाठी आणि "विविध दृष्टिकोनातून आणि संश्लेषणाच्या प्रकारांमधून अनेक तितक्याच न्याय्य कथा सांगण्यासाठी इतिहासकारांना मोकळे करण्यासाठी" डिमिस्टिफिकेशनचा (रहस्यांची उकलन)दृष्टिकोन अवलंबतो. ज्याप्रमाणे उत्तरआधुनिकतावाद्यांनी परंपरावाद्यांच्या गृहितकांवर आणि ऐतिहासिक लेखनावर टीका केली आहे, त्याचप्रमाणे पारंपारिक इतिहासाचे अभ्यासकांनी इतिहासाच्या उत्तर-आधुनिक दृष्टिकोनावर टीका केली आहे.

विंडशटल काही अभ्यासक्रम विकसकांवर उत्तर आधुनिक विचारप्रणालीचे परिणाम दाखवून देतात. अमेरिकन हायस्कूलसाठी नवीन राष्ट्रीय इतिहास मानके तयार करणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांनी इतिहास लिहिणेइतिहासवादाच्या तत्त्वांशी सुसंगत असले पाहिजे आणि अनास्था आणि विचारधारेपेक्षा वरचे म्हणून ओळखले जावे या मताला कमी लेखले. त्यांच्या मतेभूतकाळाचे वर्णन, स्पष्टीकरण आणि व्याख्या करण्याचा असा दृष्टिकोन बौद्धिकदृष्ट्या अप्रचलित आणि राजकीयदृष्ट्या दूषित आहे. त्यांनी या युक्तिवादाचे समर्थन केले की इतिहासकारांना त्यांचे शैक्षणिक प्रशिक्षण,वृत्ती,वैचारिक स्वभाव आणि संस्कृतींपासून स्वतःला आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण कार्यापासून दूर ठेवणे अशक्य आहे. गैर-राजकीय असणे अप्राप्य आहे या दाव्यावर विश्वास ठेवून,त्यांनी अमेरिकन इतिहासाच्या पारंपारिक खात्याच्या जागी भेदभाव, शोषण, शत्रुत्व आणि स्त्रिया, कृष्णवर्णीय आणि जातीय भेदभाव या संकल्पना समोर आणण्याचा प्रयत्न केला. परंतुरिपब्लिकन वर्चस्व असलेल्या यूएस सिनेटने पुढे जाऊन हा प्रयत्न नोव्हेंबर १९९४ मध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये लागू होण्यापासून रोखला. झगोरिनच्या मतेबहुतेक उत्तर आधुनिकतावादी राजकीय सातत्याच्या डाव्या बाजूला उभे आहेत आणि त्यामुळे ते चळवळीचे समर्थक बनले आहेत. महिला आणि लिंग अभ्यास,आफ्रो-अमेरिकन अभ्यास,वांशिक अभ्यास आणि समलिंगी अभ्यासांसाठी विद्यापीठे. ते बहुसांस्कृतिकतेचे रक्षणकर्ते आणि सांस्कृतिक आणि उत्तर-औपनिवेशिक अभ्यासाचे प्रवर्तक आहेत.

आपल्याला खालील प्रश्नांची उत्तरे शोधून उत्तर आधुनिकतावादी आव्हानाशी इतिहासाचा सामना तपासण्याची गरज आहे. उत्तर-आधुनिकतावादाचा इतिहासाच्या शिस्तीवर किती प्रमाणात परिणाम झाला आहे? इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी कल्पना स्वीकारल्या आणि इतिहासाच्या उत्तर आधुनिक सिद्धांताचा अभ्यास केला? उत्तरआधुनिक विचार आणि टीका यांचा इतिहासलेखनाचा कधी फायदा झाला आहे का? उत्तर-आधुनिकतेच्या संदर्भात इतिहासकारांमध्ये विविध प्रकारचे मत आहेत. डॉ यिलमाझ यांनी उल्लेख केला आहे की आर. इव्हान्स सारख्या इतिहासकारांच्या अल्पसंख्याकांनी हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी किमान काही उत्तर आधुनिकतावादी युक्तिवाद स्वीकारले आहेत. बहुसंख्य इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी सिद्धांतांना विरोध केला आहे आणि उत्तरआधुनिकतावादाला चुकीची समजूतदार टीका म्हणून पाहिले आहे. जरी उत्तरआधुनिकतावादी आव्हानाचा ऐतिहासिक

विचार आणि लेखनावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडलातरीही जुन्या संकल्पना आणि पद्धतीं ते नष्ट करू शकले नाही.

डॉ यिलमाझ यांनी उल्लेख केला आहे की आर. इव्हान्स सारख्या इतिहासकारांच्या अल्पसंख्याकांनी हल्ल्यांचा प्रतिकार करण्यासाठी किमान काही उत्तर आधुनिकतावादी युक्तिवाद स्वीकारले आहेत. बहुसंख्य इतिहासकारांनी उत्तरआधुनिकतावादी सिद्धांतांना विरोध केला आहे आणि उत्तरआधुनिकतावादाला चुकीची समजूतदार टीका म्हणून पाहिले आहे.

## ११.६ सारांश

पोस्टमॉडर्निझम (उत्तर आधुनिकतावाद) ही एक व्यापक चळवळ आहे. २०व्या शतकाच्या मध्यापासून ते उत्तरार्धात इतिहास, तत्त्वज्ञान, कला आणि वास्तुकला यांमध्ये विकसित झाली आणि आधुनिकतावादापासून दूर जाण्याचे चिन्हांकित केले. आधुनिकता आणि या काळातील प्रवृत्तींचे अनुसरण करणाऱ्या ऐतिहासिक युगाचे वर्णन करण्यासाठी हा शब्द सामान्यतः लागू केला जातो. पोस्टमॉडर्न विचारवंत वारंवार ज्ञानाचे दावे आणि मूल्य प्रणालींचे सामाजिक-कंडिशन म्हणून वर्णन करतात. ते त्यांना राजकीय, ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक प्रवचन आणि पदानुक्रमांचे उत्पादन मानतात. हे विचारवंत सहसा वैयक्तिक आणि आध्यात्मिक गरजा सामाजिक परिस्थिती सुधारून आणि अधिक प्रवाही प्रवचनांचा अवलंब करून उत्तम प्रकारे पूर्ण केल्या जातात असे मानतात

## ११.७ प्रश्न

१) इतिहासातील उत्तरआधुनिकतेची तत्त्वे कोणती आहेत?

२) इतिहासातील मिशेल फुको यांचे आधुनिकतावादी आणि उत्तर उत्तर-संरचनात्मक दृष्टिकोन यावर टीप लिहा.

## ११.८ संदर्भ ग्रंथ

१) मिशेल फुको, निशे, जीनिओलोजी, हिष्ट्री, एसेज अंड इंटरविव, एड. डी. एफ. बौचार्द, कोर्नेल प्रेस, १९७७

२) काया यिलमाझ, पोस्टमोदार्निष्टअप्प्रोच टू द डिसिप्लीन ऑफ हिष्ट्री, कोकाली युनिव्हर्सिटी सोसियाल बिलिमलर एन्स्टिट्यूस डर्गीसी (१४) २००७.

३) जेनकिन्स, के. (१९९१), री-थिंकिंग हिस्ट्री, रूटलेज: लंडन.

४) विंडशटल, के. (२००२), अक्रिटिकऑफपोस्टमॉडर्न टर्न,इन प्र. एडवर्ड वांग, आणि जी. इगर्स (एडी.), रोश्तर प्रेस, नेवयोर्क

५) बौद्रीलोर्ड जे. द. मिरार ऑफ प्रोडक्शन, तेलोस प्रेस, १९७५.

❄❄❄❄❄❄❄

# १२

# सांस्कृतिक मानववंशशास्त्र आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन

**घटक रचना**

१२.० उद्दिष्टे

१२.१ प्रस्तावना

१२.२ सांस्कृतिक मानववंशशास्त्राची कार्यपद्धती

१२.३ सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन

१२.४ सारांश

१२.५ प्रश्न

१२.६ संदर्भ ग्रंथ

## १२.० उद्दिष्टे

या युनिटचा अभ्यास केल्यांनतर विद्यार्थी पुढीलबाबी समजून घेण्यास सक्षम होऊ शकेल.

१) सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा अर्थ व व्याप्ती

२) सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन

३) सांस्कृतिक मानववंशशास्त्राच्या कार्यपद्धतीची गणना

## १२.१ प्रस्तावना

माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे आणि तो समूहामध्ये राहतो. जगातील सर्व सजीवांमध्ये केवळ तोच संस्कृतीचा निर्माता आहे. प्रत्येक पिढीची संस्कृती विकसित होत असते. संस्कृती हा त्याच्या संकुलाचा अविभाज्य भाग आहे जो त्याने स्वत: निर्माण केलाआहे. मानव आपल्या नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीला कशा प्रकारे तोंड देतो, कर्मकांड शिकतो आणि त्यांना एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवतो. याचा अभ्यास सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञ करतात.वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये एकाच उद्देशाची अनेक साधने असतात. असे असले तरी प्रत्येक समाजात जीवनकार्य सुनियोजित असते. अंतर्गत विकासामुळे किंवा बाह्य संपर्कामुळे परंपरेची स्थिर रूपेही बदलतात. व्यक्ती एका विशिष्ट समाजात जन्म घेते आणि त्याचा सांस्कृतिक वारसा असलेल्या कर्मकांडांना स्वीकारते आणि त्यानुसार वागते.अशा रीतीने त्याच्या जीवनकार्याशी संबधित विषय सांस्कृतिक मानववंशशास्त्रात येतात.

**सांस्कृतिक मानववंशशास्त्राची (मानवशास्त्र) व्याख्या व उगम**

सांस्कृतिक मानववंशशास्त्र किंवा मानवशास्त्राची एक अशी शाखा आहे जी मानवामधील सांस्कृतिक भिन्नतेच्या अभ्यासावर केंद्रित आहे. हे सामाजिक मानववंशशास्त्राच्या विरुद्ध आहे, जे सांस्कृतिक भिन्नतेला मानववंशशास्त्रीय स्थिरांकाचा एक उपसंच म्हणून मानतात. सामाजिक-सांस्कृतिक मानववंशशास्त्र या संज्ञेमध्ये सांस्कृतिक आणि सामाजिक मानववंशशास्त्र परंपरा दोन्हींचा समावेश आहे. मानववंशशास्त्रज्ञांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की संस्कृतीच्या माध्यमातून लोक त्यांच्या पर्यावरणाशी गैर-अनुवांशिक मार्गांनी जुळवून घेऊ शकतात, म्हणून वेगवेगळ्या वातावरणात राहणाऱ्या लोकांच्या ब-याचदा भिन्न संस्कृती असतात. स्थानिक (विशिष्ट संस्कृती) आणि जागतिक संस्कृती (एक सार्वत्रिक मानवी स्वभाव, किंवा वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या लोकांमधील संबंधांच्या जाळ्या) यांच्यातील तणावातून मानववंशशास्त्रीय सिद्धांताचा उगम झाला आहे. सांस्कृतिक मानवशास्त्रात एक समृद्ध पद्धत आहे, ज्यात सहभागींच्या निरीक्षणाचा समावेश आहे (ज्याला सहसा फील्डवर्क म्हटले जाते कारण यासाठी मानववंशशास्त्रज्ञांना संशोधनाच्या ठिकाणी विस्तारित कालावधी खर्च करणे आवश्यक असते), मुलाखती, आणि सर्वेक्षण.

सांस्कृतिक मानवशास्त्र ही मानवशास्त्राची एक शाखा आहे जी मानवामधील सांस्कृतिक भिन्नतेच्या अभ्यासावर केंद्रित आहे. हे सामाजिक मानववंशशास्त्रापेक्षा विभिन्न आहे. सामाजिक-सांस्कृतिक मानववंशशास्त्र या संज्ञेमध्ये सांस्कृतिक आणि सामाजिक मानववंशशास्त्र या दोन्ही परंपरांचा समावेश होतो.मानववंशशास्त्रज्ञांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की संस्कृतीच्या माध्यमातून लोक त्यांच्या पर्यावरणाशी अनुकूलन करून मार्गांनी जुळवून घेऊ शकतात म्हणून वेगवेगळ्या वातावरणात राहणाऱ्या लोकांच्या भिन्न संस्कृती असतात.स्थानिक (विशिष्ट संस्कृती) आणि जागतिक (एक सार्वत्रिक मानवी स्वभाव, किंवा वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या लोकांमधील संबंधांच्या जाळ्या) यांच्यातील तणावाचे कौतुक आणि स्वारस्य यांमध्ये मानववंशशास्त्रीय सिद्धांताचा उगम झाला आहे. सांस्कृतिक मानवशास्त्रात एक समृद्ध पद्धत आहे ज्यात सहभागींच्या निरीक्षणाचा समावेश आहे (ज्याला सहसा फील्डवर्क म्हटले जाते कारण यासाठी मानववंशशास्त्रज्ञांना संशोधनाच्या ठिकाणी विस्तारित कालावधी व्यतीत करणे आवश्यक असते)

मानववंशशास्त्रज्ञांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की प्रत्येक समाज घटकांची संस्कृती वेगवेगळी असली तरी लोक वातावरणातील बदलांनुसार जुळवून घेऊ शकतात. परिणामी, वेगवेगळ्या वातावरणात राहणाऱ्या लोकांच्या वेगवेगळ्या संस्कृती असतील. एडवर्ड टेलर या इंग्रज मानववंशशास्त्रज्ञाला सांस्कृतिक मानववंशशास्त्राचे जनक मानले जाते. त्यांचे सर्वांत लोकप्रिय लेखन 'प्रिमीटीव कल्चर' (आदिम संस्कृती) (१८७१) चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताचा प्रभाव पडला.

संस्कृतीच्या सर्व पैलूंमध्ये संस्कृतीच्या अभ्यासाशी निगडित असणारा आणि पुरातत्त्वशास्त्र, वंशशास्त्र आणि मानववंशशास्त्र, लोककथा आणि भाषाविज्ञान यांच्या पद्धती, संकल्पना आणि माहितीचा वापर जगातील विविधांगी लोकांच्या वर्णनांत व विश्लेषणात करणारा मानवशास्त्राचा एक प्रमुख विभाग म्हणजे सांस्कृतिक मानवशास्त्र. व्युत्पत्तिशास्त्रानुसार मानववंशशास्त्र हे मानवाचे शास्त्र आहे. याचे मुख्य काम म्हणजे सर्व ज्ञानशाखांना एकत्र आणून



munotes.in

त्यांची सामान्य उद्दीष्टे स्पष्ट करणे आणि त्या लोकसंख्येच्या जैविक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या आधारे त्यांचे स्पष्टीकरण देणे आणि काळाच्या ओघात, या लोकसंख्येतील फरक आणि भिन्नता यावर जोर देणे.एकीकडे वंश आणि दुसरीकडे संस्कृती या संकल्पनेकडे विशेष लक्ष दिले गेले आहे.यामधील अन्वयार्थ अजूनही वादविवादाच्या अधीन असला, तरी या संज्ञा मानववंशशास्त्रज्ञांच्या शब्दसंग्रहातील सर्वात महत्वाच्या आहेत यात शंका नाही.

सांस्कृतिक मानव वंश शास्त्रासारख्या मानव वंश शास्त्रीय क्षेत्रांमुळे मानवतेची उत्पत्ती समजून घेणे शक्य होते. ते विविध समाज आणि संस्कृती, त्यांच्यातील फरक आणि समानता यांची ओळख करून देतात. असे करण्यात सांस्कृतिक मानव वंश शास्त्राचा मोठा वाटा आहे. पुढील पैकी काही प्रमुख मानव वंशशास्त्रज्ञ आहेत.

### लुईस हेनरी मॉर्गन

मॉर्गन (१८१८ - १८८१) या अमेरिकन मानव वंश शास्त्रज्ञाने मूळ अमेरिकन लोकांवर लक्ष केंद्रित केले. त्याला व्यक्तीं मधील संबंध समजून घ्यायचे होते. असे करण्यासाठी त्यांनी त्यांच्यातील संवाद आणि त्यांच्या नाते संबंधांवर आणि समाजावर कसा परिणाम होतो याचे निरीक्षण केले. यातूनच त्यांचा 'सामाजिक उत्क्रांती' हा सिद्धांत आणि त्याचे वर्गीकरण क्रूरता, रानटीपणा आणि सभ्यता या तीन टप्प्यांत झाले.

### फ्रान्झ बोस

जर्मन-अमेरिकन मानव वंश शास्त्रज्ञ बोस (१८५८ - १९४५) यांना 'आधुनिक सांस्कृतिक मानव वंश शास्त्राचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्याने कालबाह्य समजुतींना आव्हान दिले आणि प्रगत सिद्धांत सहजपणे स्पष्ट केले. परिणामी, मानवतेचे निरीक्षण आणि विश्लेषण करण्यासाठी त्यांनी नवीन आणि नाविन्य पूर्ण मार्गांची ओळख करून दिली.

### रूथबेने डिक्ट

अमेरिकन मानव वंश शास्त्रज्ञ रूथबेने डिक्ट (१८८७ - १९४८) या लोक साहित्याच्या क्षेत्रातील कार्याबद्दल आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेल्या पहिल्या महिला होत्या. तिने पुढे संस्कृती आणि व्यक्ती यांच्यातील संबंधांचा शोध लावला. शिवाय मानवजातीला समजण्यास मदत व्हावी म्हणून पारंपरिक संस्कृती समजून घेण्यावरही तिने भर दिला.

## १२.२ सांस्कृतिक मानववंशशास्त्राची कार्यपद्धती

### सहभागी निरीक्षण (एथनोग्राफी)

या पद्धतीत निरीक्षक स्वत: ज्या समूहात शिकत असतोत्या समूहाच्या उपक्रमांत भाग घेतो. निरीक्षकाच्या सहभागामुळेया प्रकारचे निरीक्षण सहभागी निरीक्षण म्हणून ओळखले जाते. निरीक्षकाला स्वत: ला गटाशी ओळखण्याची किंवा सर्व कृतींमध्ये सक्रियपणे भाग घेण्याची आवश्यकता नाही. परंतु समूहातील सदस्य आपले उपक्रम पार पाडत असताना त्याला प्रत्यक्ष हजर राहावे लागते. सामान्यत: सहभागी निरीक्षण हे एक प्रकारचे अनियंत्रित निरीक्षण आहेज्यामध्ये संशोधक आपली ओळख प्रकट करू शकतो किंवा प्रकट करू शकत नाही. ही पद्धत व्यक्तीच्या वर्तनाचे निरीक्षण सर्वात नैसर्गिक स्थितीत करण्यास अनुमती देते, दुसरे

म्हणजे संशोधकाला अशी माहिती उपलब्ध आहे जी बाहेरील व्यक्ती म्हणून निरीक्षकाने सहजपणे प्राप्त केली नसती.

संशोधकाला समूहाचा भाग होण्याची संधी प्राप्त होते. त्याला समूहाच्या भावना, भावना आणि वागणूक यांचा अनुभव मिळतो. त्याला गटातील सदस्यांच्या भावना आणि वर्तन सामायिक करायला मिळते आणि अशा प्रकारे तो अधिक अचूकपणे सर्व काही नोंदवतो. तो केवळ लोकांच्या कृती किंवा वर्तनच पाहू शकत नाही तर विषय विशिष्ट पद्धतीने का आणि कोणत्या परिस्थितीत कार्य करतात किंवा वागतात हे देखील जाणून घेण्यास सक्षम असतो. सहभागी निरीक्षणामुळे संशोधकाला गटातील सदस्यांनी केलेल्या विधानांची सत्यता तपासण्याची संधी मिळते. सहभागी निरीक्षण ही माहिती गोळा करण्याची एक प्रभावी पद्धत असली तरीकाही प्रमाणात त्यास मर्यादा आहेत. निरीक्षक गटातील इतर सदस्यांशी घनिष्ठ संबंध विकसित करण्याची शक्यता आहे. यामुळे गटातील अन्वेषकाची क्षमता इतकी नष्ट होऊ शकते की, मानवी वर्तनाच्या काही समर्पक पैलूंचे निरीक्षण करणे तो विसरू शकतो. गटाशी संलग्नता देखील संशोधकाला एखाद्या विशिष्ट उपगटाकडे पक्षपाती बनवू शकते म्हणून तटस्थपणाला मर्यादा पडतात. सहभागींच्या निरीक्षणात, संशोधकाला एखाद्या विशिष्ट पदावर बसण्यास भाग पाडले जाते. यामुळे निरीक्षकाची या घटनेचा पूर्णपणे अभ्यास करण्याची व्याप्ती मर्यादित होते. शिवाय, जर संशोधक एखाद्या समूहात सामरिक पदावर आलातर तो सामान्यत: समूहाच्या गतिशीलतेत बदल घडवून आणतो.

**व्यष्ठी अध्ययन (केस स्टडी पद्धत)**

पी. व्ही. यंग यांनी केस स्टडीची व्याख्या सामाजिक एककाचा सर्वसमावेशक अभ्यास अशी केली आहे. व्यक्ती असो की लोकांचा समूह असो, एखादी संस्था किंवा समुदाय असो, त्याच्या सखोल अभ्यास पद्धतील व्यष्ठी अध्ययन किंवाकेस स्टडी म्हणतात. गुड आणि हॅट यांच्या मते कोणत्याही सामाजिक एककाकडे संपूर्णपणे पाहणारा हा एक दृष्टिकोन आहे. ज्या सामाजिक वस्तूचा अभ्यास केला जात आहे, त्याचे एकसंध स्वरूप टिकवून ठेवण्यासाठी सामाजिक माहितीचे आयोजन करण्याचा हा एक मार्ग आहे. केस स्टडी पद्धत गुणात्मक, सर्वसमावेशक, सखोल, अंतर्दृष्टी उत्तेजक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे. क्षेत्रीय अभ्यास (फिल्ड स्टडी) तुलनेने मर्यादित आहे परंतु त्यात अधिक सखोलता आहे. सांख्यिकीय पद्धतीप्रमाणे प्रत्येक गोष्टीबद्दल काहीतरी करण्याऐवजी प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करणे हे त्याचे उद्दीष्ट आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर तो एका मुख्य समस्येचा सूक्ष्म व परिपूर्ण अभ्यास आहे. केस स्टडी संशोधनाचा दृष्टीकोन विशिष्ट प्रस्थापित गृहीतकांवर किंवा कोणत्याही सुस्थापित निष्कर्षांवर आधारित असू शकत नाही. हा अभ्यास स्वतःच पुढील तपासणीसाठी एक सुस्थापित गृहीतक तयार करण्यात मदत करू शकतो. म्हणूनच हा संशोधन दृष्टीकोन एखाद्या विशिष्ट घटकाचा खुल्या आणि वस्तुनिष्ठ तपासणीचा एक स्वतंत्र शोध आहे.

केस स्टडीला काही वेळेस एक विशिष्ट तंत्र म्हणून तर काही ठिकाणी सामाजिक वास्तवाकडे पाहण्याचा दृष्टीकोन म्हणून संबोधले जाते. सखोल अभ्यास आणि काळजीपूर्वक विश्लेषण केल्यास यामध्ये विविध सामान्यीकरणे प्राप्त होऊ शकतात जी गृहीतकात विकसित केली जाऊ शकतात. संबंधित साहित्याचा अभ्यास आणि केस स्टडी (व्यष्ठी अध्ययन) हे

गृहीतकाचे दोन प्रभावी स्रोत आहेत. हे प्रश्नावली किंवा संशोधनाचे वेळापत्रक तयार करण्यात मदत करते. हे वैयक्तिक युनिट्सचा सखोल अभ्यास करून नमुना घेण्यास मदत करते.केस स्टडी पद्धतीमुळे सांख्यिकीय पद्धतीमध्ये संशोधकाच्या वैयक्तिक अनुभवाची श्रेणी वाढते.सामान्यत: विषयाची एक संकुचित श्रेणी निवडली जाते आणि संशोधकाचे ज्ञान केवळ विशिष्ट पैलूपुरते मर्यादित असते. केस स्टडीच्या बाबतीत, व्यक्तिनिष्ठ जीवनाच्या संपूर्ण श्रेणीचा अभ्यास केला जातो आणि विशिष्टबाबींवर जास्तीत जास्त ज्ञान मिळवले जाते.

**सर्वेक्षण**

सर्वेक्षणाची व्याख्या मुख्यतः कामगार वर्ग अथवा समूहामध्ये राहणाऱ्या व्यक्ती विशिष्टाचा अभ्यास आणि समुदायाच्या समस्येचे हे स्वरूप म्हणून केली गेली आहे. हेरिमन एन मोर्स यांनी त्याची व्याख्या अशी केली आहे की, 'सर्वेक्षण म्हणजे दिलेल्या सामाजिक परिस्थितीच्या उपक्रमांच्या निश्चित हेतूने वैज्ञानिक आणि सुव्यवस्थित स्वरूपात विश्लेषण करण्याची पद्धत.' मार्क अब्राम्स यांच्या मतेसामाजिक सर्वेक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे वरील व्याख्येतून सामुदायिक रचना आणि क्रियाकलापांच्या सामाजिक पैलूबद्दल संख्यात्मक तथ्ये गोळा केली जातात. सामाजिक शास्त्रांमध्ये याचा उपयोग विविध हेतूंसाठी केला जाऊ शकतो.माहितीच्या स्रोताचे स्वरूप उपलब्ध असणे हे सर्वेक्षण करण्याचा मुख्य आणि स्रोत आहे. ढोबळमानाने सामाजिक सर्वेक्षणाचे विषय १) जनसांख्यिकीय वैशिष्ट्ये २) सामाजिक परिस्थिती ३) मत व दृष्टिकोन यांत विभागले गेले आहेत.

खर्चाची पद्धत, रेडिओ ऐकणे, वर्तमानपत्र वाचणे सामाजिक गतिशीलतेची माहिती वाचणे यासारखे सामाजिक उपक्रम उदा. कौटुंबिक घराच्या समूहाचे खर्च जाणून घेणे यासारख्याविशिष्ट सामाजिक बाबीसाठी सर्वेक्षण करणे आवश्यक ठरते. समूहातील पद्धती जशा खर्चाची सवय, कुटुंब, कपडे, शिक्षण, सिगारेट, सिनेमा आणि इतर गोष्टींवरील खर्च याचा अभ्यास देखील सर्वेक्षणमुळे शक्य होते. जनमत सर्वेक्षणमध्ये लोकांचे मत आणि विविध घटकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचे हेतू आणि त्यांचा खर्च यांविषयीची माहिती ही माहिती प्रश्नाच्या स्वरूपाचा आधार म्हणून आवश्यक असू शकते.

**आपली प्रगती तपासा:**

**प्र.१. सांस्कृतिक मानववंश शास्त्राची कार्यपध्दती सांगा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १२.३ सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन

भौतिक मानववंशशास्त्र आणि सांस्कृतिक मानववंशशास्त्र या दोन मोठ्या शाखा आणि प्रागैतिहासिक आणि भाषाविज्ञानासारख्या तत्सम संबंधित शाखांमध्ये मानवी समाजाच्याअभ्यासासाठी स्थापन करण्यात आल्या आहेत. ही दोन्ही क्षेत्रे मोठ्या प्रमाणात स्वायत्त आहेत. मानववंशशास्त्रा बाहेरील ज्ञानशाखांशी त्यांचे स्वतःचे संबंध आहेत. कोणतेही

संशोधक एकाच वेळी शारीरिक आणि सांस्कृतिक मानववंशशास्त्राच्या क्षेत्रात काम करू शकत नाही. दोन क्षेत्रातील तज्ञ जेव्हा विशिष्ट अनुवांशिक किंवा लोकसंख्याशास्त्रीय समस्या आणि इतर बाबींमध्ये सहकार्य करण्याची भूमिका घेतात तेव्हा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन प्रत्यक्षात येतो.

**सांस्कृतिक मानसशास्त्र**

दोन महायुद्धातील भयंकर अशा आपत्तीमुळे काही सांस्कृतिक मानव वंश शास्त्रज्ञांनी मानसशास्त्र या विषयाच्या एका नवीन उपशाखेविषयी सांस्कृतिक मानसशास्त्राविषयी विवेचन केले. त्यानुसार विशिष्ट संस्कृतीमुळे व्यक्तींची (वैश्विक मानसिकता किंवा मानवी स्वभावाच्या जुन्या कल्पनेच्या यांना न जुमानता) मानसिक जडणघडण होते..उदाहरणार्थ१९३० च्या दशकात रूथ बेनेडिक्ट यांना अमेरिकन नैर्ऋत्य भागाच्या अभ्यासात असे दिसून आले की पुएब्लो इंडियन त्यांचे भौगोलिक वातावरण जवळजवळ एकसारखेच असूनही ज्या पद्धतीने विचार करतात आणि ज्या प्रकारे तर्क करत होतेते त्यांच्या जवळच्या शेजाऱ्यांच्या विचारसरणीपेक्षा आणि तर्कापेक्षा वेगळे होते.त्यामुळे निष्कर्ष असा निघत होता की युगानुयुगे प्रत्येक संस्कृती उत्क्रांत झाली आहे आणि तिच्या सदस्यांना एक वेगळा असा "मानसशास्त्रीय संच" किंवा वास्तवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिला आहे आणि या संचामुळे सदस्यांनी पर्यावरणातील माहितीकडे कसे पाहिले पाहिजे आणि त्यावर प्रक्रिया कशी केली हे निश्चित केले जाते. सांस्कृतिक मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्र

सांस्कृतिक मानववंशशास्त्र इतर अनेक शास्त्रांशी संबंध राखते. उदाहरणार्थ समाजशास्त्राच्या बाबतीत असे म्हटले गेले आहे कीते मानववंशशास्त्राची अगदी निगडीत आहे. या दोघांमध्ये बहुधा त्यांच्या अभ्यासाच्या क्षेत्रावरून (आधुनिक समाज विरुद्ध पारंपारिक समाज) फरक पडला आहे. ही दोन सामाजिक शास्त्रे अनेकदा देवाणघेवाण करतात.ही दोन सामाजिक शास्त्रे अनेकदा एकत्रितरित्या कार्यरत असतात.वसाहतवादी समाजाचा अभ्यास सांस्कृतिक मानवशास्त्राइतकेच समाजशास्त्रातूनही केला जातो. आणि सांस्कृतिक मानववंशशास्त्र शहरी आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये शास्त्रीयदृष्ट्या समाजशास्त्राच्या क्षेत्रात अधिकाधिक वेळा कसा हस्तक्षेप करत असते किंबहुना अचूक निष्कर्ष काढण्यासाठी त्याची गरजच भासते.

**राज्यशास्त्र**

राज्यशास्त्रात राज्याच्या संकल्पनेची आणि तिच्या उत्पत्तीच्याचर्चला सांस्कृतिक मानववंशशास्त्राने पोषकअशी माहिती पुरवली आहे. राज्यशास्त्रज्ञांनीही संकल्पनांकडे अधिक तुलनात्मक दृष्टीने बघण्यासाठी सांस्कृतिक मानववंशशास्त्रावर अवलंबून राहून अनेक जुन्या संकल्पनांना आव्हान दिले आहे.

**वांशिक मानसशास्त्र**

सांस्कृतिक मानवशास्त्राने ज्यावर व्यक्तिमत्त्वाच्या संकल्पनांवर आणि व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर चिंतन करता येईल असे मानसशास्त्राला नवे आधार दिले आहेत. याने मानसशास्त्राला क्रॉस-कल्चरल सायकायट्री किंवा तथाकथित एथनो-सायकियाट्रीची प्रणाली विकसित करण्याची परवानगी दिली आहे. याउलट मानसशास्त्रीय शास्त्रांनी विशेषत:

munotes.in

मनोविश्लेषणाने संस्कृती या संकल्पनेच्या विवेचनासाठी सांस्कृतिक मानववंशशास्त्राची नवी गृहीतके मांडली आहेत.

**इतिहास**

इतिहासाशी मानव शास्त्राचा जोडलेला दुवा फार पूर्वीपासून महत्त्वाचा आहे कारण सांस्कृतिक मानववंशशास्त्र हे मूलतः उत्क्रांतीवादी दृष्टिकोनावर आधारित होते आणि ज्या समाजांबद्दल लिखित कागदपत्रांच्या अभावामुळेकोणतीही ऐतिहासिक नोंद निश्चित करता आली नाही. अशा समाजांच्या सांस्कृतिक इतिहासाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मौखिक परंपरेचे विश्लेषण आणि टीका यांवर आधारित संशोधनाची नवनवीन तंत्रे सांस्कृतिक मानववंशशास्त्राने इतिहासकारांना अलीकडे सुचविली आहेत. आणि म्हणून "एथनोहिस्टरी" उदयास येऊ लागली आहे. सरतेशेवटी सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा मानवी भूगोलाशी घनिष्ट संबंध आहे. हे दोघेही मनुष्याला एकतर अंतराळाचा वापर करताना किंवा नैसर्गिक वातावरणाचे रूपांतर करण्यासाठी कार्य करतात म्हणून त्याला खूप महत्त्व देतात.

**जैव-सांस्कृतिक मानववंशशास्त्र**

बायो-कल्चरल अँथ्रोपोलॉजी (जैव-सांस्कृतिक मानव वंशशास्त्र) अभ्यासाची सुरुवात समग्र मानव वंशशास्त्राच्या उत्पत्ती पासून होते. पूर्वीच्या ते अलीकडील संशोधनापर्यंतच्या परंपरांमध्ये अनुकूलन करण्याचा विचार केला जातो, आंतरविद्या शाखीय कार्यास अनुकूल अशा उत्क्रांती विषयक आणि सांस्कृतिक सिद्धांताचा समावेश होतो आणि जैव-सांस्कृतिक विभाजन पार करणाऱ्या संशोधनावर प्रकाश टाकला जातो. यामध्ये मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास केला जातो. मानववंशशास्त्रात मानवाचे पूर्वज, त्यांची वैशिष्ट्ये, मानवी वर्तन, मानवी समाजातील फरक आणि फरक, मानवी उत्क्रांतीचा समाजावर आणि संस्कृतीवर होणारा परिणाम अशा विषयांचा अभ्यास केला जातो.या अभ्यासात मानवाची उत्पत्ती, भौतिक वैशिष्ट्ये, चालीरीती, भाषा, परंपरा, वस्तू, तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक श्रद्धा आणि प्रथा अशा विषयांचा समावेश आहे. समाजशास्त्र, विकास, अर्थशास्त्र, गुन्हेगारी मानसशास्त्र व कायदेव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता हे मानवशास्त्रीय अभ्यास सर्वांत महत्त्वाचे आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

**प्र.१. सांस्कृतिक मानववंश शास्त्राचा आंतर विद्याशाखीय दृष्टीकोन स्पष्ट करा.**

## १२.४ सारांश

नैसर्गिक आणि सामाजिक परिस्थितीला मानव आपल्या मूलभूत प्रेरणेने कसा तोंड देतो, आवश्यक त्या गोष्टी कशा पार पाडतो आणि त्यांची माहिती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे

munotes.in

कशी पोहोचवतो, याचा अभ्यास सांस्कृतिक मानववंशशास्त्रज्ञ करतात.एकच उद्देश साध्य करण्यासाठी विविध संस्कृतींची अनेक साधने असतात. असे असले तरी प्रत्येक समाजात जीवनकार्य सुनियोजित असते. अंतर्गत विकासामुळे किंवा बाह्य संपर्कामुळे परंपरेची स्थिर रूपेही बदलत आहेत. व्यक्ती एका विशिष्ट समाजात जन्माला येते आणि तिचा सांस्कृतिक वारसा असलेले संस्कार पुढे घेऊन जाते. असे सर्व विचार आणि विषय सांस्कृतिक मानववंशशास्त्रात येतात.

## १२.५ प्रश्न

१) सांस्कृतिक मानववंशशास्त्रात माहिती संकलनाच्या कोणत्या पद्धती वापरल्या जातात?

२) सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्पष्ट करा.

## १२.६ संदर्भ ग्रंथ

१) पावलीन यंग, सायंटिफिक सोशल सर्वे अंड रिसर्च, १९८४

२) गुडे अंड हॅट, मेथड्स इन सोशल रिसर्च, मॅकग्रा हिल बुक कंपनी, १९८१.

३) क्लिफर्ड, जेम्स आणि जॉर्ज ई.मार्कस (१९८६) रायटिंग कल्चरस द पोयेतिक अंड पोलिटिक्स ऑफ इथनोग्राफी : बर्कले: यूनिवर्सिटी ऑफ कैलिफोर्निया प्रेस

४) मीड, मार्गारेट, रूथ बेनेडिक्ट : अ ह्युमनिस्ट इन अँथ्रोपोलॉजी. कोलंबिया यूनिवर्सिटी प्रेस. रूथ बेनेडिक्ट राल्फ लिंटन, २००५

५) बी. शेख अली, हिस्ट्री अंड इट्स मेथड्स, १९८१

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# १३

# इतिहास, स्मृती आणि चरित्र यातील फरक

**घटक रचना**

१३.० उद्दिष्टे

१३.१ प्रस्तावना

१३.२ इतिहास आणि स्मृती यांच्यातील फरक

१३.३ इतिहास आणि स्मृती यांच्यातील संबंध

१३.४ स्मरणिका (आत्मचरित्र) आणि जीवनचरित्र

१३.५ इतिहास आणि जीवनचरित्र

१३.६ सारांश

१३.७ प्रश्न

१३.८ संदर्भ ग्रंथ

## १३.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना ऐतिहासिक संशोधनाच्या स्त्रोतांची ओळख करून देणे.

२) विद्यार्थ्यांना इतिहास आणि स्मृती यांच्यातील फरकाची ओळख करून देणे.

३) विद्यार्थ्यांना स्मरणिका (आत्मचरित्र) आणि जीवनचरित्रयांची वैशिष्ट्ये समजून देणे.

४) इतिहास, स्मृती आणि जीवनचरित्र याबद्दल विद्यार्थांना माहिती देणे.

## १३.१ प्रस्तावना

इतिहासाचे तत्त्वज्ञान आणि इतिहास कथन करण्याची पद्धत वर्षानुवर्षे विकसित होत आली आहे. इतिहास लेखनात ग्रीकांना अग्रणी मानले जात असे. इ.स.पू.पाचव्या शतकातील हेरोडोटसने आपल्या 'इन्व्हेस्टिगेशन्स' या ग्रंथात पिढ्यानपिढ्या कथा मांडण्याच्या होमरच्या परंपरेपासून फारकत घेत वेगळा मार्ग अनुसरला. त्याने मिथक कथांपासून फारकत घेत वस्तुनिष्ठपणे इतिहास लेखन करण्यावर भर दिला.त्याने इतिहास लेखनाला हिस्टरी असेही म्हटले जाते. हेरोडोटसला अनेक जण पहिला इतिहासकार मानतात.हेरोडोटस आणि नंतर प्लूटार्क (इ.स.पू.४६-१२०) यांनी लिखाणासाठी अनेक ऐतिहासिक विषय निवडले.

मध्ययुगीन कालखंडात इब्न खल्दूनने इतिहासाच्या तत्त्वज्ञानाला वैज्ञानिक पद्धतीचा परिचय करून दिला आणि त्याचा उल्लेख त्याने अनेकदा "नवे शास्त्र" असा केला. त्याच्या ऐतिहासिक पद्धतीमुळे राज्याची भूमिका, दळणवळण, प्रचार आणि इतिहासातील पद्धतशीर पूर्वग्रह यांचे निरीक्षण करण्याची पायाभरणीही झाली. अठराव्या शतकापर्यंत इतिहासकारांनी अधिक सकारात्मकवादी दृष्टिकोनाकडे आपलामोर्चा वळवला होता. त्यांनी शक्य तितके



munotes.in

वस्तुस्थितीवर लक्ष केंद्रित केले होते. व्हिक्टोरियन युगात (१८३७ते १९०१ हा कालखंड राणी व्हिक्टोरियाच्या कारकिर्दीचा काळ)इतिहासलेखनकारांनी इतिहासाची कारणे काय आहेत आणि ऐतिहासिक बदल कसे समजू शकतात यावर अधिक चर्चा केली.

**आपली प्रगती तपासा:**

१. इतिहासाची व्याख्या करा?

________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________

२. गेल्या काही वर्षांत इतिहास कसा विकसित झाला आहे?

________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________
________________________________________________________________

## १३.२ इतिहास आणि स्मृती यांच्यातील फरक

स्मृती या विषयाने अनेक इतिहासकारांना गुंतवून ठेवले आहे. स्मृती म्हणजेच आठवणी या व्यक्ती आणि समाज त्यांच्या इतिहासातील काही क्षण आणि घटना लक्षात ठेवण्याची निवड करण्याच्या पद्धतींना सूचित करते. पुतळे, स्मारके, परेड आणि स्वातंत्र्यदिनासारख्या राष्ट्रीय सुट्ट्यांच्या माध्यमातून समाजांनी आपल्या सामूहिक स्मृतींचे प्रदर्शन करणे पसंत केले आहे. अलिकडच्या वर्षांत इतिहासकारांनी १८५७ ची क्रांती, सविनय कायदेभंगाची चळवळ, दुसरे महायुद्ध आणि भारत छोडो चळवळ यासारख्या राष्ट्रीय व राजकीय चळवळीच्या भूतकाळातील ठशांचा जनस्मृतीवर कसा परिणाम झाला आहे याचे विश्लेषण केले आहे. अनेक संशोधन प्रबंध सामूहिक स्मृतीच्या कोणत्या ना कोणत्या प्रकारावर भर देतात.

पुष्कळ इतिहासकार भूतकाळातील अन्यायांची आठवण करून देण्यासाठी आणि समकालीन सामाजिक समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे याची आठवण करून देण्यासाठी एक सक्रिय स्मृती निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. इतिहास आणि स्मृती यांतील फरक आपण पाहूया. इतिहास आणि स्मृती यांच्यात ठोस संबंध आहेतच पण त्यात फरकही आहेत. स्मृती ही इतिहासाच्या अस्तित्वाची नितांत गरज आहे. जर आपण भूतकाळ विसरून पुढे जाण्याचा निर्णय घेतला तर इतिहासाचे अस्तित्वच नाहीसे होते. पण अशा प्रकारच्या इतिहस लेखनासाठी पुराव्यांचीनितांत गरज असते.

## १३.३ इतिहास आणि स्मृती यांच्यातील संबंध

अनेक क्षेत्रांतील व राष्ट्रांतील इतिहासकार 'स्मृती'च्या चष्म्यातून भूतकाळाचा अभ्यास करत आहेत. समाज काही गोष्टी लक्षात ठेवून सामूहिक ऐतिहासिक जाणीव कशी निर्माण करतात, याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. स्मृती या अशा आठवणी आहेत त्यात एखाद्या समुदायाचा वारसा किंवा ओळख आहे. भारतावरील फाळणीचा आघात, अर्मेनियातील प्रथम महायुद्ध्तील नरसंहार या बाबी स्मृतीद्वारे जागृत आहेत. पिढ्यानपिढ्या स्मृती जपली जात असते.इतिहासाची उजळणी केली जाते. वस्तू, स्थळे आणि स्मारके यांमध्ये स्मृतीचा अनेकदा मिलाफ होतो.इतिहास लेखन करताना या स्मारकांचा संदर्भ समजून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो.

मात्र स्मृतीवर काम करणारे विद्वान स्त्रोतांना देखील महत्व देतात.इतिहासकार सर्व प्रकारच्या वैयक्तिक आठवणींचे आणि प्रत्यक्ष आठवणीत राहिलेल्या अनुभवाचे मूल्यमापन पत्रे, आठवणी, भाषणे, वादविवाद आणि आत्मचरित्र यांतून करतात. परंतु सामूहिक स्मृतीच्या एक धोका आहे. गट, लोक किंवा देश ज्या प्रकारे भूतकाळातील बाबींचा वापर करून सतत बदलनाऱ्या वर्तमानात सत्ता जिंकण्यासाठी त्यांचा वापर केला जातो.

शालेय शिक्षण, धर्म, कुटुंब आणि लोकप्रिय संस्कृती यांपासून लोक कोणत्या ना कोणत्या मार्गाने भूतकाळाची जाणीव विकसित करतात. परंतु यात सर्वात मोठा धोका म्हणजे निहित स्वार्थ असलेल्या लोकांच्या प्रेरणेतूनच भूतकाळाची जाणीव करून घेण्याची लोकांची प्रवृत्ती होय. स्मृतीच्या कल्पित शक्तीपुढे आणि त्यातील भविष्यवाण्यांना तोंड देताना इतिहास सहसा कमकुवत होतो. इतिहासकारांना आशा आहे की लोक भूतकाळाची अधिक गंभीर, अर्थपूर्ण जाणीव स्वीकारतील. अन्यथा भूतकाळाचे योग्य आकलन न करता पुढे जाणे किंवा आपल्या भविष्याला दिशा देणे व्यर्थ आहे कारण भूतकाळच आपल्या वर्तमानाला आणि भविष्याला मार्गदर्शन करतो. इतिहासकार स्मृतीचा अभ्यास करण्यासाठी अधिक वस्तुनिष्ठ असतो.

लिओपोल्ड रँके अशा प्रकारच्या स्मृतींना फारसे महत्व देत नाही. तो वस्तुनिष्ठ पुराव्यांवर अधिक भर देतो.रँके(१७९५-१८८६) हा एकोणिसाव्या शतकातील एक अग्रगण्य जर्मन इतिहासकार होताज्याच्या विद्वत्तापूर्ण पद्धतीचा व अध्यापनाच्या पद्धतीचा पाश्चात्त्य इतिहासलेखनावर फार मोठा प्रभाव होता. प्राचीन ग्रंथांच्या अनुवादावर त्याने लक्ष केंद्रित केले. हा दृष्टिकोन त्यानेपुढे ऐतिहासिक मजकूरविषयक विवेचनाच्या तंत्रात विकसित केला. रँकेहा वस्तुनिष्ठ इतिहासकार होता. उदारमतवाद्यांना किंवा पुराणमतवाद्यांना कोणालाही खूश करण्याचा त्याने प्रयत्न केला नाही.

अमेरिकेतील यादवी युद्ध आणि आधुनिक नागरी हक्कांच्या चळवळीने आठवणी आणि आख्यानांना नवा अर्थ लाभला आहे. नागरी युद्ध आणि नागरी हक्क चळवळ तसेच प्रस्थापित माध्यमांनी अथवा इतिहासाने दाखल घेतली नाही तरी भारतातील जात वास्तव आणि जातीभेद विरोधी चळवळ आजही स्मृतींच्या माध्यमातून जिवंत आहे.पश्चिम भारतात महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांच्या जीवनातील अविस्मरणीय व प्रबोधनात्मक घटनांची भक्तिभावाने नोंद करणारे महिनभट्ट यांनी संकलित केलेले मराठीतील पहिले चरित्र म्हणजे लीळाचरित्र होय. साडेपाचशे वर्षांच्या कालखंडात म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या



munotes.in

प्रारंभापर्यंत अनेक लहान गद्यपात्रे याच भक्तीच्या व प्रेरणेतून त्याच भक्तीतून व प्रेरणेतून मराठीत लिहिली गेली. आख्यायिका, खंडकाव्य, पोवाडे, ऐतिहासिक बखरी यांद्वारे ते विखुरलेले आहेत. समाजातील धार्मिक जीवनाचे आणि इतिहासाचे साधन म्हणून वापरली जाणारी चरित्राची ही परंपरा ब्रिटिश राजवटीच्या काळात नियोजनबद्ध पद्धतीने सुरू झालेल्या शिक्षणाचा प्रसार आणि अनुभवजन्य शास्त्रांच्या अभ्यासावर दिलेला भर यामुळे हळूहळू बदलू लागली. विविध क्षेत्रांतील उत्तुंग व्यक्तींच्या जीवनकथा शालेय विद्यार्थ्यांसमोर आदर्श म्हणून मांडण्याच्या बोधवादी भूमिकेत महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी कोलंबस तर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी सॉक्रेटीस यांनी चरित्रे लिहिली गेली.

या दोन दर्जेदार व्यक्तिरेखांपासून सुरू झालेल्या आधुनिक काळातील व्यक्तींच्या जीवनातील वास्तव चित्रणाचा कल नंतरच्या काळात विविध जीवन क्षेत्रांतील व्यक्तींची चरित्रे लिहून मोठ्या प्रमाणावर विस्तारला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्राच्या लोकजीवनावर प्रभाव टाकणारे अनेक विचारवंत, शास्त्रज्ञ, कलावंत आणि कार्यकर्ते माहितीपर चरित्रे आणि चरित्रे यांचा विषय बनले आहेत. बाळशास्त्री जांभेकर व दादाभाई नौरोजी यांच्यापासून स्वातंत्र्योत्तर काळात पंडीत नेहरू – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सुमारे दीडशे वर्षांच्या कालखंडात व्यक्तींवर लिहिताना वेगवेगळ्या लेखकांनी मनात बाळगलेल्या वेगवेगळ्या उद्देशांतून एका व्यक्तीची अनेक चरित्रेही तयार होऊ लागली.

आजही चरित्राचा विषय असलेल्या जवळपास सर्वच महान व्यक्तींच्या जीवनाचा समाजातील विविध चळवळींशी व विचारधारांशी जवळचा संबंध असल्याने त्यांची चरित्रेही अनेक गोष्टींवर प्रकाश टाकतात. चरित्रनायकांविषयी लिहिताना गुणदोषांचे संमिश्र चित्रण झाले तर त्या व्यक्तीच्या मोठेपणाला बाधा येईल अशी भीतीही अनेकांना वाटत राहते. त्यामुळे मानवी मनाच्या गुंतागुंतींना तोंड न देता, आकर्षक निवेदनाच्या साहाय्याने नायकाचे घटनामय जीवन कथन केले पण त्यामुळे ऐतिहासिकतेला बाधा येते.

**आपली प्रगती तपासा:**

१. इतिहास आणि स्मृती यांच्यातील संबंधांची चर्चा करा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२. स्मृती इतिहासाची माहिती कशा प्रकारे मांडते ते तपासा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

## १३.४ स्मरणिका (आत्मचरित्र) आणि जीवनचरित्र

चरित्र आणि स्मरणिकेत काय फरक आहे? चरित्रे आणि संस्मरण या दोन्ही गोष्टी माणसाच्या आयुष्याच्या कथा सांगतात. ते सामान्यत: एखाद्या पुस्तकाच्या स्वरूपात आढळतात. आपण जॉर्ज वॉशिंग्टनचे चरित्र वाचत आहात किंवा आपण चित्रपट पहाल तर ते देखील त्याच्या जीवनाचे चरित्र आहे. तुम्ही कदाचित "क्रांतिकारक युद्ध लढताना जॉर्ज वॉशिंग्टनने लिहिलेल्या आठवणीही वाचू शकतो. 'चरित्र' आणि 'स्मरणिका' यांच्या वापरातील फरक तांत्रिक आहेत परंतु योग्य वापरासाठी जाणून घेणे आणि समजून घेणे महत्वाचे आहे.

एखाद्याच्या जीवनातील घटनांचा साधारण लेखाजोखा चरित्रात दिला आहे. बहुतेक प्रकाशित किंवा चित्रित केलेली चरित्रे ऐतिहासिक व्यक्ती किंवा प्रसिद्ध व्यक्तींबद्दल असतात. जीवनचरित्राची सुरुवात साधारणत: एखाद्या व्यक्तीच्या बालपणापासून होते. त्या व्यक्तीची कौटुंबिक परिस्थिती किंवा त्या व्यक्तीच्या आईवडिलांच्या जीवनातील घटना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठीत्या व्यक्तीच्या जन्मापूर्वीच कथा सांगण्याची सुरुवातही होऊ शकते. चरित्राचा शेवट त्या व्यक्तीच्या मृत्यूने होतो किंवा ते अजूनही जिवंत असतील तर त्यांच्या जीवनातील एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगाने किंवा सद्य:स्थितीने होते. हे त्यांच्या जीवनातील घटना घडल्याच्या क्रमाने इतिवृत्त करते किंवा सांगते. यात एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांवर भाष्य, चर्चा किंवा अर्थ असू शकतो, परंतु तो बहुधा तथ्यात्मक किंवा ऐतिहासिक पुराव्यांवर केंद्रित असतो.स्मरणिकेत एखाद्याच्या आयुष्यातील काही आठवणी, अनुभव किंवा विशिष्ट पैलूंवर लक्ष केंद्रित केले जाते. हे एखाद्या जीवनचरित्रापेक्षा कमी व्यापक आणि कमी सामान्य आहे. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांच्या जीवनावर आधारीत चरित्र आयुष्य वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी देते. कार्व्हर यांचा जन्म १८६४झाली झाला. निसर्गाच्या सानिध्यात रमत त्यांनी कृषी मध्ये शिक्षण केले. त्यातच अध्यापन केले. आयुष्यात यशाची पायरी चढताना त्यांनी आपले नाते जमिनीशी घट्ट ठेवले. त्यामुळेच ते आयुष्यात यशस्वी झाले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण आणि उपयोग मानवी जीवनासाठी किती आवश्यक आहे वीणा गवाणकर त्यांनी यात सांगितले.

त्यमुळे एखाद्याच्या जीवनाविषयीची कथा चरित्र आहे की संस्मरण आहे हे ठरवताना ती कथा कोणी लिहिली, कथा काय सांगते, ती कशी लिहिली जाते आणि कथा लिहिताना लेखकाच्या मनात काय अर्थ किंवा हेतू होता हे लक्षात ठेवा. आत्मचरित्र आणि चरित्र या दोन्ही गोष्टी एका विशिष्ट व्यक्तीच्या जीवनाचा लेखाजोखा आहेत. या दोघांमध्ये विचारात घेण्यासारखे अनेक सूक्ष्मता देखील आहेत. आत्मचरित्र हे तांत्रिकदृष्ट्या त्या व्यक्तीने निर्माण केलेल्या जीवनाचे स्वतः वर्णन करणारे कार्य असते. जीवनचरित्र हेदेखील जीवनाचे वर्णन करणारे कार्य आहे. तथापि हे दुसऱ्या व्यक्तीने लिहिलेले असते.चरित्रे कोणीही आणि कोणाबद्दलही लिहू शकतो. आत्मचरित्रे आणि चरित्रे ही संशोधनाकाला अधिक वेळ न दवडता महत्वाची माहिती देवू शकतात.हे वाचकांना माहिती देऊ शकते आणि त्यांना जाणून घेऊ इच्छित असलेल्या लोकांच्या जवळ आणू शकते. तथापि ज्ञानकोश आणि शब्दकोशांसारख्याच प्रकारच्या संदर्भ ग्रंथांच्या तुलेनेत त्यांचे महत्व कमी असू शकते.

बाबा पद्मनजींचे अरुणोदय हे मराठी भाषेतील पहिले आत्मचरित्र होय. अंतःप्रेरणेचा पाठपुरावा करून त्यांनी आपल्या स्वत:च्या जीवनातील संक्रमण साध्या प्रामाणिक भाषेत

आपल्या अंतःकरणातून व्यक्त केले आहे. मात्र अरुणोदयानंतर साहित्यातील आत्मचरित्रात्मक लेखनाची पद्धत पूर्णपणे प्रचलित झाली नाही. आजही विविध जावन क्षेत्रातील अनेक जण आपले काही अनुभव सांगण्यासाठी पुढे सरसावत आहेत आणि तिथूनच एक आत्मचरित्र वाचकांच्या हाती पडत आहे.'डोंगरी तुरुंगातील आमचे १०१ दिवस' (१८८२) गोपाळ गणेश आगरकर यांनी आपल्या आत्मचरित्रातत्यांच्या आणि लोकमान्य टिळकांच्या पहिल्या तुरुंगवासाची हकीकत लिहिली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

१. चरित्र म्हणजे काय याची चर्चा करा.

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

२. स्मरणिका आणि चरित्र यांतील फरकाची चर्चा करा.

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

## १३.५ इतिहास आणि जीवनचरित्र

चरित्रसाहित्याचा एक प्रकार म्हणून गणला जातो.वाङ्मयीन अभिव्यक्तीच्या सर्वात जुन्या प्रकारांपैकी तो एक प्रकार आहे.सर्व उपलब्ध पुराव्यांचा आधार घेऊन स्मृतीत टिकून असलेल्या पुराव्यांचा तसेच लिखित किंवा तोंडी आणि सचित्र साहित्याचा समावेश आहे.जागतिक आत्मचरित्रपर वाङ्मयात ज्यांना निर्विवादपणे उच्च स्थान आहे महात्मा गांधींचे 'सत्याचे प्रयोग' (१९२७-१९२९) आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे 'आत्मकथन' (१९३६) हीप्रसिद्ध आत्मचरित्रे आहेत. सामाजिक उद्‌बोधनाच्या हेतूने धोंडो केशव कर्वे यांनी आपले आत्मवृत्त लिहिले (१९१५). लेखक मॅक्झिम गॉर्की याचे आत्मचरित्र 'माझे बालपण', 'या जगात' व 'माझी विद्यापीठे' अशा अर्थाच्या शीर्षकांखाली तीन खंडांतून प्रसिद्ध झाले आहे. जागतिक आत्मचरित्रांत गॉर्कीच्या या ग्रंथांना फार मोठे स्थान आहे. पहिल्या महायुद्धानंतर युद्धविषयक अनुभवांची अनेक स्मृतिचित्रे पश्चिमी वाङ्मयात निर्माण झाली. या प्रकारातील रॉबर्ट ग्रेव्ह्ज या इंग्रज कवीचे व कादंबरीकाराचे गुड बाय टू ऑल दॅट (१९२९) हे आत्मकथन उल्लेखनीय आहे. याशिवाय विख्यात ब्रिटिश मुत्सद्दी चर्चिल यांचे आत्मवृत्त (माय अर्ली लाइफ, १९३०) चित्तवेधक आहे

**वैशिष्ट्ये आणि प्रकार**

### १. ऐतिहासिक

चरित्रकथा ही इतिहासाची एक शाखा मानली जावू शकते. प्राचीन चिनी इतिहासांतील काही नोंदींमध्ये चरित्रात्मक रेखाचित्रांचा समावेश होता.रोमन इतिहासकार टॅसिटसचे ॲनल्स हे सम्राट टायबेरियसचे सर्वात प्रसिद्ध चरित्र आहे. इतिहास सहसा सामान्यीकरणाचा संबंध एका कालखंडातील (उदा., रेनेसान्स), काळाच्या काळातील लोकांच्या समूहाविषयी (उत्तर अमेरिकेतील इंग्रजी वसाहती), एका संस्थेविषयी (मध्ययुगातील चर्च) विवेचन करतो. चरित्र अधिक सामान्यत: एकाच माणसावर लक्ष केंद्रित करते आणि त्या व्यक्तीच्या जीवनाच्या तपशीलांवर आधारित असते.मृत व्यक्तीचे चरित्र लिहिताना चरित्रकाराला स्रोतांच्या अभावामुळे अडथळा निर्माण होवू शकतो. लिखित पुरावा काय आहे हे तपासणे किंवा सत्यापित करणे सहसा अशक्य असते. उलटतपासणीसाठी कोणतेही साक्षीदार नसतात. अशा समस्यांवर मात करण्याची कोणतीही पद्धत अद्याप विकसित केलेली नाही. आणखी एक अडचण म्हणजे २०व्या शतकापूर्वी संपादित केलेली कागदपत्रे, पत्रे आणि इतर आठवणींच्या बहुतेक संग्रहांची अविश्वसनीयता. काही वेळा कागदपत्रांच्या लेखकांनी भविष्याच्या फायद्यासाठी त्यांच्या वैयक्तिक लेखनात जाणीवपूर्वक बदल केलेले आहेत.

### २. मनोविश्लेष्णात्मक

कालक्रमानुसार वस्तुस्थितीची एक श्रृंखला एकत्र करणे म्हणजे व्यक्तीचे जीवन होत नाही.ती केवळ घटनांची जंत्री असते. म्हणूनच चरित्रकार आपल्या साहित्यातून आपल्या विषयाच्या कृतींचे हेतू जाणून घेण्याचा आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आकार शोधण्याचा प्रयत्न करतो. चरित्रकाराला आपला विषय केवळ लिखित पुराव्यांवरून आणि कदाचित साक्षीदारांच्या अहवालातून माहीत असतो. विसाव्या शतकातील चरित्रकारांनी सिग्मंड फ्रॉइड आणि त्याच्या अनुयायांचे आणि प्रतिस्पर्ध्यांचे मानसशास्त्रीय सिद्धांत आणि आचरण याद्वारे अनेक प्रसिद्ध व्यक्तींचा व्यक्तिमत्व वेध घेण्याचा प्रयत्न केला.

### ३. सौंदर्यवादी दृष्टीकोनातून चरित्र

जीवनचरित्र इतिहासाशी निगडित असले तरी ती खऱ्या अर्थाने साहित्याची एक शाखा आहे.एकीकडे चरित्रकार आपल्या आवडी-निवडीच्याबदलत्या भावनिक अवस्था व घटना या सर्वांचा उलगडत जाणारा पट चित्रित करू पाहतात.

### ४. माहितीपूर्ण चरित्र

या प्रकारचे चरित्र हे वस्तुनिष्ठ असते. यामध्ये चरित्रनायकाच्या जीवनाशी संबंधित पुरावे सादर करून जीवन उलगडण्याचा प्रयत्न करतो. हा चरित्रकार मुलभूत साधनांचा संदर्भ घेतो.एकोणिसाव्या शतकात, जॉन जी. निकोले यांनी लिहिलेले 'द

लाइफ ऑफ मिल्टन'हे याचे प्रतीनिधिक उदाहरण आहे. मराठीत पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेले महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र हे देखील अशाच प्रकारे लिहिले गेलेले चरित्र आहे. श्री. ना. कर्नाटकी यांनी लिहिलेली, थोर प्राच्य विद्या विशारद रा. गो. भांडारकर (१९२७), विद्वान सुधारक न्यायमूर्ती. तेलंग (१९२९), संशोधक व सामाजसेवक डॉ. भाऊ दाजी लाड ( १९३१) यांची चरित्रे ही काही उदाहरणे आहेत. गोपाळराव हरि (१९७९) हा लोकहितवादींच्या व्यक्तिमत्त्वाची आणि विचारसरणीची एकात्म मूर्ती उभी करणारा सरोजिनी वैद्यकृत चरित्रग्रंथ ह्याच मालिकेतील एक म्हणावा लागेल.

### ५. परीक्षणात्मक चरित्र

या चरित्रामध्ये मुलभूत संशोधन केले जाते. साहित्य स्रोत आणि परिशिष्टे संदर्भग्रंथांमध्ये काटेकोरपणे मांडले असतात. वस्तुस्थितीचे पूर्णपणे विवेचन असलेल्या व सर्वांत मोठ्या कौशल्याने आणि अंतर्दृष्टीने लिहिलेले जीवन चरित्रअतिशय उपयुक्त असतात. या विद्वत्तापूर्ण चरित्रांमध्ये जीवनातील महत्वाच्या घटनांचे सूक्ष्म तपशीलवार वर्णन असते. लेस्ली मार्चंडच्या 'बायरन (१९५७)' या चरित्रात उदाहरण दिल्याप्रमाणे सुमारे १२०० पृष्ठांचा मजकूर आणि ३०० पानांच्या नोट्ससह परिपूर्ण माहिती दिली आहे.

### ६. काल्पनिक चरित्र

या श्रेणीतील पुस्तके केवळ नावालाच चरित्रात्मक साहित्याची असतात. यात साहित्याचा आविष्कार मुक्तपणे केला जातो. दृश्ये आणि संभाषणे यांची कल्पना केली जाते.अशा प्रकारची चरित्रे जवळजवळ संपूर्णपणे दुय्यम स्त्रोत व कल्पना विस्तार यावर अवलंबून असते. या प्रकाराचे उदाहरण आयर्विंग स्टोनसारख्या लेखकांनी त्याच्या 'लस्ट फॉर लाइफ' (व्हॅन गॉगचे चरित्र) आणि द ॲकोनी ॲंड द एक्स्टसी (मायकेल ॲंजेलो याचे चरित्र) या ग्रंथात दिले आहे.

## जीवनचरित्रांची ऐतिहासिक उपयुक्तता

जीवनचरित्राच्या वर्गीकरणाचा कोणताही मानक आधार अद्याप विकसित केलेला नाही. तथापि मूलभूत विभागणी एक उपयुक्त प्रारंभिक दृष्टिकोन प्रदान करते. विषयाच्या वैयक्तिक ज्ञानातून लिहिलेली चरित्रे आणि संशोधनातून लिहिलेली चरित्रे.चरित्रकार आणि त्याचा विषय यांच्यामधील महत्त्वपूर्ण नातेसंबंधामुळे निर्माण होणारे हे चरित्र सहसा दोन मुख्य चरित्रात्मक शक्तींच्या एकत्रीकरणाला सूचित करते: एकोणिसाव्या शतकातील इतिहासकार थॉमस कार्लाइल हे अशा चरित्रांना"मनुष्याचे पृथ्वीवरील तीर्थस्थान" म्हणतात. मात्र असे चरित्र लेखन करताना थेट निरीक्षण आणि वैयक्तिक कागदपत्रांचा अभ्यास गरजेचा आहे.कोणत्याही प्रकारची लिखित चरित्रपर परंपरा जपणाऱ्या बहुतेक संस्कृतींमध्ये अशा प्रकारचे चरित्रग्रंथ कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आढळतात. त्याच्या प्रकटीकरणात हे सहसा एखाद्या धार्मिक

व्यक्तीच्या शिष्यांच्या आठवणींद्वारे जसे की'बुद्धाशी संबंधित चरित्रात्मक कथा', आणि'जुन्या कराराचा काही भाग''यामधून केले जाते.

**आपली प्रगती तपासा:**

**१. जीवनचरित्राची व्याख्या करा.**

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

**२. जीवनचरित्राचे प्रकार तपासा.**

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## १३.६ सारांश

स्मृती या विषयाने अनेक इतिहासकारांना प्रभावित केले आहे. स्मृती ही व्यक्ती आणि समाज त्यांच्या इतिहासातील काही क्षण आणि घटना लक्षात ठेवण्याची निवड करण्याच्या पद्धतींना सूचित करते. अलिकडच्या वर्षांत, इतिहासकारांनी १८५७ ची क्रांती, सविनय कायदेभंगाची चळवळ, दुसरे महायुद्ध आणि भारत छोडो चळवळ यासह भूतकाळाच्या आपल्या ठशांवर स्मृतीचा कसा परिणाम झाला आहे याचे विश्लेषण केले आहे. अनेक संशोधन प्रबंध सामूहिक स्मृतीच्या कोणत्या ना कोणत्या प्रकारावर भर देतात. एखाद्याच्या जीवनातील घटनांचा साधारण लेखाजोखा चरित्रात दिला असतो. बहुतेक प्रकाशित किंवा चित्रित केलेली चरित्रे ऐतिहासिक किंवा प्रसिद्ध व्यक्तींबद्दल असतात. जीवनचरित्राची सुरुवात साधारणत: एखाद्या व्यक्तीच्या बालपणापासून होते. त्या व्यक्तीची कौटुंबिक परिस्थिती किंवा त्या व्यक्तीच्या आईवडिलांच्या जीवनातील घटना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठीत्या व्यक्तीच्या जन्मापूर्वीच कथा सांगण्याची सुरुवातही होऊ शकते.

## १३.७ प्रश्न

१. इतिहास या संकल्पनेचे विश्लेषण करा.

२. इतिहास आणि स्मृती यांतील फरकाची चर्चा करा.

३. इतिहास आणि जीवनचरित्र यांच्यातील संबंध तपासा.



munotes.in

## १३.८ संदर्भ ग्रंथ


१) लेक्चर्स ऑन द हिस्टरी ऑफ फिलॉसॉफी, खंड ३", जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल, अनुवादित इ. एस. हल्दाने, डेव्हिड मिकिक्स, ॲड. ए न्यू हॅंडबुक ऑफ लिटररी टर्म्स, २००७

२) टोव्स, जे. (२०१९). हिश्तोरीझ्म फ्रॉम रंके तटू नित्शे केंब्रिज: केंब्रिज यूनिवर्सिटी प्रेस

३) https://www.britannica.com/biography/Leopold-von-Ranke#ref291476, written by Rudolf Vierhaus, Professor and Director, Max Planck Institute for History, Göttingen, Germany.

४) Understanding the Differences Between History and Memory by Nick Sacco, Source: https://pastexplore.wordpress.com/2013/01/12/understanding-the-differences-between-history-and-memory/, Accessed on 31 August 2022

५) Historians and “Memory”, David W. Blight, This article originally appeared in issue 2.3 (April, 2002).Source: http://commonplace.online/article/historians-and-memory/Accessed on 31 August 2022

६) http:/vishwakosh.marathi.gov.in


❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# १४

# इतिहास आणि कल्पित कथा यातील फरक

**घटक रचना**

१४.० उद्दिष्टे

१४.१ प्रस्तावना

१४.२ इतिहास आणि कल्पित कथा यातील फरक

१४.३ इतिहास आणि कल्पित कथा यांच्यातील संबंध

१४.४ काल्पनिक लेखन आणि इतिहास

१४.५ इतिहासकार आणि कल्पित कथा

१४.६ इतिहास आणि कल्पित कथा एकत्र करणे

१४.७ सारांश

१४.८ प्रश्न

१४.९ संदर्भ ग्रंथ

## १४.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना इतिहास आणि कल्पित कथा यातील फरक यांची ओळख करून देणे.

२) विद्यार्थ्यांना इतिहास आणि कल्पित कथा यांच्यातील संबंध समजावून देणे.

३) काल्पनिक लेखन आणि इतिहास यांची वैशिष्ट्ये समजून घेणे.

४) इतिहास आणि कल्पित गोष्टीं यातील फरक समजणे.

## १४.१ प्रस्तावना

मागील घटकात आपण इतिहास, स्मृती आणि चरित्र यांतील संबंध व फरक पाहिला आहे. या घटकात आपण इतिहास आणि कल्पित कथा यांतील फरकाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. पुष्कळदा कल्पित कथा इतिहास म्हणून मान्यता पावतात. चरित्रकार इतिहासाशी प्रामाणिक न राहता सृजनशीलतेचा वापर करत ऐतिहासिक व्यक्तींच्या मोठ्या प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारचे लेखन मोठ्या प्रमाणात लोकांसाठी मनोरंजक असते पण ते इतिहासाशी प्रतारणा करणारे असते.इतिहास भूतकाळातील घटनांचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतो. मागील घटकात आपण चर्चा केल्याप्रमाणे लिओपोल्ड व्हॉन रांके याचे संदर्भावर आधारित इतिहास लेखन करणे महत्वाचे उद्दीष्ट होते. महाकाव्य आणि नाट्यमय कल्पित कथा सांगितलेली कथा खरोखरच घडली किंवा नाही याची पर्वा न करता त्याचे चित्रण करतात. मात्र इतिहास लेखन तसे होत नाही.लेखक केवळ वाचकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करतात. इतिहासकार मात्र तटस्थपणे नोंद घेण्याचे कार्य करतो.

## १४.२ इतिहास आणि कल्पित कथा यातील फरक

इतिहास भूतकाळातील अशाघटनांचे वर्णन करण्याचा प्रयत्न करतो ज्या खरोखर घडल्या आहेत. महाकाव्य आणि कथा एखादी बाब खरोखरच घडली किंवा नाही याची पर्वा न करता त्याचे चित्रण करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित इतिहास मात्र अचूक व निरपेक्ष वर्णन यावर आणि अर्थ लावताना पूर्णपणे तर्क आणि अनुभवावर अवलंबून असतो. हा एक पद्धतशीर अभ्यास आहे जो अनुभवजन्य स्वरूपाचा आहे. विज्ञानाने घालून दिलेल्या पायावर एक सर्वसमावेशक जागतिक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न इतिहास-तत्त्वज्ञानाने केला आहे.कवी आणि कलाकार वैयक्तिक गोष्टींचे आणि विशिष्ट घटनांचे चित्रण हे त्यांच्या कलात्मक अविष्काराचे केवळ एक साधन आहे असे मानतात. अस्सल छायाचित्र आणि कलाकाराने रेखाटलेले चित्र यात मूलभूत फरक आहे. साहित्य आणि कलाकृतीतील त्यातील नमूद केलेली स्थिती म्हणजे वस्तुस्थितीचे निदर्शक नव्हे.

इतिहास आणि कल्पित गोष्टींमध्ये एकसाम्य आहे ते म्हणजे दोन्ही मानवी मनाशी संबंधित ज्ञानावर आधारित आहेत. मानवी मूल्यमापनाची विशिष्ट समज आणि त्यांच्या नैसर्गिक आणि सामाजिक वातावरणाच्या आव्हानाला लोक कशा प्रकारे प्रतिसाद देतात याच अभ्यास करणे ही त्यांची पद्धत आहे. पण नंतर त्यांचे मार्ग वेगळे होतात. इतिहासकाराला जे सांगायचे आहे ते त्याच्या अहवालात पूर्णपणे व्यक्त झाले आहे. त्याच्या लेखनातून तो वाचकांशी संवाद साधतो. त्याचा संदेश सोपा आणि सुस्पष्ट असतो. सक्षम वाचकांना समजण्याजोगे म्हणून त्यांच्या पुस्तकातील आशयाच्या पलीकडे जाईल असे काहीही नसते.कधीही न घडलेल्या घटनांचे चित्रण करण्यासाठी कल्पित कथा मुक्त असते. लोक म्हणतात त्याप्रमाणे लेखक एक काल्पनिक कथा निर्माण करतो. तो वास्तवापासून वेगळे चित्रण करू शकतो. इतिहासकाराच्या कार्याला लागू होणाऱ्या सत्य, सत्यता आणि विश्वासार्हता या परीक्षा त्याच्या कार्याला लागू होत नाहीत. त्याच्या स्त्रोतांवर बाह्य आणि अंतर्गत टीका करण्याची गरज नाही.

इतिहास लेखनात लेखकाचे स्वातंत्र्य मर्यादित आहे. संबंधित गोष्टी खऱ्या अर्थाने घडलेल्या हव्यात. ही कादंबरी आणि नाटकांची गरज नाही. पण कथा व नाटक लेखकाला काल्पनिक व्यक्ती आणि कथानके निर्माण करण्याची मुभा आहे. एकच विशिष्ट व्यक्ती हा इतिहासकाराच्या आवडीचा विषय असत. तो मुख्यतः त्याच्या कृतींद्वारे अनेक लोकांवर प्रभाव टाकतो. इतिहासकार सर्वसामान्य लोकांची पर्वा करत नाही. पण कल्पित कथा लिहिणारे मात्र सर्वसामान्य लोकांचे चित्रण व त्यांच्या भावना यांचे चित्रण करत असतात.

एमिल झोला यांच्या मते ही कादंबरी एक प्रकारचे वर्णनात्मक अर्थशास्त्र आणि सामाजिक मानसशास्त्र आहे जे विशिष्ट परिस्थितीवर आधारित असते. इतर लेखकांनी याही पुढे जाऊन असे प्रतिपादन केले की व्यक्तींचेच नाही तर वर्ग, राष्ट्रे आणि वंश यांचेही भवितव्य कादंबरी आणि नाटकांमध्ये आले पाहिजे. तर्कशास्त्र आणिइतर शास्त्रांचे सिद्धांत आणि नैसर्गिक शास्त्रांनी प्रस्थापित केलेली प्रायोगिक तथ्ये या गोष्टी त्यांच्या लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचा संदर्भ न घेता पाहता येतात. युक्लिडियन भूमितीच्या समस्यांना तोंड देतानाआपण युक्लिड या माणसाशी संबंधित इतिहास बघत नाही आणि तो होता की नाही या बाबत फारसा विचार करत नाही. मात्र त्याच्या सिद्धांताची भूमितीतील उपयुक्तता ध्यानात घेतो. लेखकाच्या मनाचा प्रकटीकरण म्हणून कादंबरी किंवा नाटकाकडे पाहिले जातेते निश्चितच बरोबर आहे.

कवी नेहमी स्वत:बद्दल लिहितो व नेहमी स्वत:च्या विचारांचे विश्लेषण करतो पण इतिहासकार समोर आलेल्या पुराव्यांच्या आधारे समाजाचे व घटकांचे वर्णन करतो. त्याने स्वत:चे प्रकटीकरण करणे अपेक्षित नाही.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहासाची व्याख्या करा.**

___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________

**२. इतिहास आणि कथा यांतील फरक तपासा.**

___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________
___________________________________________________________

## १४.३ इतिहास आणि कल्पित कथा यांच्यातील संबंध

इतिहास आणि कल्पित गोष्टींमध्ये काही साम्य आहे परंतु बऱ्याच अंशी ते एकमेकांशी सहजपणे जुळत नाहीत. वास्तविकतेचा अनुभव देणे व ते वाचकांसाठी उपलब्ध करुन देणे हे या दोघांचे उद्दीष्ट आहे. इतिहास सत्याच्या शक्य तितक्या जवळ येण्याचा प्रयत्न करतो परंतु कल्पित कथा सत्यकथनाबद्दल फारशा आशावादी नसतात. त्यांच्या प्रेरणा आणि ज्ञानाचे स्रोत देखील भिन्न आहेत. इतिहास हा संशोधनावर आधारलेला असतो, तर कल्पित कथाकल्पनेवर  वप्रसंगी वैयक्तिक स्मृतीवर लिहिलेली असते.

ऐतिहासिक कल्पित कथा कथेची मांडणी म्हणून वास्तविक ऐतिहासिक कथेच्या मांडणीची गरज म्हणून भूतकाळाचा वापर करते परंतु ती सर्वसाधारणपणे साहित्यकृतींना लागू होणाऱ्या भावभावनांवर आधारित असते. कथानकाची विश्वासार्हता वाढवण्यासाठी त्यांच्यामागे असलेल्या ऐतिहासिक भूतकाळाचा उल्लेख करण्याकडे कादंबऱ्यांच्या लेखकांमध्ये तीव्र प्रवृत्ती असते. इतिहासकारांचा आधीपासून कल्पित कथा लिहिण्यापासून दूर राहण्याकडे कल असतो.पण सध्या बदल होत आहेत. अलिकडच्या वर्षांत इतिहासकार ऐतिहासिक कादंबरीकारांच्या पंक्तीत सामील झाले आहेत आणि बहुतेकदा त्यांच्या कादंबरी लेखनामुळे मोठ्या संख्येने ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहेत. कादंबरीकार हिलरी मँटेल यांनी म्हटल्याप्रमाणे, 'इतिहासाच्या ग्रंथांपेक्षा कल्पित कथा सामान्यतः अधिक मन वळवणारी असते'.

ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या 'भूतकाळातील कल्पित संच' अशी केली जाते. त्या व्याख्येची समस्या अशी आहे की ती इतकी विस्तृत आहे की या व्याख्येमध्ये काहीही बसू शकते. अशी व्यापक व्याख्या अर्थहीन होण्याचा धोका आहे.परंतु ऐतिहासिक कादंबरी ही कल्पनाशक्ती किंवा वैयक्तिक स्मृतीपेक्षा काळाच्या अंतराच्या दृष्टीने परिभाषित केलेल्या कथेपेक्षा काहीतरी अधिक अशीअसते. याचा उद्देश अस्सल ऐतिहासिक वास्तविकता पुन्हा तयार करणे आहे हाअसू शकतो. ऐतिहासिक कादंबरीचे एक अद्वितीय मुख्य वैशिष्ट्य म्हणजे तपशीलाकडे लक्ष देणे. उदा.लोक कोणते कपडे घातले होते, ते काय खात होते आणि कसे राहत होते. भौतिक सभोवतालचा परिसर, अगदी रस्त्यावरील वास, हवामान, वाहतुकीची साधने आणि प्रवासासाठी लागणारा वेळ, असंख्य सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा उल्लेख, भाषणातील शब्दसंग्रह आणि विचार करण्याची पद्धत यांचा यात समावेश असतो. ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वाचक तपशिलाच्या बाबतीत वारंवार वाचन करतात.

ऐतिहासिक संशोधनाच्या तुलनेत ऐतिहासिक कादंबरी ही विविध उद्दीष्टे आणि कार्ये असलेले दीर्घ कल्पित कथा आहेत. लघुकथेच्या किंवा कादंबरीचा एकूण हेतू मनोरंजन आणि प्रेरणा देणे, मनोरंजक करणे आणि भावना जागृत करणे हा आहे. ऐतिहासिक कादंबरीच्या लेखकाला कल्पित कथांच्या मागणीमुळे ऐतिहासिक वास्तवाबरोबर तडजोड करावी लागते.कालमर्यादा संकुचित केल्या जातात, अस्तित्वात असलेल्या पुराव्यांवरून कृती आणि प्रतिक्रियांचे विस्तारीकरण केले जाते, गरज पडल्यास अधिक नाट्य जोडले जाते. ऐतिहासिक कादंबरी सत्यता आणि कल्पित कथा यांच्यातील संतुलनावर अवलंबून असते.

कथेमध्ये ऐतिहासिक घटनेचे स्थान कधी कधी बदललेले असते. हे कल्पित कथेला पार्श्वभूमी म्हणून काम करू शकते.अशा प्रकारे स्वातंत्र्य नाट्यमय कृतीसाठी एक मनोरंजक चौकट प्रदान करते. भूतकाळातील वास्तवाचे चित्रण करणे, कथा वाचकांना अधिक आकर्षक करण्यासाठी काल्पनिक घटकांची जोड देणेहाही त्यामागचा मुख्य उद्देश असू शकतो.वर्तमान जीवनाला पर्यायी दृष्टीकोन देऊन आजच्या जगावर भाष्य करणे हे आणखी एक उद्दिष्ट असू शकते.

ऐतिहासिक कादंबरीचा इतिहासाशी संबध नसतो.ऐतिहासिक कादंबरीची संकल्पना लोकांना चुकीची माहिती देण्याच्या वापरली जावू शकते.ही प्रथा खेदाने अधिकाधिक लोकप्रिय होताना दिसते. दरम्यानच्या काळात ऐतिहासिक कादंबरीचा प्रकार अनेक दिशांनी विस्तारला.काल्पनिक चरित्र, ऐतिहासिक रहस्य, ऐतिहासिक प्रेमकथा, जहाज लुटेरे कथा तसेच तरुण प्रौढ आणि मुलांच्या आवडीनिवडीशी एकरूप असलेल्या स्वतंत्र शाखांचा समावेश असलेला हा साहित्य प्रकार प्रसिद्ध आहे.

सर्वसामान्य जनतेने मोठ्या प्रमाणावर कौतुक करूनही ऐतिहासिक कादंबरीला तितकेसे महत्वाचे स्थान नाही.समीक्षकांच्या दृष्टीने या कादंबऱ्या शैली आणि नाटकाच्या बाबतीत अस्सल वाङ्मयीन कार्यापेक्षा कमी चांगल्या प्रकारे लिहिल्या गेल्या असे मानले जाते. इतिहास आणि कल्पित कथांवरील इंटरनेट लेखांच्या सध्याच्या वास्तवावर नजर टाकल्यास असे दिसून येते की अशा लेखांची लोकप्रियता वाढत असूनही अलिकडच्या वर्षांत ऐतिहासिक कादंबरीची प्रतिष्ठा सुधारण्यासाठी फारसे काही झाले नाही.

munotes.in

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहास आणि कल्पित कथा यांच्यातील संबंधांची चर्चा करा.**

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

**२. ऐतिहासिक कादंबरीवरील टीका अभ्यासा.**

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

## १४.४ काल्पनिक लेखन आणि इतिहास

इतिहास जर योग्य प्रकारे हाताळला गेला असेल तर चांगल्या संकल्पनांसाठी मनोरंजक सामग्रीचा अमर्याद खजिना प्रदान करतो. इंग्रजीत शतकानुशतके अशा प्रदीर्घ साहित्य परंपरेची उदाहरणे आहेत. डब्ल्यू. सॉमरसेट मॉम (१८७४-१९६५) हे आतापर्यंतचे इंग्रजी लघुकथा लेखकांपैकी व्यावसायिकदृष्ट्या सर्वात यशस्वी लेखक म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांची ऐतिहासिक कथा १९२० च्या दशकात आग्नेय आशियातील ब्रिटिश वसाहतींमधील विस्तृत प्रवासावर आधारित होती. परिणामी वसाहतवादाच्या उत्तरार्धात मलेशियात राहणाऱ्या आणि काम करणाऱ्या इंग्रज स्थलांतरितांमध्ये या लघुकथा मांडण्यात आल्या आहेत. त्यांच्या लघुकथा दोन खंडांत प्रसिद्ध झाल्या.

ब्रिटिशांमधील उद्धटपणा आणि ढोंगीपणा उघड करण्यासाठी लेखक उत्सुक होता. सर्व पात्रे काल्पनिक आहेत असा त्याने असा दावा केला असला तरी लघुकथांचे दोन्ही संग्रह मलायातील ब्रिटिश लोकांनी अत्यंत नकारात्मकतेने स्वीकारले.त्यांनी मॉमवर आरोप केला की त्याने फायद्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला आहे. व्यापक दृष्टिकोनातून पाहिल्या समॉमच्या लघुकथा वसाहतवादी समाजाच्या अंगभूत वैशिष्ट्यांबद्दल अत्यंत माहितीपूर्ण आहेत.

हेला हास (१९१८-२०११) या डच कादंबरीकार लेखिकेच्यालेखनात वसाहतवादाचा संदर्भ महत्त्वाची भूमिका बजावतो.तिने संपूर्ण बालपण तत्कालीन नेदरलँड्च्या वसाहतीत व्यतीत केले होते. ओरोएग (१९४८) या तिच्या पहिल्या कादंबरीत तिने १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धातील इंडोनेशियन क्रांतीचा वापर डच-इंडोनेशियन संघर्षात परस्परविरोधी बाजूंवर येऊन ठेपलेल्या दोन मुलांमधील एक डच दुसरा इंडोनेशियन यांच्यातील मैत्रीच्या हृदयस्पर्शी

munotes.in

कथेचा आधार म्हणून केला आहे.इंडोनेशियातील डच वसाहतवादाचाच्या पार्श्वभूमीवर इंडोनेशियामध्ये विकसित होत असलेल्या विलक्षण सामाजिक संबंधांबद्दल ही कादंबरी अद्वितीय अंतर्दृष्टी प्रदान करते.

ओरोएगनंतर कित्येक दशकांनंतर हेला हासे हिने'द टी लॉर्ड्स' (२०१०) या कादंबरीद्वारे १८७० आणि १८८० च्या दशकात पश्चिम जावामध्ये चहाचा मळा चालविणारे बागायतदार रुडॉल्फ केरखोवेन यांच्या आयुष्याचा लेखाजोखा मांडला आहे. जतन केलेली पत्रे आणि इतर प्राथमिक दस्तऐवजीकरणावर आधारित ही एक अस्सल ऐतिहासिक कादंबरी आहे. यात कोणत्याही काल्पनिक पात्रांचा समावेश नाही.

इंडोनेशियन अग्रगण्य ऐतिहासिक कादंबरीकार प्रमोदीया अनंता टोअर (१९२५-२००६) हे साहित्याच्या नोबेल पुरस्कारासाठी नामांकित झालेले एकमेव इंडोनेशियन आहेत. पूर्व इंडोनेशियातील बुरू बेटावर तुरुंगवासाच्या काळात लिहिलेले 'बुरू टेट्रालॉजी' हे त्यांचे सर्वात प्रसिद्ध व ऐतिहासिक कार्य होय. अर्थ ऑफ मॅनकाइंड, चाइल्ड ऑफ ऑल नेशन्स, स्टेप्स अँड हाऊस ऑफ ग्लास (१९८०- १९८८) या चार ऐतिहासिक कादंबऱ्यांची ही मालिका सदर केली. विशेषत: सुरुवातीच्या कादंबऱ्यांमधून आपल्याला देशातील ग्रामीण भागातील गरीब लोक व त्यांच्यातील गुंतागुंतीच्या सामाजिक संबंधांची तीव्र जाणीव करून दिली आहे.

प्रमोद्याच्या शिष्यांपैकी एक्का कुर्नियावान (जन्म: १९७५) यांनी आपल्या कथाकृतीतही एका ऐतिहासिक संदर्भाचा वापर केला. त्याचे सर्वात प्रसिद्ध कार्य, इंग्रजीत 'ब्युटी इज अ वुंड' या नावाने भाषांतरित केले गेले आहे.याशिवाय इंडोनेशियन इतिहासातील विविध प्रकारच्या हिंसक व्यक्तींचे, विशेषत: क्रूर लष्करी माणूस, धर्मांध मार्क्सवादी आणि गुन्हेगारी ठग यांचे चित्रणत्यांनी केले.करता येईल.

हिलरी मँटेल (जन्म १९५२) 'वुल्फ हॉल' या कादंबरीने प्रसिद्ध झाल्या. त्यासाठी तिला मॅन बुकर पुरस्कार मिळाला. आठव्या हेन्रीचा मंत्री थॉमस क्रॉमवेल याचे हे काल्पनिक चरित्र आहे.या कादंबरीत गैर-काल्पनिक ऐतिहासिक ग्रंथांमध्ये परंपरेने दिलेल्या गोष्टींपेक्षा वादग्रस्त मुत्सद्दी व्यक्तीबद्दल अधिक सहानुभूतीपूर्ण छाप दिसून येते. शिवाय सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमधील जीवन कसे होते याचे स्पष्ट वर्णन वुल्फ हॉल वाचकांना देतो.

ब्रिटिश कादंबरीकारांमधील आणखी एक बहुपसंतीचा काळ म्हणजे एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्धज्यात नंतरच्या चौथ्या जॉर्जच्या अधिपत्याखालील काळ आणि व्हिक्टोरियन युगाची सुरुवात या दोन्हींचा समावेश आहे. डेझी गुडविन (जन्म: १९६१) या दूरचित्रवाणी व कला निर्मात्याने केंब्रिजमधून पदवी घेतली होती. व्हिक्टोरिया या तरुण राणीकडून प्रेरणा घेऊन त्यानेव्हिक्टोरिया (२०१६) कादंबरी लिहिली.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहासाचा वापर करूनलेखन करणाऱ्या लेखकांची काही उदाहरणांसह चर्चा करा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________



munotes.in

________________________________________________
________________________________________________
________________________________________________

**२. काल्पनिक लेखक इतिहासाचे अचूक चित्रण करतात का?**

________________________________________________
________________________________________________
________________________________________________
________________________________________________
________________________________________________
________________________________________________

## १४.५ इतिहासकार आणि कल्पित कथा

एक काळ असा होता की, व्यावसायिक इतिहासकार आपल्या कथांसाठी ऐतिहासिक साहित्याचा वापर करणाऱ्या कादंबरीकारांकडे तिरस्काराने तुच्छतेने पाहत होते.पण आता काळ बदलला आहे आणि आजकाल लोक इतिहास आणि कल्पित कथा यांची सांगड घालत आहेत.

लिओनार्ड ब्लसे (जन्म: १९४६) हे नेदरलँड्समधील लिडेन विद्यापीठात परदेशी इतिहासाचे प्राध्यापक आहेत, जे आग्नेय आशियातील चिनी लोकांच्या इतिहासात पारंगत आहेत. सतराव्या आणि अठराव्या शतकात डच ईस्ट इंडिया कंपनीवर त्यांनी पुस्तक प्रकाशित केले. त्यांची एकमेव ऐतिहासिक कथाकृती म्हणजे 'बिटर बॉन्ड्स : अ कोलोनियल डिव्होर्स ड्रामा ऑफ द सेवेन्तीन सेन्चुरी'ही कादंबरी होय.पुरस्कार विजेती इंग्रजी आवृत्ती २००२ मध्ये प्रकाशित झाली होती परंतु त्यापूर्वी १९९८ मध्ये डच-भाषेत ती लिहिली गेली होती. सतराव्या शतकातील स्त्रियांच्या कनिष्ठ कायदेशीर व सामाजिक स्थानाचा विचार करता या कथेतील मुख्य पात्र कॉर्नेलिया व्हॅन निजेनरोडेला चढ-उताराचा संघर्ष सहन करावा लागतो. ही कादंबरी अभिलेखीय संशोधनावर आधारित आहे.सतराव्या शतकातील डच ईस्ट इंडिया कंपनीच्या महानगरातील जीवन कसे होते याचे स्पष्ट चित्रण यात करण्यात आले आहे.

ॲलिसन वीअर (जन्म: १९५१) ह्याइथास कादंबरीकार म्हणून म्हणून विख्यात आहेत. त्यांनी कथांच्या असंख्य कलाकृती तसेच सात ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित केल्या आहेत. त्यांनी ऐतिहासिक चरित्रग्रंथात विशेषत्व प्राप्त केले.विशेषत: ब्रिटिश इतिहासाला महत्त्व असलेल्या स्त्रियांविषयीच्या लेखनात विशेष प्राविण्य प्राप्त केले. याशिवाय तिने ब्रिटिश राजघराण्यांवर आणि आठव्या हेन्रीच्या सहा पत्नींवर लेखन केले.

सौल डेव्हिड (जन्म १९६६) हे बकिंगहॅम विद्यापीठात लष्करी इतिहासाचे प्राध्यापक आणि ब्रिटिश दूरचित्रवाणीवरील लष्करी व साम्राज्यविषयक विषयांवरील कार्यक्रमांचे लोकप्रिय प्रस्तुतकर्ते आहेत. त्यांनी लष्करी व्यक्तिमत्त्वे आणि विशिष्ट लष्करी घटना,विशेषत: १८५७ मधील भारतीय उठाव आणि १९४३ मध्ये मित्रराष्ट्रांनी इटलीवर केलेले आक्रमण यावर पुस्तके प्रकाशित केली आहेत.ऐतिहासिक कथालेखक म्हणून त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात २००७ मध्ये झुलू हार्ट या कादंबरीने झाली. दक्षिण आफ्रिकेतील युद्धाला सुरुवात झाली

होती. मिश्र आयरिश व आफ्रिकन वंशाचा युवा सैनिक जॉर्ज हार्ट यांच्याविषयीच्या कादंबऱ्यांच्या मालिकेतील झुलू हार्ट हा पहिला खंड होय.हार्ट ऑफ एम्पायर (२०१०) या त्याच्या कादंबरीत नायक जॉर्ज हार्ट दुसऱ्या अँग्लो-अफगाण युद्धात (१८७८-१८८२) सहभागी झाला आहे. या दोन्ही कादंबऱ्यांचे कथानक लष्करी वस्तुस्थितीच्या संश्लेषणावर तर कधी रोमँटिक कल्पनेवर आधारित आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया संमिश्र होत्या परंतु टीकाकार लष्करी तपशिलाचे प्रमाण आणि अचूकता पाहून प्रभावित झाले आहेत.

सायमन सेबाग माँटेफिओर (जन्म: १९६५) यांनी केंब्रिज विद्यापीठातून इतिहासात पीएच.डी. करून कॅथरीन द ग्रेट आणि स्टॅलिन अशा वैविध्यपूर्ण व्यक्तींवर लेखन करून त्याने रशियन इतिहासात एक विशेष प्राविण्य विकसित केले. दरम्यानच्या काळात ब्रिटिश दूरचित्रवाणीवरील ऐतिहासिक कार्यक्रमांचे प्रशंसनीय निवेदक म्हणून त्यांना लोकप्रियता मिळाली. साशेंका (२००८) या कादंबरीत १९१७ मध्ये रशियन राज्यक्रांतीच्या अगदी आधी आणि त्यानंतरच्या काळात एका तरुणीच्या भवितव्यावर भर देण्यात आला आहे. हे ऐतिहासिक तपशीलांसह भावना आणि रहस्य यांनी भरलेले आहे. कादंबरीला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. क्रांतीच्या काळात आणि स्टॅलिनच्या कठोर राजवटीत वसलेल्या नाट्यमय जीवनकथांच्या त्रयीचा हा पहिला खंड होता.वन नाईट इन विंटर (२०१३) आणि रेड स्काय अॅट नून (२०१७) अशी या पुस्तकांची नवे आहेत. या तिन्ही कादंबऱ्या मिळून 'मॉस्को ट्रायलॉजी' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. समीक्षकांनी ऐतिहासिक तपशिलातील अचूकतेची प्रशंसा केली.

इयान मॉर्टिमर (जन्म: १९६७) हे ब्रिटिश मध्ययुगीन व प्रारंभिक आधुनिक इतिहासाचे तज्ज्ञ आहेत. त्याने एडवर्ड तिसरा आणि हेन्री चौथा यांची चरित्रे प्रकाशित केली आणि ‘द टाइम ट्रॅव्हलर्स गाईड टू मिडियव्हल इंग्लंड’ (२००८) सह सामान्य श्रोत्यांपर्यंत पोहोचला. अलिकडच्या वर्षांत जेम्स फॉरेस्टर या टोपणनावाचा वापर करून त्याने ऐतिहासिक कादंबरी लिहिली आहे.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहासकारांचा कल्पित गोष्टींकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन काय आहे?**

______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________

**२. कादंबरीकार बनलेल्या इतिहासकारांची काही उदाहरणे तपासा.**

______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________

munotes.in

## १४.६ इतिहास आणि कल्पित कथा एकत्र करणे

ऐतिहासिक कथा लिहिणे सोपी बाब नाही. ज्यामध्ये कथानक 'वाचकांच्या समकालीन संवेदना आणि ऐतिहासिक अचूकता यांच्यात' संतुलन साधावे लागते. ऐतिहासिक कथा लिहिणारा एक शास्त्र म्हणून इतिहासाचे मानदंड आणि कल्पित कथांच्या कलात्मक महत्त्वाकांक्षा यांच्यात योग्य तो समतोल साधण्याचा प्रयत्न सातत्याने करीत असतो. जर्मन इतिहासकार लिओपोल्ड व्हॅन राँके (१७९५-१८८६) यांनी'मुळात काय घडले आहे' याचा शोध घेणे हे इतिहासकाराचे कार्य आहे असे जाहीर केल्यानंतर इतिहास लेखन शास्त्राने बरीच मजल मारली आहे.

ऐतिहासिक वृत्तान्त हा व्याख्येनुसार भूतकाळातील वास्तवाचे आकलन आहे. अनुभव जन्य वस्तुस्थितीचा आधार असला तरी तो स्वतःच एक आख्यायिका बनून राहतो. वास्तवाची कोणती धारणा काल्पनिक स्वरूपात लागू पडते याचे भान ऐतिहासिक कथा लेखकाने ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यावसायिक इतिहासकारांनी जसे करणे अपेक्षित आहे, तसेच लेखकाने ही ऐतिहासिक स्त्रोतांकडे गंभीर नजरेने पाहण्याची गरज आहे. कथेत ऐतिहासिक तपशील किती असावा ? जेव्हा वाचकांना ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती नसते तेव्हा वाचकांना निराशा वाटेल किंवा कंटाळवाणे होईल. ऐतिहासिक घटना आणि व्यक्तिमत्त्वे आणि कथेत चित्रित केलेल्या काळाबद्दल वाचकांना कितपत माहिती असावी अशी अपेक्षा केली जाऊ शकते, हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे.लेखकाचे इतिहासाबद्दलचे विस्तृत ज्ञान प्रदर्शित करणे महत्वाचे नसून आकर्षक भूतकाळात वाचकाला बुडविणे हा लेखकाचा हेतू असतो. तरीही ऐतिहासिक तपशिलातील अचूकतेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. ऐतिहासिक व्यक्ती वाचकांना किती परिचित आहेत आणि कथानकात त्यांचे कार्य काय आहे यावर बरेच काही अवलंबून आहे. एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीबद्दलच्या पूर्वीच्या व्यापक ज्ञानामुळे त्या व्यक्तीचे चित्रण करताना लेखकाला उपलब्ध असलेल्या स्वातंत्र्याचे प्रमाण कमी होते.

इतिहासकाराने प्रत्येक वेळी मुलभूत विचारांशी प्रामाणिक राहिले पाहिजे.हे केवळ पत्रे आणि डायरीसारख्या जतन केलेल्या कागदपत्रांच्या काळजीपूर्वक आणि गंभीर अभ्यासाद्वारे साध्य केले जावू शकते. ऐतिहासिक कल्पित कथा एक विशिष्ट ऐतिहासिक वास्तव व्यक्त करते जे अपरिहार्यपणे वास्तविक किंवा कथित ऐतिहासिक वास्तविकतेपासून विचलित होते. कथेला कल्पनेच्या स्वरूपात बसविण्यासाठी लेखकाला ऐतिहासिक तथ्यांसह स्वातंत्र्य घेण्यास भाग पाडले गेले आहे.शौल डेव्हिड ऐतिहासिक कादंबरीकारांना अशा प्रकारच्या स्वातंत्र्याचा वापर करताना प्रतिबंधात्मक असण्याचे आवाहन करतो. या मतानुसारही कथा ऐतिहासिक सत्याच्या अगदी जवळ राहिली पाहिजे. ऐतिहासिक कथांची भरभराट आकर्षक कथांच्या आधारे होते.

मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांसाठी असलेल्या दूरचित्रवाणी मालिका सध्या इतिहास लोकप्रिय करण्यासाठी आणि ऐतिहासिक कथांच्या शैलीला पाठिंबा देण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. ऐतिहासिक घटना आणि व्यक्ती जेव्हा लेखकाच्या वर्णनातून प्राप्त होण्याऐवजी पडद्यावर प्रदर्शित होतात, तेव्हा ऐतिहासिक वस्तुस्थितीच्या अचूकतेचा मुद्दा ऐरणीवर येतो. याचे एक कुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे व्हायकिंग्ज ही दूरचित्रवाणी मालिका

ब्रिटनच्या हिस्ट्री चॅनेलने प्रसारित केली. टेलिव्हिजनसाठी इतर प्रसिद्ध रूपांतरांमध्ये बीबीसीची मिनी-सिरीज वुल्फ हॉल २०१५ मध्ये, फ्रेंच-कॅनेडियन संयुक्त उपक्रम व्हर्साय्स सह दोन पूर्ण हंगाम (२०१५-१७) आणि नेटफ्लिक्स प्रॉडक्शन द क्राउन, आतापर्यंत दोन पूर्ण हंगामांसह (२०१६-१७) यांचा समावेश आहे. या विस्तृत कथानकाचे खरे सार हे दोन भाऊ, चौदावा लुई, भाऊ व राजा आणि ऑर्लीयन्सचा फिलिप, एकुलता एक भाऊ आणि सतराव्या शतकातील सर्वात प्रसिद्ध उघडपणे समलिंगी पुरुष यांच्यातील नातेसंबंधात दडलेले आहे. हे अत्यंत गुंतागुंतीचे नाते नाटकासाठी मोठ्या भावनेने चित्रित केले आहे. तरीही ऐतिहासिक वास्तवात काही अनावश्यक बदल करण्यात आले.

द क्राउन या मालिकेचे पहिले दोन हंगाम एलिझाबेथ द्वितीय यांना १९४७ मध्ये प्रिन्स फिलिप यांच्याशी लग्न झाल्यापासून ते १९६० च्या दशकाच्या मध्यापर्यंत घटना दर्शवतात. द क्राउनमध्ये चर्चिलचे सादरीकरण खूप यशस्वी झाले होते. ऐतिहासिक कथांचा निर्माता लिखित स्वरूपात किंवा पडद्यासाठी, ऐतिहासिक तपशिलात अचूकतेचा मुद्दा हाताळण्याच्या संदर्भात वेगवेगळ्या दृष्टिकोनांपैकी एकाची निवड करू शकतो.सर्वात सावध गोष्ट म्हणजे एखाद्या ऐतिहासिक घटनेचे किंवा ऐतिहासिक व्यक्तीचे निरीक्षण करणाऱ्या काल्पनिक व्यक्तीची ओळख करून देणे. यापुढची एक पायरी म्हणजे प्रत्यक्ष ऐतिहासिक व्यक्तीच्या अंतरंगात पाऊल टाकणं आणि त्याच्या विचारांची व भावनांची मांडणी करणे.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहास आणि कल्पित कथा यांची सांगड कशा प्रकारे घातली आहे याची चर्चा करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १४.७ सारांश

महाकाव्य आणि नाट्यमय कल्पित कथा सांगितलेली कथा खरोखरच घडली किंवा नाही याची पर्वा न करता त्याचे चित्रण करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित इतिहास मात्र विश्वाचे वर्णन आणि अर्थ लावताना पूर्णपणे तर्क आणि अनुभवावर अवलंबून असते.इतिहास लेखनात लेखकाचे स्वातंत्र्य मर्यादित आहे. संबंधित गोष्टी खऱ्या अर्थाने घडलेल्या हव्यात.ही कादंबरी आणि नाटकांची गरज नाही. पण कथा व नाटक लेखकाला काल्पनिक व्यक्ती आणि कथानके निर्माण करण्याची मुभा आहे.इतिहासाप्रमाणे कल्पित कथा ही अमूर्त किंवा सामान्य माणसातील सामान्य माणसाशी किंवा माणसाशी निगडित नसून वैयक्तिक घटनांशी निगडित असते. मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांसाठी असलेल्या महागड्या दूरचित्रवाणी मालिका सध्या इतिहास लोकप्रिय करण्यासाठी आणि ऐतिहासिक कथांच्या शैलीला पाठिंबा देण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

## १४.८ प्रश्न

१. इतिहास या संकल्पनेचे विश्लेषण करा.

२. कल्पित कथालेखनाच्या दृष्टिकोनाची चर्चा करा.

३. इतिहास आणि कल्पित कथा यांतील फरक तपासा.

## १४.९ संदर्भ ग्रंथ

१) लेक्चर्स ऑन द हिस्टरी ऑफ फिलॉसॉफी, खंड३", जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल, अनुवादित इ. एस. हल्दाने,

२) डेव्हिड मिकिक्स, ॲड. ए न्यू हँडबुक ऑफ लिटररी टर्म्स, २००७

३) टोव्स, जे. (२०१९). हिश्तोरीझ्म फ्रॉमरंकेतटूनित्शे केंब्रिज: केंब्रिज यूनिवर्सिटी प्रेस

४) Lectures on the History of Philosophy, Volume 3", By Georg Wilhelm Friedrich Hegel, Translated by E. S. Haldane and Frances H. Simson, M. A., *University of Nebraska Press*.

५) https://www.britannica.com/biography/Leopold-von-Ranke#ref291476, written by Rudolf Vierhaus, Professor and Director, Max Planck Institute for History, Göttingen, Germany.

६) https://mises.org/library/history-and-fiction, History and Fiction [Excerpted from chapter 12 of *Theory and History*.] by Ludwig Von Mises. Accessed on 5th September 2022.

७) History and Fiction: An Uneasy Marriage? J. Thomas Lindblad Leiden University, the Netherlands/UniversitasGadjahMada, Indonesia

८) https://www.researchgate.net/ publication/ 326094886_ History_and_ Fiction_An_Uneasy_Marriage /link/ 5b382b314585150d23e98b4c/download, Accessed on 5th September 2022

❄❄❄❄❄❄❄

# १५

# इतिहास आणि पुरातनवस्तू शास्त्र (अँटीक्वेरियनिझम) यातील फरक

**घटक रचना**


१५.० उद्दिष्टे

१५.१ प्रस्तावना

१५.२ इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र (अँटीक्वेरियनिझम) फरक

१५.३ इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र यांच्यातील संबंध

१५.४ पुरातनवस्तूशास्त्राचा इतिहास

१५.५ इतिहासकार आणि पुरातन वस्तू

१५.६ सारांश

१५.७ प्रश्न

१५.८ संदर्भ ग्रंथ


## १५.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांना ऐतिहासिक संशोधनातील स्त्रोतांची ओळख करून देणे.

२) इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र (अँटीक्वेरियनिझम) फरक समजावून देणे.

३) पुरातनवस्तूशास्त्र व त्याचे घटक याची माहिती देणे.

४) इतिहास आणि पुरातन वस्तू शास्त्र (अँटीक्वेरियनिझम) बद्दल योग्य आकलन करून देणे.

## १५.१ प्रस्तावना

मागील एककात आपण इतिहास आणि कल्पित कथा यांतील संबंध व फरक पाहिलेला आहे. या घटकात आपण इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र(अँटीक्वेरियनिझम) यांतील फरकाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करणार आहोत. अँटिक्वेरियन किंवा अँटिक्वेरी (पुरातनवस्तूशास्त्रज्ञ) हा एक प्राचीन वस्तू किंवा भूतकाळातील गोष्टींचा अभ्यासक असतो.विशेष म्हणजे प्राचीन कलाकृती, पुरातत्त्वीय व ऐतिहासिक स्थळे किंवा ऐतिहासिक अभिलेखागार व हस्तलिखिते यांकडे विशेष लक्ष देऊन इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी ही संज्ञा वापरली जाते. अँटिक्वेरियनिझमचा डोलारा हा भूतकाळाच्या अनुभवजन्य पुराव्यांवर केंद्रित आहे.

munotes.in

## १५.२ इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र (अँटीक्वेरियनिझम) फरक

पुरातनवस्तूशास्त्र आणि इतिहास यांचा नेहमीच जवळचा संबंध राहिला आहे कारण त्या दोन्ही विद्याशाखा प्रामुख्याने भूतकाळाच्या अभ्यासाशी निगडित आहेत. इतिहासकार मात्र सर्वसाधारणपणे 'अँटिक्वेरिअन' हा शब्द दुर्मिळ व महत्वाचा ऐतिहासिक ठेव या अर्थाने वापरत असतात. एखाद्या पुस्तकाचे वर्णन 'अँटिक्वेरियन' असे केले तर त्याचा अर्थ असा होतो की ते तपशिलाने भरलेले आहे.परंतु ते विस्तृत तपशील पाहण्यात सर्वसामान्यांना फारसा रस नसतो.पुष्कळदा असे गृहीत धरले जाते कीहा विषय अस्पष्ट आणिअवघड आहे.विशेषज्ञ वगळता इतर कोणालाही त्यात फारसा रस नसतो. पुरातनवस्तूशास्त्रज्ञ इतिहास विश्लेषण समजून घेण्याचा आणि स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो.तो सर्वसाधारण आणि विशिष्ट वस्तूचाही विचार करतो. तथ्यात्मक निरीक्षणांची साधी नोंद करण्याऐवजी हा भूतकाळाचा अर्थ उकलण्याचा प्रयत्न इतिहास करतो.

'अँटीक्वेरियन' या शब्दासोबत असलेल्या नकारात्मक भावनेमुळे आज फार कमी लोक स्वत:ला प्रामुख्याने यामध्ये सहभागी आहेत यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. तथापि पुरातन वस्तूंची एक संस्था ‘सोसायटी ऑफअँटिक्वेरिज’या नावाने१७०७ मध्ये स्थापन झाली ज्याची सध्याची सदस्यसंख्या २,३०० पेक्षा जास्त आहे. केंब्रिज अँटिक्वेरियन सोसायटी, हॅलिफॅक्स अँटिक्वेरिअन सोसायटी, ब्रॅडफोर्ड हिस्टॉरिकल अँड अँटिक्वेरियन सोसायटी किंवा फिलाडेल्फियाची न्यूमिस्मॅटिक अँड अँटिक्वेरियन सोसायटी अशा असंख्य प्रादेशिक आणि स्थानिक संस्थाही आपल्या शीर्षकात 'अँटिक्वेरियन' हा शब्द धारण करतात.

लंडनच्या सोसायटी ऑफ अँटिक्वेरीजच्या सदस्यत्वात पुरातत्त्वज्ञ, कला इतिहासकार, स्थापत्य इतिहासकार, प्राचीन इतिहासापासून ते विसाव्या शतकापर्यंतच्या कोणत्याही कालखंडात पारंगत असलेले इतिहासकार, अभिलेखशास्त्रज्ञ आणि वारसा व संवर्धनात गुंतलेले व्यावसायिक यांचा समावेश होतो. त्यापैकी बहुतेक जन भूतकाळातील भौतिक अवशेषांच्या पुरातत्वशास्त्र, कलाकृती, हस्तलिखिते आणि पुस्तके यासारख्याकाही पैलूंशी संबंधित आहेत.पुरातत्त्वज्ञ अथवा पुरातत्व शास्त्रज्ञ यांचा मिळून हा सोसायटी ऑफ अँटिक्वेरीजमधील आतापर्यंतचा सर्वात मोठा एकच गट आहे. अशा रीतीने आजचे अँटिक्वेरियन (पुरातनवस्तूशास्त्रज्ञ) अजूनही भूतकाळाकडे पाहण्याच्या वस्तूभिमुख दृष्टिकोनाशी आणि त्याच्या साहित्याच्या उत्खननाशी व जतनाशी निगडित आहेत.इतिहास लिहिण्याचा उद्देश वर्तमानकाळासाठी कृतीला मार्गदर्शक उपलब्ध करून देणे हा होता. अँटिक्वेरियनला केवळ भूतकाळातील अनुभवजन्य तपशीलाच्या पुनर्प्राप्तीशी संबंधित होते.

अंदाजाने लिहिणे, पुराव्याचे विकृतीकरण करणे आणि अतिशयोक्ती टाळणे या विशेष गुणांचा पुरातनवस्तूशास्त्रज्ञ यांना अभिमान होता. एखादा राजकीय किंवा नैतिक मुद्दा सिद्ध करण्यासाठी इतिहासकार वादग्रस्त हेतूंसाठी लिहू शकतात परंतु पुरातन वस्तू शास्त्रज्ञांनी वस्तुस्थिती जशीच्या तशी मांडली. इतिहासकार भूतकाळातील घटनांना काही पूर्वकल्पित प्रचार मोहिमेत भाग पाडण्याचा प्रयत्न करू शकतात परंतु पुरातनवस्तूशास्त्रज्ञ अभ्यासपूर्ण व तटस्थ होते.सर रिचर्ड कोल्ट होरे या एका पुरातनवस्तूशास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की, 'आम्ही वस्तुस्थितीतून बोलतो, सिद्धांतातून नाही'. काटेकोर अनुभवजन्य निरीक्षण आणि तौलनिक विश्लेषणावर भर देताना भूतकाळातील पुरातनवस्तूशास्त्रज्ञानी वैज्ञानिक प्रयोगांची

बरीचशी भाषा उपयोगात आणली.त्यांनी स्वत:च्या श्रमांची तुलना प्रयोगशाळेतील शास्त्रज्ञाशी केली. त्यांना असा दावा करताना अभिमान वाटत होता. पुरातनवस्तूशास्त्र (अँटीक्वेरियनिझम) हे एक शास्त्र आहे, जे काटेकोर निरीक्षण आणि तपशिलाकडे लक्ष देण्यावर आधारित होते.ऑक्सफर्ड विद्यापीठात 'घटनात्मक इतिहास विभाग'स्थापना करणाऱ्या विल्यम स्टब्ससारख्या इतिहासकारांनी आपल्या संशोधनात 'अँटिक्वेरियन' पद्धती व स्रोतांचा वापर केला.त्याचप्रमाणे, इतिहासकारांनी सखोल आणि तपशीलवार अभिलेखीय संशोधनाद्वारे वस्तुनिष्ठता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे या लिओपोल्ड फॉन रांके यांच्या मागणीचा स्पष्ट सूर पुरातन प्राणीशास्त्रज्ञ रिचर्ड गॉफ यांनी स्वीकारला होता.

आधुनिकोत्तर युगात इतिहासतज्ज्ञांना निश्चिततेसह भूतकाळ पुन्हा जाणून घेण्याच्या क्षमतेवर कमी विश्वास आहे. परंतु तरीही इतिहासावर अँटीक्वेरियन विचारसरणीचा आणि कार्यपद्धतीचा प्रभाव शोधणे शक्य आहे. उदा.सामाजिक विज्ञानाच्या पार्श्वभूमीच्या इतिहासकार पद्धतशीरपणे पुरावे गोळा करतात.ते तुलनात्मक विश्लेषणाचा वापर करतात.त्यांचा असा विश्वास असतो की त्यांची माहिती भूतकाळातील वस्तुनिष्ठ वास्तव प्रतिबिंबित करते. पूर्वीच्या काळात टीकाकार पुरातनवस्तूशास्त्रज्ञ यांचा अनादर करत होते कारण त्यांना गंजलेली अंगठी, कपड्यांचे तुकडे, वैद्यकीय पाककृती किंवा लहान मुलांची खेळणी हे कंटाळवाणे अवशेष वाटत होते. तथापि पुरातनवस्तूशास्त्रज्ञांचा असा विश्वास होता की याबाबी भूतकाळातील 'शिष्टाचार आणि चालीरीतीं'वर प्रकाश टाकतात. 'सामान्य' माणसांच्या चालीरीती, सवयी आणि पेहरावातील ही सुरुवातीची दुर्लक्षित असलेली बाब आज सामाजिक इतिहासाच्या पायाभरणी पैकी एक म्हणून ओळखू शकतो.

कौटुंबिक इतिहासाच्या क्षेत्रातही पुरातनशास्त्राचा वारसा टिकून आहे. वंशावळीचा अभ्यास हा नेहमीच पुरातनशास्त्र संशोधनाचा एक महत्त्वाचा घटक होता. वादग्रस्त वारसाच्या बाबतीत मालमत्तेचे कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्याच्या वेळेस पुरातनशास्त्र महत्त्वपूर्ण होते. कौटुंबिक इतिहासकारांनी आज पूर्वीच्या पुरातनशास्त्रज्ञाबद्दल लोकांच्या संशोधनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि त्यांची बरीचशी कार्यपद्धती आणि त्यांचे स्रोत उपयोगात आणले आहेत.

त्याचप्रमाणे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाशी पुरातनशास्त्राचे नेहमीच मजबूत संबंध राहिले आहेत. जॉन लेलँड किंवा विल्यम कॅमडेन यांच्यासारखे स्थलाकृत्यशास्त्रज्ञांना लक्षात आलं होतं की, एकेकाळी त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांच्या इतिहासाबद्दल हे विस्तृत भूप्रदेशावरील पुरातन बाबी महत्त्वाचे संकेत देऊ शकतं. रोमन रस्त्यांचा शोध घेण्याचा, दगडी वर्तुळांचे वर्णन करण्याचा किंवा लोह युग काळातील किल्ले ओळखण्याचा पहिला प्रयत्न पुरातनशास्त्रज्ञानी केला होता. शिवाय ऐतिहासिक बदलांचा व्यक्ती आणि समुदायांवर होणारा परिणाम स्पष्ट करण्यासाठी स्थानिक अभ्यासाचे महत्त्व पुरातनशास्त्रज्ञानी नेहमीच समजून घेतले आहे.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र यांतील फरक तपासा.**

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

**२. इतिहासातील पुरातनवास्तूशास्त्राच्या योगदानाचे परीक्षण करा.**

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

## १५.३ इतिहास आणि पुरातनवस्तूशास्त्र यांच्यातील संबंध

अठराव्या शतकात पुरातन अवशेष व त्यांचे संग्राहक यांचा उपहास केला जात असे. अर्नोल्ड मोमिग्लियाना यांच्यासारख्या विद्वानांचे असे मत होते की पुरातनवस्तूशास्त्र हे जुन्या वस्तू केवळ जुन्या आहेत म्हणून साठवून ठेवणाऱ्या विचित्र लोकांचा छंद आहे. परंतु पुरातनवस्तूशास्त्राने भौतिक अवशेषांसह प्राथमिक स्रोत सामग्रीचा अभ्यास करून "आधुनिक" इतिहासाचा पाया रचला. सतराव्या शतकातील धार्मिक व राजकीय इतिहास हा पारंपरिक इतिहासकारांच्या कार्याभोवती आधारलेला होता. वादविवादात्मक पक्षपातीपणामुळे पारंपारिक इतिहासकारांचे लिखाण एकांगी असल्याने पुरातनवस्तूशास्त्रज्ञानी भूतकाळातील दुय्यम अहवालांकडे दुर्लक्ष केले आणि त्याऐवजी थेट प्राथमिक, सहसा असत्य, स्रोतांचे परीक्षण केले. असे करण्याद्वारे त्यांनी ऐतिहासिक अभ्यासाचा सर्वात विश्वासार्ह पुरावा म्हणून अभिलेखीय कागदपत्रे आणि पुरातत्त्वीय कलाकृतीची स्थापना केली आणि भविष्यातील इतिहासकारांना अशा पुराव्यांचा अर्थ लावण्यापूर्वी त्याचा शोध घेण्याचे आणि त्याचे वर्णन करण्याचे काम सोपविण्यात आले.

१९५० सालापासून विद्वानांनी पुरातन अवशेषाच्या अभ्यासाने ऐतिहासिक चौकशीला कशी शिस्त लावली याचे परीक्षण केले आहे. एकविसाव्या शतकात पुरातनवस्तूशास्त्र पुन्हा नव्याने अभ्यासले जात आहे.पुरातनवास्तूशास्त्राचे समर्थकही वाढतआहेत. त्यांचे म्हणणे आहे की जुन्या वस्तूंमध्ये भूतकाळाबद्दलची वस्तुस्थिती उघड करण्याची शक्ती असते. पुरातनवस्तूशास्त्र हे एक असे शास्त्र आहे ज्याने विद्वानांना जिवंत ऐतिहासिक कलाकृतींची काळजीपूर्वक वबारकाईने छाननी करून भूतकाळ आणि वर्तमानकाळ तसेच वैयक्तिक आणि राजकीय यांच्यातील सीमा ओलांडणाऱ्या सिद्धांतांची मांडणी करण्याची संधी मिळाली होती.

पुरातनवास्तूशास्त्राच्या समर्थकांचे म्हणणे आहे की पुरातनवास्तूशास्त्रामध्ये प्राथमिक स्त्रोतांना आणि त्यांनी जतन केलेल्या वस्तुस्थितीला प्राधान्य आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये सापडलेल्या तथ्यांना सामाजिक-सांस्कृतिक घटनांच्या स्पष्टीकरणात रूपांतरित करतात. ते ज्या विशिष्ट ठिकाणी घडले त्या विशिष्ट ठिकाणी विशिष्ट ऐतिहासिक संदर्भ आणि कालातीत ऐतिहासिक परिणामांचा अभ्यास करतात.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहास आणि अँटीक्वेरियनिझम (पुरातनवस्तूशास्त्र) यांच्यातील संबंधांची चर्चा करा.**

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १५.४ पुरातनवास्तूशास्त्राचा इतिहास

प्राचीन रोममध्ये पारंपारिकतेच्या प्रखर जाणिवेमुळे भूतकाळातील स्मारकांचा अभ्यास व नोंद करण्यात रस होता.ऑगस्टन काळातील इतिहासकार लिव्ही लॅटिन स्मारकाचा उल्लेख पुरातनवास्तूशास्त्राच्या अर्थाने करतो. चालीरीती, धार्मिक विधी आणि राजकीय संस्थांचा उगम अशा विषयांचा समावेश पुरातनवस्तूशास्त्र विषयांवरील पुस्तकांमध्ये करण्यात आला होता. लिव्ही आणि टॅसिटस सारखे रोमन इतिहास हे दोन्ही घटनांचे व्यापक कथन आणि व्याख्या देतात.

लॅटिन लेखकांमध्ये वॅरो, प्लिनी द एल्डर, ऑलस गेलियस आणि मॅक्रोबियस यांचा पुरातनवास्तूशास्त्रात समावेश होतो. रोमन सम्राट क्लॉडियस याने पुरातनवास्तूशास्त्रावरील ग्रंथ प्रकाशित केले. त्यांपैकी एकही ग्रंथ आजअस्तित्वात नाही. सिसेरोच्या काही ग्रंथांतप्रबळ पुरातनवस्तूशास्त्र हितसंबंध दर्शवितात. रोमन काळातील ग्रीक लेखकांनीही आपल्या रोमन प्रश्नांत प्लूटार्क सारखी पुरातनवस्तूशास्त्र सामग्री हाताळली. लॅटिन पुरातनवास्तूशास्त्राचे उद्दीष्ट म्हणजे मोठ्या संख्येने संभाव्य स्पष्टीकरणे गोळा करणे. प्राचीन इतिहासकारांद्वारे बहुतेक वेळा पुरातनवस्तूशास्त्राचा स्त्रोत म्हणून वापर केला गेला.

प्राचीन रोमच्या साहित्यात पुरातनवस्तूशास्त्र लिखाणाला महत्त्व असलेतरी काही अभ्यासकांना पुरातनवास्तूशास्त्राचा उदय केवळ मध्ययुगातच होत असल्याचे वाटते. मध्ययुगीन पुराणवस्तूवाद्यांनी काही वेळा शिलालेखांचे किंवा स्मारकांच्या नोंदींचे संग्रह केलेपण भूतकाळातील सर्व अवशेषांचे पद्धतशीर संग्रह म्हणून रोमनांमधील पुरातनवस्तूशास्त्रज्ञांनी केलेले काम विसरले गेले. पुरातनवस्तूशास्त्राचा व्यापक प्रसार सामान्यपणे युरोपमधील पुनर्जागृती चाल्वालीशी (रेनेसान्सशी) निगडित आहे. मानवतावादी विद्वानांनी त्या काळात हाती घेतलेल्या शास्त्रीय ग्रंथांचे गंभीर मूल्यमापन व प्रश्न विचारण्याशी निगडित आहे.नाणी, शिलालेख आणि इतर पुरातत्त्वीय अवशेष, तसेच मध्ययुगीन

कालखंडातील दस्तऐवज यांच्या अभ्यासाने देऊ शकणाऱ्या भूतकाळाविषयीच्या पूरक दृष्टिकोनांची जाणीव करून देण्यात आली.

आधुनिक युरोपच्या सुरुवातीच्या काळात रॉबर्ट ग्लोव्हर, विल्यम कॅमडेन, विल्यम डग्डेल आणि इलियास अशमोल यांच्यासह अनेक नामवंत पुराणवस्तूशास्त्रज्ञांनी व्यावसायिकरित्या पुरातनवास्तूशास्त्राचा अभ्यास केला होता.वंशावळीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनी चर्चच्या स्मारकांसह अनेक पुरातन स्त्रोतांच्या संशोधनाचे मूल्य ओळखले.एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, पुरातत्त्वशास्त्र, कलेचा इतिहास, नाणेशास्त्र, भाषाशास्त्र, वाङ्मयीन अभ्यास अशा अनेक विशेष शैक्षणिक शाखांमध्ये पुरातनवास्तूशास्त्राचे रूपांतर झाले. अलिकडच्या वर्षांत आंतरविद्याशाखीयतेला अधिकाधिक प्रोत्साहन दिले जाते.

प्राचीन गोष्टींमध्ये रस असलेल्या व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी १६ व्या ते १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत "अँटिक्वेरी" ही इंग्रजीतील नेहमीची संज्ञा होती. इंग्लंडमध्ये अशा वस्तूंचे वाढते कौतुक गॉथिक पुनरुज्जीवनाशी आणि रोमँटिक पुरातनवास्तूशास्त्राशी निगडित होते.होरेस वॉलपोल हा इंग्रज माणूस पुरातन वस्तूंनी आपले घर सुसज्ज करणारा पहिला संग्राहक होता. त्याच्यानंतर फाँटहिल ॲबी, विल्यम बेकफोर्ड आणिक्लनी म्युझियमचे संस्थापक अलेक्झांडर डू सॉमरार्ड यांच्यासारख्या संग्राहकांनी अशाच प्रकारे कार्य केले.

**आपली प्रगती तपासा:**

**१. अँटिक्वेरियनिझमच्या (पुरातनवस्तूशास्त्र) इतिहासाची चर्चा करा.**

______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________
______________________________________________________________

## १५.५ इतिहासकार आणि पुरातन वस्तू

१६ व्या ते १९ व्या शतकापर्यंत पुरातन वस्तू आणि इतिहासकार यांचे हितसंबंधात स्पष्ट फरक असल्याचे मानले जात होते. दस्तऐवज, कलाकृती किंवा स्मारके भूतकाळातील अवशेषांशी संबंधित होते तर इतिहास भूतकाळाच्या कथनाशी आणि वर्तमानकाळातील त्याच्या राजकीय किंवा नैतिक धड्यांशी संबंधित होता. फ्रान्सिस बेकनने १६०५ मध्ये प्राचीन वस्तूंवर आधारित भूतकाळातील वाचनाचे वर्णन अप्राप्य इतिहास असे केले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लिओपोल्ड फॉन रांक यांनी पुरस्कृत केलेल्या अनुभवजन्य स्रोत-आधारित इतिहासाच्या विचारप्रणालीला व्यापक मान्यता मिळू लागली आणि आजचे इतिहासकार प्राचीन व्यक्तींनी पुढाकार घेतलेल्या तंत्रांच्या संपूर्ण श्रेणीचा वापर करतात.

१८ व्या शतकातील अनेक युरोपियन भाषांमध्ये अँटीक्वेरियन (किंवा पुरातनवस्तूसंग्राहक) हा शब्द आधुनिक काळात दुर्मिळ आणि प्राचीन पुस्तकांचा व्यापार करणाऱ्या किंवा गोळा करणा-या व्यक्तीस सूचित करण्यासाठी बदलला आहे. पुरातनवस्तूसंग्राहक हा प्रामुख्याने



munotes.in

प्राचीन पुस्तके, दस्तऐवज, कलाकुसरीच्या वस्तू किंवा स्मारकांचा विद्यार्थी असतो. अनेक पुरातनवस्तूसंग्राहकानी आपल्या अभ्यासाची माहिती देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक संग्रह ही तयार केले आहेत.

व्यावसायिक इतिहासकार अजूनही सहसा "अँटीक्वेरियन" हा शब्द क्षुल्लक या अर्थाने वापरतात. ऐतिहासिक अभ्यासांचा उल्लेख करण्यासाठी काही बिनमहत्त्वाच्या किंवा क्षुल्लक बाबी असतात त्यापैकी एक पुरातन वस्तूआहेत असे त्यांना वाटते. अठराव्या शतकात ज्यांच्याकडे फावला वेळ व पैसा होता आणि आपल्या शहरांबद्दल आणि देशाबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा होती त्यांच्यासाठी स्थानिक इतिहास लेखन हा आवडता छंद होता. रोझमेरी स्वीटने स्थानिक इतिहासकारांच्या काही प्रेरणा आणि आज इतिहासकारांसाठी त्यांच्या कार्याची उपयुक्तता यांचे परीक्षण केले.

सामुदायिक, शहरी आणि स्थानिक पातळीवर, १८ व्या शतकात हजारो व्यक्ती ऐतिहासिक संग्रह संकलित करत होते. यापैकी बऱ्याच जणांनी ते छापून आणले परंतु त्याहूनही अधिक अप्रकाशित राहिले. एकतर प्रकाशनाचा खर्च खूप जास्त होता आणि संभाव्य बाजारपेठ खूपच कमी होती म्हणून किंवा लेखक आपले संशोधन प्रकाशनीय स्वरूपात आणण्यास अक्षम होता.असे बरेच लोक होते ज्यांनी  स्थानिक इतिहासासाठी साहित्य गोळा केले होते परंतु ते प्रसारित करू शकले नाहीत. परिणामी ब्रिटिश लायब्ररी आणि स्थानिक रेकॉर्ड अधिकारी स्थानिक इतिहासासाठी अप्रकाशित संग्रह किंवा नोट्सने भरलेले आहेत. १८ व्या शतकातील बहुतेक स्थानिक इतिहासकारांनीही स्वत:ला पुरातनवस्तूशास्त्रज्ञ मानले. म्हणूनच त्यांनी भूतकाळातील भौतिक आणि मजकूर अवशेष या दोन्हींचा अभ्यास केला.

### पुरातनवस्तूशास्त्राचे घटक

#### नाणी

नाणीशास्त्राचा अभ्यास अनेक बाबींवर प्रकाश टाकतो.नाणी हा एक महत्त्वाचा प्राथमिक ऐतिहासिक स्त्रोत आहे.  वस्तूंची अदलाबदल करण्याच्या पद्धती नंतर देवाणघेवाणीमध्ये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.  चांदी, सोने, तांबे त्यातून पासून नाणी बनवली जात असत. नाणी पद्धतीमुळे व व्यापारी वर्गाला व्यापार करण्यास सोपे गेले.  त्यामधूनच अनेक नाणी पाडली गेली.यांच्या अभ्यासामधून राजकीय, भौगोलिक व धार्मिक परिस्थिती जाणून घेता येते. प्राचीन भारतीय राजे, इंडो ग्रीक, शक,  कुशाण  इत्यादी राजांनी अनेक नाणी पाडल्यामुळे आपल्याला त्यांच्याविषयी माहिती मिळाली.

#### स्मारके

या प्रकारच्या ऐतिहासिक साधनांमध्ये प्रार्थना स्थळे,  स्तूप,  विहार,  राजवाडे,  किल्ले इत्यादींचा समावेश होतो.  या शिवाय उत्खननात सापडलेले पुरातत्त्वीय अवशेष यांचाही समावेश करता येतो.  लिखित साधनांच्या अभावी इतिहासलेखन अशक्य  बनल्यास पुरातत्वीय साधने महत्त्वाची भूमिका बजावतात.  सिंधू संस्कृतीमध्ये लिखित साधने मिळाली असून देखील त्यावरील लिपीचा उलगडा न झाल्यामुळे त्या संस्कृती विषयीची माहिती

उपलब्धशिल्पे, स्मारके, भांडी, खेळांचीसाधने, व इतर अवशेष यांच्या आधारे आपण घेत आलेलो आहोत. प्राचीन राजघराण्यांच्या अभ्यासातही पुरातत्वीय अवशेष महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक उत्खनननामधून प्राचीन शहरांची माहिती मिळाली आहे. अजिंठा व वेरूळ येथील भित्तीचित्रे गौतमबुद्धांच्या जीवनावर आधारित आहेत. दक्षिण भारतातील विविध शिल्पे व मंदिरे यामधून पल्लव, चोळ, चालुक्य यांचे विषयी धागेदोरे हाती लागतात. प्रस्तुत स्थापत्यांवर तत्कालीन राजांची व देणगीदारांची नावे कोरलेली आहेत त्यावरून तत्कालीन राजघराण्यांची माहिती मिळते. उत्खननात सापडलेल्या भांड्यांवर तत्कालीन कलाकुसरीचा प्रभाव दिसून येतो. त्यावरून ती भांडी कोणत्या कालखंडात व कोणत्या राजवटीत तयार झाली असावी तयाचा अंदाज बांधता येतो. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन कालखंडात अनेक प्रकारच्या स्थापत्य कला मूर्ति कला यांचा विकास झाला. त्यांच्यावर कोणत्या संस्कृतीचा किती प्रभाव होता हे देखील तुलनात्मक अभ्यास आणि दिसून येते.

### शिलालेख

प्राचीन भारतीय इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून शिलालेखांचा विचार केला जातो.असे आलेख शिलाखंड, स्तंभ, गुहांच्या भिंती यावर कोरलेले दिसून येतात. हे करण्यासाठी शिला, लोखंड, तांबे इत्यादींचा उपयोग होतो. शिलालेख संस्कृत, प्राकृत, पाली, तमिळ, कन्नड इत्यादी भाषांमध्ये आढळून येतात. शिला लेख लिहिण्यासाठी ब्राह्मी व खरोष्टी या लिपीचा उपयोग केला गेला आहे. शिलालेखांमध्ये फेरफार करणे शक्य नसल्यामुळे समकालीन ऐतिहासिक पुरावा म्हणून त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जेम्स प्रिन्सेप याने ब्राह्मी लिपीचे वाचन केल्यापासून शिलालेखांवर लिहिलेल्या मजकुराचे वाचन शक्य झाले आहे. अशोकाच्या आलेखात त्याच्या धार्मिक व प्रशासकीय सूचना आढळतात. अनेक शिलालेखांमध्ये राजेरजवाड्यांनी हिंदू,बौद्धव जैन यांना दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. आपण केलेल्या दानाचे स्मरण रहावे यासाठी हे आलेख ताम्रपटांवर करण्यात येत. अशा प्रकारच्या महत्त्वाच्या शीलालेखांमुळे इतिहासाचे आकलन होण्यास फार मदत होते. याशिवाय राज्याभिषेक, विवाह व अन्य महत्त्वाच्या घटना ह्या देखील शिलालेखांवर कोरल्या जात.शिलाहार, चालुक्य व राष्ट्रकूट या राज्यांनी असे आलेख करून ठेवलेले आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

**१. इतिहासकार आणि अँटीक्वेरियन यांच्यातील परस्परसंबंधांची चर्चा करा.**

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## १५.६ सारांश

पुरातनवस्तूशास्त्र आणि इतिहास यांचा नेहमीच जवळचा संबंध राहिला आहे. एखादा राजकीय किंवा नैतिक मुद्दा सिद्ध करण्यासाठी इतिहासकार वादग्रस्त हेतूंसाठी लिहू शकतात, परंतु पुरातन वस्तू शास्त्रज्ञांनी वस्तुस्थिती जशीच्या तशी मांडली. इतिहासकार भूतकाळातील घटनांना काही पूर्वकल्पित प्रचार मोहिमेत भाग पाडण्याचा प्रयत्न करू शकतात परंतु पुरातनवस्तूशास्त्रज्ञ अभ्यासपूर्ण व तटस्थ होते.त्याचप्रमाणे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाशी पुरातनशास्त्राचे नेहमीच मजबूत संबंध राहिले आहेत. ऐतिहासिक बदलांचा व्यक्ती आणि समुदायांवर होणारा परिणाम स्पष्ट करण्यासाठी स्थानिक अभ्यासाचे महत्त्व पुरातनशास्त्रज्ञानी नेहमीच समजून घेतले आहे. पुरातनवस्तूशास्त्राने भौतिक अवशेषांसह प्राथमिक स्रोत सामग्रीचा अभ्यास करून आधुनिक इतिहासाचा पाया रचला.आधुनिक युरोपच्या सुरुवातीच्या काळात रॉबर्ट ग्लोव्हर, विल्यम कॅमडेन, विल्यम डग्डेल आणि इलियास अशमोल यांच्यासह अनेक नामवंत पुराणवस्तूंनी व्यावसायिकरित्या पुरातनवास्तूशास्त्राचा अभ्यास केला होता. पुरातनवस्तूशास्त्र हे एक असे शास्त्र आहे ज्याने विद्वानांना जिवंत ऐतिहासिक कलाकृतींची काळजीपूर्वक वबारकाईने छाननी करून भूतकाळ आणि वर्तमानकाळ तसेच वैयक्तिक आणि राजकीय यांच्यातील सीमा ओलांडणाऱ्या सिद्धांतांची मांडणी करण्याची संधी मिळाली होती.

## १५.७ प्रश्न

१. अँटिक्वेरियनिझम (पुरातनवस्तुशास्त्र)या संकल्पनेचे विश्लेषण करा.

२. इतिहास आणि अँटीक्वेरियनिझम (पुरातनवस्तुशास्त्र) यांच्यातील फरकाची चर्चा करा.

३. इतिहास आणि अँटीक्वेरियनिझम (पुरातनवस्तुशास्त्र) यांच्यातील संबंधांचे परीक्षण करा.

## १५.८ संदर्भ ग्रंथ

१) ब्रायन लिटर, मायकेल रोसेन (संपादन), द ऑक्सफर्ड हँडबुक ऑफ कॉन्टिनेन्टल फिलॉसॉफी, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, २००७.

२) टोव्स, जे. (२०१९). हिश्तोरीझ्म फ्रॉम रंके तटू नित्शे केंब्रिज: केंब्रिज यूनिवर्सिटी प्रेस

३) Reynolds, Andrew (1999). "What is historicism?". International Studies in the Philosophy of Science. 13 ISSN 0269-8595

४) https://www.britannica.com/biography/Leopold-von-Ranke#ref291476, written by Rudolf Vierhaus, Professor and Director, Max Planck Institute for History, Göttingen, Germany.

५) David Mikics, ed. *A New Handbook of Literary Terms*, 2007.

६) https://educalingo.com/en/dicen/antiquarianismhttps://en.wikipedia.org/wiki/Antiquarian

७) https://www.britannica.com/topic/art-market/The-rise-of-the-antique#ref1052155

❊❊❊❊❊❊❊